
सं. ठाणे
सिव्हंट्रे
१२४२

# सागर प्रकाशन



RFFBK-0010847


# विद्यार्थी

২৬৩৭৫০

৭২৪২ ২৫/০৭/৫০

सागर प्रकाशन पुष्प १ लें

# विचारधारा



REFBK-0010847

श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांची महत्वाचीं भाषणें

प्रसिद्धि दिनांक : २६ जानेवारी १९६०

किंमत रु. २–५०

प्रकाशक :

**न. वा. लिमये,**
सागर प्रकाशन,
एडदिन बिल्डिंग,
धोबी तलाव,
मुंबई.

**सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन**

मुद्रक :

**न. वा. लिमये,**
महाराष्ट्र मुद्रणालय,
२५२/अ/५ नारायण पेठ,
पुणें २.

# प्रकाशन क्षेत्रांतले पहिलें पाऊल

देश स्वतंत्र झाल्यानंतरच्या एक तपाच्या काळांत लोक शिकले, जागृत झाले. त्यांच्या विचारांना खाद्य पुरविण्याची जरूरी तीव्रतेनें भासत आहे. जागृत समाजाला योग्य बौद्धिक खाद्य मिळाले नाहीं तर विविध प्रकारचा प्रचार त्याच्या भोंवती सदैव घोंगावत आहे. त्या प्रवाहांत समाज वाहून जाईल ही भीती आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्य, सामाजिक न्याय समता आणि लोकशाही मार्ग या प्रिय मूल्यांचे रक्षण करण्यासाठीं प्रत्येक नागरिकाला सुबुद्ध बनविणें हाच एक मार्ग आहे.

मोठ्या व्यक्तींच्या आणि विचारवंतांच्या लेखनांतून, व्याख्यानांतून हें मार्गदर्शन घडत असते. गेल्या पांच वर्षांत केवळ महाराष्ट्रांतच नव्हे तर भारतांतून ज्यांनी यशस्वी प्रशासक म्हणून मान्यता मिळविली त्या श्री. यशवंतराव चव्हाण यांचे विविध विषयांसंबंधींचे विचार मनन करण्यासारखे आहेत. यशवंतरावजींचे मौलिक विचार लेखनरूपानें कधीं बाहेर येत नाहींत. लेख, निबंध, प्रबंध लिहिण्याची कला त्यांना साधतच नाहीं. सागराला भरती येण्यास जसा चंद्रोदय व्हावा लागतो तसे यशवंतरावजींच्या विचारधारा कडेकपारींतून वहाणाऱ्या जलराशीसारख्या ओघळण्यास समोर मावळ मराठ्यांचा मराठी जनसमुदाय जमावा लागतो. त्यांतील विचारांचे मोती गोळा करून, निवडून ते पुस्तकरूपानें प्रसिद्ध करणें उपयुक्त तसेंच आवश्यक आहे असें वाटले, पटले म्हणून मी माझ्या मुद्रण व्यवसायाला प्रकाशन व्यवसायाची जोड हौस म्हणून या 'विचारधारांनीं' देत आहे. त्यांच्या कांहीं लेखांचे, विचारांचे व व्याख्यानांचे संकलन वाचकांना मार्गदर्शक होईल अशी आशा आहे.

सागर प्रकाशन या नव्यानें सुरू केलेल्या माझ्या संस्थेचें हें पहिलें पुष्प मी वाचकांना सादर करीत आहे. दुसरें पुष्प श्री. काकासाहेब गाडगीळ यांच्या लेखणींतून उतरलेल्या लेखांचे प्रसिद्ध होईल.

२६ जानेवारी १९६०.

न. वा. लिमये

## अनुक्रम


- उद्याचा महाराष्ट्र १
- माझ्या कल्पनेंतील खेडे १७
- ग्रामीण शिक्षणाची माझी कल्पना २२
- कल्याणकारी राज्यांतील कारभाराची कसोटी २७
- जिल्हा अधिकारी आणि जनता संपर्क ३९
- कल्याणकारी राज्यांत पोलिसदल ४८
- पोलिस गोळीबार आणि चौकशी ६०
- सत्त्यावर आधारलेली माहिती–प्रचार ६७
- कल्याणकारी राज्याची कल्पना ७७
- कोकण विकास ८१
- खेड्यांतील सहकार ९३
- हिंदुस्तानला जगण्याचा एकच मार्ग 'समाजवाद' १०३
- दहा वर्षांपूर्वी व आज १०९
- उच्च शिक्षण आणि जनता ११५

# उद्याचा महाराष्ट्र

## महाराष्ट्र निर्मितीचा संधिकाल

नव्या वर्षाच्या सुरुवातीस ता. ५ व ६ जानेवारी १९६० रोजीं मुंबई राज्याचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी दक्षिण सातारा जिल्ह्यांत मिरज व सांगली येथील दोन जाहीर सभामध्यें आगामी महाराष्ट्राच्या प्रश्नाची सांगोपांग चर्चा केली. महाराष्ट्र निर्माण होण्याचा हा संधिकाल आहे. कांहीं दिवसांतच तीन कोटी जनतेचा मराठी प्रदेश एका शासनाखाली येत आहे. इतिहासांत अशी घटना कधीं घडली नव्हती, ती प्रथमच घडत आहे; अशा क्षणाला महाराष्ट्राचा गेल्या कांहीं वर्षातला प्रवास कसा झाला आणि पुढची वाटचाल कशी व्हावी या संबंधीचे त्यांचे मौलिक विचार पंचवीस हजार नागरिकांना ऐकावयास मिळाले. उद्याचा महाराष्ट्र कसा असावा याचें एक सुंदर चित्र या भाषणांत सांपडतें. मिरज येथील जाहीर सभेंत त्यांनी या विषयाचा पूर्वार्ध सांगितला. ते म्हणाले, "मी आज माझ्या घरीं माझ्या मनांतले कांहीं विचार बोलून दाखवीत आहे. सातारा व दक्षिण सातारा हे दोन सख्या भावासारखे जिल्हे आहेत. राजकीयदृष्ट्या जागृत अशी येथील जनता आहे. गेल्या चार महिन्यांत आपल्या राज्याच्या राजकीय जीवनासंबंधी मी कांहीं निर्णय घेऊन धोरण आंखलेले आहे. ते माझे निर्णय आणि धोरण जनतेला मान्य आहे कीं नाहीं, त्यांची पसंती नापसंती किती याची कसोटी पहाण्यासाठीं मी घरच्या मंडळीपुढें ते मांडणार आहे. गेल्या कित्येक वर्षांची आपली सर्वांची भावना होती कीं या स्वतंत्र भारतांत सर्व मराठी भाषिकांचा असा एक महाराष्ट्र हवा. त्यासाठीं

चळवळी झाल्या, मागण्या केल्या, तो इतिहास आपणा सर्वांना ताजेपणाने माहीत आहे. त्या प्रश्नाची गुंतागुंत वाढत गेली आणि काँग्रेस पक्ष अडचणींत आला. मुंबई शहर ही एक समस्या होऊन बसली. तिच्याशिवाय महाराष्ट्र असा एक त्रिराज्य योजनेचा पर्याय आला. आपण तो नाकारला. त्यांतून मुंबईसह मराठी मुलुख आणि जोडीला गुजराथ असे विशाल द्विभाषिक राज्य तीन वर्षांपूर्वीं निर्माण करण्यांत आलें. हा एक प्रयोग होता. बुद्धीच्या निकशावर तो पटणारा असा पर्याय होता आणि म्हणून त्या प्रयोगाची वाटचाल प्रामाणिकपणें करण्याचा आपण प्रयत्न केला. हा प्रयोग करण्यामागे दुसरा एक हेतु होता कीं त्रिराज्य योजनेंत मुंबई शहर महाराष्ट्रापासून बाजूस केलें जात होतें तें या द्विभाषिकानें महाराष्ट्राशीं संलग्न रहात होतें...परंतु बुद्धीला पटतें तें भावनेला नेहमींच पटतें असें नाहीं. या द्विभाषिक प्रयोगाच्या तीन वर्षांच्या काळांत हाच अनुभव आला.राज्य सुस्थिरपणें चालेल असें वाटलें तरी भावनात्मक ऐक्य साधलेसे दिसले नाहीं. गेले वर्षभर माझ्या मनांत द्विभाषिक विसर्जनाच्या कल्पना घोळत होत्या. ऑगस्ट महिन्यांत योग्य संधि येतांच मी तें मत योग्य ठिकाणी सांगून टाकलें आणि त्या मार्गावर चक्रे फिरू लागून आतां या द्विभाषिकाची दोन राज्यें निर्माण केलीं जात आहेत. परवाच महामंत्री पं. नेहरूनी मुंबईच्या सभेंत ही गोष्ट जाहीर केली. तीन-वर्षांपूर्वीं जें घडलें नाहीं तें आज घडत आहे; एवढाच हा फरक नाहीं तर तीन वर्षांपूर्वीं जी परिस्थिती होती ती आज पालटलेली आहे ही या निर्णया-मागची पार्श्वभूमी आपण नीट समजून घेतली पाहिजे. आज हा निर्णय निघाला तो गुजराथ महाराष्ट्र यांच्या भांडणांतून निघाला नाहीं. दोन वैरी म्हणून आपण दूर सरणार नाहीं. तर तीन वर्षें एकत्रपणाने स्थिर असा कारभार केल्यानंतर दोन भाऊ सुखासमाधानांत आपले स्वतंत्र संसार थाटत आहेत असे आजचे चित्र आहे. या विभाजनाचे काम अशा गुण्या-गोविंदाने होत आहे ही गोष्ट देशाच्या दृष्टीनें अधिक महत्वाची आहे.

अशा रितीनें आपण मागत आला ते राज्य–तो तीन सव्वा तीन कोटी मराठी जनतेचा महाराष्ट्र निर्माण होऊं घातल्यानंतर आपल्या मनांत प्रथम

विचार यावयास पाहिजे कीं पुढें काय? राज्य निर्मिती हे कांहीं खरे साध्य नव्हे तर हे एक जनतेच्या जीवनांतले प्रश्न सोडविण्याचें साधन आहे. या साधनांचा वापर जितक्या चांगल्या तऱ्हेनें आपण करूं तितके सुखी समाज जीवनाच्या ध्येयाकडे अधिक जलद गतीने आपण जाऊ शकू. यासाठीं हें साधन कोणत्या भावनात्मक वातावरणांत निर्माण झालेलें आहे हें ओळखलें पाहिजे. महाराष्ट्र निर्मिती ही एक आपली अस्मिता आहे आणि त्यांतून सर्वांचे मंगल करणे हें ध्येय आहे. हे करत असतांना एक प्रमुख गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, महाराष्ट्र हा या भारताचा एक भाग आहे. आपली भारतनिष्ठा आणि महाराष्ट्रनिष्ठा या पूरक बनल्या पाहिजेत. महाराष्ट्राच्या भावनेंत वहात जाताना राष्ट्रनिष्ठेला तिळमात्र धक्का लागतां कामा नये. इतकेच नव्हे तर या दोन निष्ठांमध्यें तर तम असा विचार करण्याची कधीं वेळ आलीच तर राष्ट्रनिष्ठेला प्राधान्य दिले गेले पाहिजे; हे माझ्या विचारांचे सूत्र पूर्वीं होते तें आजहि कायम आहे. आणि म्हणून द्विभाषिक विभाजनाची वाटचाल करतांना मी 'वाटाघाटी' हाच एक मार्ग अनुसरला. मुंबई ही एक महत्वाची व मानाची गोष्ट लक्षांत ठेवून चर्चा केली आणि आज मुंबईसह विदर्भ मराठवाडा विभागासह महाराष्ट्र निर्माण होत आहे. आपली मूळ मागणी प्रामुख्याने केलेल्या गोष्टीसह पूर्ण होत आहे. त्यांत कांहीं ठिकाणी अपूर्णता राहिलेली आहे हे मला माहीत आहे पण एकशेएक टक्के यश मिळाले तरच ते यश नाहीं तर अपयश–पराभव असे मी मानीत नाहीं. रामदास स्वामीनी व्यवहारी उपदेश करतांना सांगितलेली ओवी मला आठवते. ते म्हणतात,

"आपणांस सर्वच कांहीं मनासारखे सदैव भेटत गेले तर आपण सर्वच जण राजे झालो असतो. पण तसे होत नाहीं म्हणून आपण सर्व राजे नाहीं." आपल्या संसारांत आपणाला मार्ग काढावयाचा असतो. या दृष्टीनें मला एक महत्त्वाचा विचार आपणासमोर मांडावयाचा आहे. आपण महाराष्ट्र मागितला. तो कसा हवा, त्यांत काय काय हवे त्याची कल्पना सांगितली. नकाशे मांडले आणि आज सर्व प्रमुख मागण्यासह महाराष्ट्र

येत आहे. त्याची चाहूल आपणाला ऐकू येऊं लागली आहे. तरीहि कांहीं मंडळी जे येत आहे ते जाणून घेण्यापेक्षां आणि आपला विजय होत आहे हे ओळखण्यापेक्षां जे कोठे लहानसे मिळालेलें नाहीं त्याचाच जप करीत बसली आहेत. मला त्यांना आणि आपणा सर्वांना असे विचारावेसें वाटते कीं अशी सदैव हताश पराभवाची पकड आपल्या मनावर आपण किती दिवस राहूं देणार? नेपोलियन बादशहाने इंग्रज जनतेबद्दल एकदा म्हटलें होते कीं, "या इंग्रजांना आपला पराभव कधीं झाला हेंच समजत नाहीं". त्यांत थोडा बदल करून मला महाराष्ट्राबद्दल म्हणावेसें वाटते कीं आपण सदैव लढ्याच्या वातावरणांत रहातो. आपला 'विजय' झालेला आहे हेंच आपल्या लक्षांत येत नाहीं. आज खरी गरज आहे कीं तीन कोटी जनतेचा-मराठी जनतेचा महाराष्ट्र एकत्र येत आहे. त्या महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास साधावयाचा आहे. ही गोष्ट एकटी दुकटी व्यक्ति करूं शकणार नाहीं. मुख्यमंत्री आणि त्याचे दहापाच सहकारी यांच्या हातून हें काम होणारे नाहीं. तर तीन कोटी जनतेचे हात या कार्याला लागले पाहिजेत. विजिगीषु वृत्तीनें प्रत्येकाने उद्याचा भविष्यकाल उज्वल करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपणाला हवे होते ते आले आहे, आपण मिळविले आहे अशा विजयी मनाने पुढें पाऊल टाकले पाहिजे. अशावेळीं येथें कमी पडले तेथें तो तुकडा गेला अशा विफलतेच्या मानसिक अवस्थेच्या आहारी आपण जाता कामा नये. जनतेला त्या वैफल्याच्या अंधःकारांत लोटण्याचे काम कोणी करूं नये अशी माझी त्या सर्वांना आग्रहाची विनंती आहे. महाराष्ट्राला स्वतःचे स्थान निर्माण करावयाचे आहे त्याचबरोबर देशासमोर येणारे संरक्षणाचे प्रश्न वगैरे समस्या सोडवितांना आपले त्या राष्ट्राच्या जीवनांतले स्थान समर्थपणें सांभाळावयाचे आहे. महाराष्ट्र सर्वांगीणरितीने समर्थ बनेल तर आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्यास समर्थ होईल. हे काम एकाचे नाहीं तसेंच ते एखाद्या पक्षाचे नाहीं; ते सर्वांचे आहे. सर्व पक्ष पंथ लोकांचे ते काम आहे. अशा वेळीं पक्षोपपक्षांच्या कार्य कारणाचा आपण थोडा विचार केला पाहिजे. महाराष्ट्र निर्मितीकडे मी पक्षाभिनिवेशाने पहात नाहीं. याबाबतींत सं. म. समितीच्या कार्याचेहि मी मूल्यमापन करतो. गेल्या तीन वर्षांच्या कालांत ही महाराष्ट्र निर्मितीची

भावना जनतेमध्यें जागृत ठेवण्याचे काम समितीने केलेले आहे ही त्यांच्या जमाखर्चाच्या पानावरची जमेची बाजू आहे. मी ती आनंदाने मान्य करीत आहे. पण राज्य मिळविणें आणि चालविणें यांत अंतर आहे.त्याचा सर्वांनीं विचार केला पाहिजे.

## सुस्थिर विचार–नेतृत्व–राजकारण

राज्याचा कारभार करण्यास सुस्थिर–विचार, स्थिर--नेतृत्व आणि निश्चित ध्येयाकडे जाणारे स्थिर राजकारण असावे लागते. राज्याच्या जीवनांत ही गोष्ट कायमची आणि अधिक महत्वाची आहे. विधायक वृत्तीच्या संगोपनानें तें काम साधणार आहे. नुसत्या कांहीं व्यक्ती व कांहीं पक्ष यांच्यावरच हें काम सोपवून भागणार नाहीं तर समाजांत या राजकीय क्षेत्रांपासून प्रत्यक्षपणें भाग न घेतां दूर रहाणारे विचारवंत अनेक असतात त्यांचेहि हे काम आहे. विधायक वृत्तीनें उद्याच्या महाराष्ट्र निर्मितीला हातभार लावा असें मी सर्वांना आवाहन करतो तेव्हां त्या निर्मितीच्या माझ्या कल्पना काय आहेत आणि त्यांत सर्वांनीं विधायक वृत्तीनें पाऊल टाकावे म्हणजे काय हें मी थोडे अधिक विस्तारानें स्पष्ट केलें पाहिजे. माझ्या मनांतल्या विचार आणि चिंतनांतून निर्माण झालेलें चित्र आपणापुढें ठेवले पाहिजे. त्या मार्गात मला दिसणाऱ्या समस्या निर्भयपणें व स्पष्टपणें आपणासमोर मांडल्या पाहिजेत. सर्वांच्या विचारमंथनांतूनच त्या समस्या सोडविण्याचा मार्ग आपणाला दिसणार आहे. हा आराखडा समोर न मांडता प्रवास सुरू केला तर तो आंधळा प्रवास होईल. कांहीं तरी लपवून छपवून थबकत असा हा प्रवास मला करावयाचा नाहीं.

## आपणापुढचे तीन प्रश्न

माझ्या मताने आपल्या समोरच्या प्रश्नांचे स्वरूप त्रिविध आहे. राजकीय, सामाजिक आणि आर्थिक अशा तीन क्षेत्रांतील त्या समस्यांचा आपणाला विचार करावयास हवा. राजकीय क्षेत्राचा विचार मनांत आला कीं पहिली गोष्ट आठवते ती उद्याच्या महाराष्ट्रांत येणाऱ्या विदर्भ

मराठवाडा या विभागांची. आजपर्यंत हे मराठी मुलुख इतिहासकालांत निरनिराळ्या परिस्थितींमधून गेलेले आहेत. आमच्या मराठीचें माहेरघर मराठवाडा हैद्राबादच्या निजामी मुलखांत वर्षानुवर्षे दुर्लक्षित अवस्थेंत राहिले होते. विदर्भाचा मराठी प्रदेश, त्या काळच्या इंग्रज राज्यकर्त्यांनी मध्यप्रदेश राज्य निर्माण केलें, त्यांत घातला गेला. इंग्रज राज्य जसें मिळवित गेले तसे ते कारभार करीत गेले. आपला मराठी मुलुख तिकडे गेला, वाढला. त्या मानाने अंतर निर्माण झाले आणि आज हा सर्व मराठी प्रदेश एकत्र येत असतांना गतकालाचे संस्कार व स्मृती म्हणून कांहीं शंका कुशंका निरनिराळ्या विभागांत रेंगाळत रहाणे स्वाभाविक आहे. तशा त्या भावना कायम आहेत, त्याचे प्रतिध्वनी आपणाला ऐकावयास येतात हें सत्य नाकबूल करण्याचे कारण नाहीं. त्याचबरोबर या दोन्ही भागांतील अनेक विचारवंतानी दूर दृष्टीनें उद्याच्या महाराष्ट्रांतच आमचे भाग घातले पाहिजेत असें आग्रहाने सांगितले होते हेहि अभिनंदनीय दृष्य आपणास पहावयास मिळाले आहे. आमच्या मंत्रिमंडळांतील विदर्भ मराठवाड्यांतले सहकारी श्री. गोपाळराव खेडकर प्रभृती मित्र, नागपूरची श्री. कन्नमवार, तिरपुडे वगैरे मंडळी आणि मराठवाड्यांतील स्वामी रामानंद तीर्थ, सावनेकर प्रभृती लोकांनीं मराठी राज्याच्या मागणीमागे खंबीर भूमिका घेतली. या सर्व नव्याने एकत्र येणाऱ्या मराठी विभागाचा एकसंध महाराष्ट्र निर्माण करण्याची गोष्ट राजकीय क्षेत्रांत मला प्रामुख्याने आठवते. या सर्व भागांतील जनतेची मने भावनात्मकरितीने एकसंध झालीं पाहिजेत. महाराष्ट्राच्या चित्रांत त्यांना सर्वांना आपलें प्रतिबिंब दिसलें पाहिजे; त्यांच्या शंकाकुशंका काढून टाकण्याचे कार्य तुम्हा आम्हाला प्रथम हातीं घ्यावयाचें आहे. त्यांच्या मनांत संशय आले आणि त्यांनी कांहीं उद्गार काढले तर आईच्या वात्सल्याने आणि मोठ्या भगिनीच्या स्निग्धतेने, रेशमाच्या मऊपणानें त्या शंका सोडविल्या पाहिजेत. सातारा, कोल्हापूर, पुण्याने मानता कामा नये कीं नागपूर औरंगाबाद हे दूरचे कोणीं आपल्या महाराष्ट्रांत येत आहेत. त्या भागांतील लोकानीहि आपण कोठें जात आहोत असे मानू नये. एका

घरांतल्या वर्षानुवर्षांच्या कृत्रिम भिंती आतां नाहीशा होत आहेत या भावनेने सर्वांनी आगामी महाराष्ट्राकडे पाहिले पाहिजे.

## पक्षीय राजकारण

महाराष्ट्राच्या राजकारणांत दुसरा प्रश्न सं. म. समितीच्या निमित्तानें निर्माण झाला आहे. त्याचा आपण सांगोपांग निर्विकार मनाने विचार केला पाहिजे. मी या प्रश्नाचे स्वरूप आपणापुढें मांडणार आहे; तें अगदीं पक्षातींत दृष्टीनें आणि राजकाणाचा एक व्यासंगी विद्यार्थी या दृष्टीनें मांडणार आहे. आपल्या प्रस्तुत राजकारणांत समितीला एक विशिष्ट कार्य होते. ते त्यांनीं केलेले आहे हे मीं खुल्या मनाने मान्य करतो. पण त्याचबरोबर राजकीय क्षेत्रांत कायमचे चिरस्थाई असें राजकारण करावयाचे असतांना जे पक्ष निर्माण करावे लागतात ते केवळ आंदोलनें आणि चळवळी एवढेंच कार्यक्रम पुढें मांडून निर्माण होऊं शकत नाहींत. स्वातंत्र्य-पूर्व कालांत राजकीय पक्षांचे स्वरूप तसे असले तरी चालले असते. पण स्वातंत्र्योत्तर कालांत निव्वळ विशिष्ट प्रश्नावरच्या आंदोलनासाठीं पक्ष ही गोष्ट यशस्वी होऊं शकणार नाहीं. आतां जनतेच्या जीवनांतले प्रश्न हातीं घेऊन कांहीं निश्चित कार्यक्रमाची आंखणी करून राजकीय पक्षांनीं पुढें आले पाहिजे. असा कार्यक्रम आणि तो कार्यक्रम शासन संस्थेमार्फत पार पाडण्या इतकी शक्ती ही राजकीय पक्षांची कसोटी आहे. मला नाइलाजानें सांगावे लागते कीं या कसोटीवर महाराष्ट्रांतली सं. म. समिती आतां टिकूं शकणार नाहीं. ते नव महाराष्ट्र निर्मितीचे कार्य समिती करूं शकणार नाहीं. तिचें सर्वपक्षीय स्वरूप आंदोलनापुरते मर्यादित क्षेत्रांत उपयुक्त ठरले असेल पण सुसूत्रपणें राजकारणाचा गाडा हांकण्यास ही सर्वपक्षीय बांधणी उपयोगी पडणारी नाहीं. या समितीमध्यें कांहीं चांगल्या जाणत्या व्यक्ती आहेत. माझा त्यांचा चांगला स्नेह आहे. मी त्यांचे मोठेंपण जरूर ओळखतो आणि मान्य करतो. पण त्यांची समिती ही एक राजकीय पक्षाची फळी म्हणून विचार करूं लागलों कीं मला त्यांतील उणीवा स्पष्ट दिसतात. मी स्पष्टपणें आपणापुढें माझें मत मांडले पाहिजे. चळवळी-

साठींच निर्माण झालेल्या संघटनाकडून कोणताहि विधायक कार्यक्रम पार पाडला जाणें शक्य नाहीं असें माझें ठाम मत आहे. समितीमधील पक्षोपपक्षांचा विचार करतांना मला तेथें आघाडीवर उभा असलेला कम्युनिस्ट पक्ष दिसतो, कम्युनिस्टांचा भर त्यांच्या विचार सरणीच्या आंतरराष्ट्रीय निष्ठेवर असतो. महत्त्वाच्या क्षणाला तो राष्ट्रीय निष्ठेशीं सुसंगत राहूं शकत नाहीं असा आपला ताजा अनुभव आहे. आंतरराष्ट्रीय निष्ठेशीं सुसंगत अशी राष्ट्रीय निष्ठा असला भोंगळभाव मनाशी घट्टपणें ठेवणारे कम्युनिस्ट तेथें आहेत; त्यांची एकसंध आघाडी कधींच होऊं शकणार नाहीं. कम्युनिस्टांच्या या संयुक्त आघाडीच्या पावित्र्याचा अनुभव आपल्या देशाला अनेकवेळा आलेला आहे. या लोकांची राजकीय नीति पाहिली कीं मला इंग्रजींतल्या एका प्रसिद्ध म्हणीची आठवण होते. ही मंडळी Running with the hare and haunting with the hounds या म्हणींतल्या शिकारी कुत्र्याप्रमाणें वागतात. प्रथम कांहीं दिवस सशाच्या कळपांत शिरून ते त्यांच्या सारखेच पळत रहातात. इतरांना वाटूं लागते हे आपल्यापैकींच आहेत आणि वेळ येतांच ही मंडळी आपले रूप प्रगट करून त्या सशांची शिकार करतात! कम्युनिस्टांव्यतिरिक्त इतर पक्ष अशा संयुक्त आघाडींत जे शिरतात त्यांच्या पुढाऱ्यांना मी नेहमी सांगतो कीं कम्युनिस्टांचा एक हात तुमच्या खांद्यावर टेकलेला असलासा दिसला तरी दुसऱ्या हातानें ते तुमचे अनुयायी पळवीत असतात. आणि संयुक्त आघाडींत कांहीं काळ वाटचाल केल्यानंतर तुम्हाला आढळते कीं आपल्या मागें असलेले अनुयायी आतां कम्युनिस्टांच्या मागे गेलेले असून पुढारी विना अनुयायी अशी आपली स्थिति झाली आहे!! अशा या कम्युनिस्टांची संगत करतांना आपले पाऊल पारखून घेतले पाहिजे. राजकीय कारभाराच्या संदर्भात मला असा विचार आपणापुढें मांडावयाचा आहे कीं पुढच्या काळांत आपणाला अशा एखाद्या राजकीय पक्षाची निवड करावयाची आहे. आपण कोणत्या पक्षाची निवड करावी हा आपला प्रश्न आहे. मला त्या निवडी मागचे सूत्र सांगावयाचे आहे कीं, महाराष्ट्राचे नवजीवन व्यवस्थित रितीनें पुढें न्यावयाचे असेल तर निश्चित कार्यक्रमाची स्थिरपणानें अंमलबजावणी करूं शकेल अशा पक्षाची आपणाला निवड

करावी लागेल. मी केवळ माझी शिफारस म्हणून कॉंग्रेस पक्षाचे नांव आपणापुढें विचारासाठीं ठेवीन. आपला निर्णय होईल तो मला चालेल. दुसरा एखादा पक्ष आपणाला अधिक मान्य झाला तरी माझा राग नाहीं कारण ही निवड करण्याचा हक्क लोकशाहीनें तुम्हाला दिलेला आहे. पण या बाबतचा माझा कौल मी आपणास सांगण्याची परवानगी घेतो. असे करीत असतांना मी आज त्या पक्षाचा आहे आणि त्या पक्षामार्फत उद्याच्या मुख्यमंत्री पदावर दृष्टी ठेवून बोलत आहे असे कृपा करून मानू नका. या मुख्यमंत्रीपदाचे सुखदुःख मी आतां पुरेपूर ओळखले आहे. पण उद्याच्या मराठी समाजाचे कल्याण ही एकच कसोटी लावून माझा निर्णय मी घेऊ पहातो, तेव्हां मला कॉंग्रेस पक्षाशिवाय दुसरा पक्ष दिसत नाहीं. या निर्णयाला येताना कॉंग्रेस पक्षांतील गुणदोषांची मला जाणीव असते. त्या पक्षाच्या चुका आणि अपूर्णता मी दृष्टीआड करीत नाही पण ते सर्व विचारांत घेऊनहि आज कॉंग्रेस पक्षच देशाचे आणि महाराष्ट्राचे जास्तित जास्त भले करूं शकेल या निर्णयाला मी आलो आहे. माझे मत केवळ विचारासाठीं मी आपणापुढें मांडले आहे.

## सामाजिक प्रश्न

महाराष्ट्राच्या जीवन आणि राजकारणाबरोबरच कांहीं सामाजिक समस्या वाटचाल करीत आल्या आहेत. त्या प्रवासांत आपण मोठ्या नाजूक अवस्थेतून जात आहोंत असें मला वाटते. महाराष्ट्राचें सामाजिक जीवन नजरेसमोर आले कीं अनेक विचार मनांत गर्दी करून येतात. एकदां केव्हां तरी ते खुलेपणानें बोलले पाहिजेत असें मला वाटते. या सांगली शहरातला योगच मला मोठा नवलाचा वाटतो. जेव्हां जेव्हां माझ्या मनांत कांहीं अधिक महत्त्वाचे विचार खुलेपणानें बोलावयाचे असतात तेव्हां सांगली शहरांतल्या सभेची संधि समोर येते आणि येथें मी मन खुलें करतो. असें पूर्वीं घडलेलें आहे. आजहि घडत आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाची चर्चा करतांना कांहीं जणांनीं त्याचे वर्णन "भंगलेले मन" असें केलेले आहे. मला तें समजत नाहीं. विचारांचे काहूर माजते. पण

तसें म्हटलें जाते हे सत्य मान्य करून त्याचा मी विचार करू लागतो. त्या मागची विचार परंपरा शोधू लागतो. मला असें दिसतें कीं महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार आला कीं सत्तेचा प्रश्न निर्माण होतो. आणि त्या संदर्भात जातीय विचारांचा वापर चुकीच्या पद्धतीनें केलेला आढळतो. आपण गेल्या कांहीं दिवसांतल्या घटना पहा. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या आवाजाचा पुकार होत होता तो एकजिनशीपणानें केला जात होता. त्या काळांत मला शिव्या श्राप मिळत होते तरीहि या पुकारामागें जातीभेदातींत भावना व्यक्त करणारा एका मराठी मनाचा तो आवाज आहे हे ऐकून मलाहि बरें वाटत असे. पण गेल्या दोन महिन्यांत आपणच एकमतानें मागितलेल्या संयुक्त महाराष्ट्राचे पदरव ऐकू येऊं लागल्याबरोबर भंगलेल्या मनाचे पडसाद ऐकूं येऊं लागले. माझे परममित्र नागपूरचे श्री. माडखोलकर यांच्यासारख्या थोर विचारवंताला तसा प्रश्न आपल्या लेखांत उपस्थित करावा लागला. उद्याचे महाराष्ट्र राज्य '**मराठा राज्य होणार कीं मराठी** राज्य होणार' असा त्यांनीं प्रश्न विचारला आहे. या प्रश्नाचें माझें उत्तर एकच एक आहे. महाराष्ट्राचें राज्य 'मराठा' राज्य होणार नाहीं; ते मराठी राज्यच होईल. जोंवर माझ्या हातीं सत्ता सूत्रें आहेत तोंवर मी मराठी राज्य याच भावनेची जोपासना करीन. माझे हातून तें घडत नाहीं असें क्षणभर वाटलें तरी मराठा जातींत जन्मलेला एक म्हणून मी त्या स्थानाचा त्याग करीन. त्या ध्येयानें दूर होण्यांतहि मी आनंद मानीन. पण मला कळत नाहीं कीं 'मराठा' या शब्दाला जातीय वाचक अर्थ अजून आपण का चिकटवितो. मी या राजकीय प्रांगणांत गेल्या तीस चाळीस वर्षांतले शेकडो मराठा तरुण दाखवून देईन कीं ज्यांना मराठा या शब्दाचें जातीयवादी आकर्षण नाहीं. महाराष्ट्रांतला तो मराठा अशी त्यांची सुबोध साधी व्याख्या आहे. माझ्या भोंवती असलेल्या शेंकडो कार्यकर्त्यांच्या जीवनांत तो जातीयतेचा धागा बिलकूल नाहीं असा माझा विश्वास आहे. मी त्यांच्या वागणुकीबद्दल आव्हानपूर्वक ग्वाही देण्यास तयार आहे. याबाबदचे संशय आता टाकून दिले पाहिजेत. या संशयी पत्रकारांना मी इशारा देऊन वैऱ्याची रात्र आहे, सावध असें मराठी जनतेला सांगत नाहीं पण ही मंथरेची संशयी पेरणी आहे त्यापासून

सावध असा सल्ला मात्र जरूर देऊं इच्छितों. त्याच बरोबर अशा शंका का निर्माण होतात याचाहि विचार केला पाहिजे. मला वाटते कीं आजवर बुद्धीची सेवा करण्याचे काम ज्यांनीं केलें आणि समाजाला नेतृत्व दिलें त्यांना आता नव्या जमान्यांत संख्याबलानें घेतल्या जाणाऱ्या निर्णयाची भीति वाटूं लागली असावी. जेथें संख्येला महत्व आणि शक्ती जादा झाली तेथें बुद्धीचा व गुणांचा मान राखला जाईल कीं नाहीं अशी त्यांना शंका वाटत असावी. अशी शंका येणें थोडेसे रास्त व स्वाभाविक आहे. या परिस्थितीचेच वर्णन महाराष्ट्र समाजातले भंगलेले मन म्हणून केलें जातें असे दिसते. मला त्यांना सांगावेसे वाटते कीं उद्याच्या महाराष्ट्रांत गुणाची अवहेलना केली जाणार नाहीं. कोठल्याहि क्षेत्रांत सत्तास्थानांत निवडणुकींत गुणवत्तेला महत्व कायम टिकविले जाईल अशी माझी ग्वाही आहे. त्याशिवाय महाराष्ट्राचें आपण भलें करूं शकणारच नाही अशी माझी श्रद्धा आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनांत दुसरा तितकाच महत्वाचा प्रश्न नवबुद्धांचा आहे. महाराष्ट्रांत डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी एक नव जागृती निर्माण केली आहे. आपण काँग्रेसजनांनी व सर्वांनीच विचार केला पाहिजे कीं हजारों वर्षें आपल्या समाजाचा एक घटक अंधारात होता तो आता जागृत झाला आहे. त्याची जिद्द, जागृती, तडफ आपण ओळखली पाहिजे. त्यांचे मांगणे हें दया दान म्हणून त्यांना देतां कामा नये. तें दानाच्या स्वरूपांत त्यांना नको आहे. जिद्दीच्या जागृत मनाची हक्काची मागणी म्हणून त्यांचे माणुसकीचे अधिकार त्यांना आनंदाने दिले पाहिजेत. भले त्याचा पक्ष रिपब्लिकन पक्ष असो कीं दुसरा कोणता असो. मोठ्या शहरापेक्षां खेड्या खेड्यामधून या समतेच्या भावनेची आज अधिक गरज आहे. मला नेहमी वाटते कीं महार वतनांचा प्रश्न डॉ. आंबेडकरांच्या हयातीत आपण सोडवू शकलो असतो तर हा समाज आज दुखावलेला असा आढळतो तो तसा राहिला नसता. मराठी समाजांतली तिसरी समस्या म्हणजे भूगोलाने निर्माण केलेली विविधता ही आहे. एक शेतकरी जीवन म्हटले कीं कितीतरी प्रकार आढळून येतात. वरवर पहाता शेतकरी जीवन म्हणून एकाच तऱ्हेचे चित्र नजरेसमोर उभे रहाते पण आपण

आपली दृष्टि या नव महाराष्ट्राच्या चतुःसीमाकडे टाकली तर माझ्या म्हणण्याचा अर्थ नीट समजेल. आपण आता विंध्य सातपुड्यापासून बेळगाव कारवारपर्यंत महाराष्ट्र म्हणतो. दोन सातारा आणि कोल्हापूर म्हणजे महाराष्ट्र नव्हे. एकटे शेतकरी जीवन घेतले तरी त्यांतील विविधता मनाला कळेल. त्यांचे निरनिराळे प्रश्न लक्षांत येतील. ठाणे कुलाब्याचा शेतकरी आहे. रत्नागिरीची शेती म्हणजे धनधान्याची शेती नाहीं; तेथें फळबागांच्या शेतीची जोपासना आणि वाढ त्या शेतकऱ्याला करावी लागते. फळबागांचे त्यांचे प्रश्न आहेत. खानदेशला आरशासारखी शेती करणारा पाटील वर्ग आहे, वसईजवळची आईची सेवा पंचकळशी ख्रिश्चन शेतकरी करतो आपल्या महाराष्ट्राच्या नद्यांच्या प्रवाहातील जीवनाची वैशिष्ट्यें आहेत. या सर्वांचे बाह्य स्वरूप विविधतेने नटलेले असले तरी हा काडीतून सोने काढणारा कष्टकरी बहुजनसमाज म्हणजे आपला शेतकरी समाज होय. उद्याच्या महाराष्ट्रांतली ही भावना आपण समजून घेतली पाहिजे.

## तिसरी समस्या आर्थिक क्षेत्रांतली

आर्थिक क्षेत्रांतले माझ्या दृष्टीनें महाराष्ट्राचे प्रश्न म्हणजे (१) शेती (२) उद्योगधंदे व (३) मध्यमवर्गीयांचे प्रश्न असे त्रिविध आहेत. महाराष्ट्रांतील शेतीचा प्रश्न घेतला तरी त्यांत किती प्रकारची विविधता आढळते. कोकणांतली शेती निराळी, देशावरची निराळी. रत्नागिरी सारख्या जिल्ह्यांत शेतीचा प्रश्न सोडविण्याचा विचार केला कीं आढळते तेथील प्रश्न शेतीचा नसून फळबागांचा आहे. आपल्या रत्नागिरी जिल्ह्यानें महाराष्ट्राला हापूस आंबे आणि बुद्धिवान माणसे पुरविली आहेत. दुसरी बागाइत शेती. तिसरी जिराइत शेती. महाराष्ट्राच्या या शेतीकडे नजर टाकल्याबरोबर जिराइत शेतीची समस्या पुढें उभी रहाते. वरच्या बाजूला यावल नांदगांव पासून दक्षिणेस जतपर्यंत असा एक पट्टा आढळतो कीं जेथें फक्त पंधरा इंच पाऊस पडतो. या भागांतल्या शेतकऱ्याची शेती समृद्ध करण्याला बंडिंग सारखे कार्यक्रम हातीं घ्यावे लागतील. छोटी तळी, झिरपणीचे तलाव

शक्य असतील तेथें घ्यावे लागतील. अशा भागांतील शेतकऱ्यांना मदती-दाखल सर्व्हिस को-ऑपरेटिव्हज् सारखी उपाययोजना करावी लागेल. बागाइत शेतकरी धनिक पिके ( मनिक्रॉप ) काढतात. त्या पिकाची पुढची रूपांतरे करण्याची सोय उपलब्ध हवी. उसाच्या शेतकऱ्याला गुळाचे भाव चढले उतरले अशा अनिश्चिततेला तोंड द्यावे लागू नये. त्याच्या उसाची साखर सहकारी कारखान्यांतून झाली तरच त्याच्या मालाचे पुरेपूर मोल त्याच्या पदरात पडेल.

शेतकऱ्याला हंगामा व्यतिरिक्त वेळात पूरक काम मिळवून देणें व भूहीनाना रोजगार देणें या गोष्टीचा विचार राज्याचा औद्योगिक आराखाडा करताना करावा लागतो. उद्याच्या महाराष्ट्रांतील औद्योगिक वाढीव स्वरूप मोठे आणि विविध प्रकारचे आहे. मुंबई सारखे मोठे औद्योगिक शहर महाराष्ट्रांत असल्यानें हें राज्य औद्योगिक आघाडीवर आहे असा सर्वांचा समज होतो परंतु तशी स्थिती नाहीं. महाराष्ट्रांत उद्योगधंद्याच्या वाढीला अद्याप खूप वाव आहे. विशेषतः कारखानदारीचे स्वरूप मूलभूत उद्योगवाढीचे असावें. नागपूर विभागांत लोखंडाच्या खनिज संपत्तीचे आणि—कोकणांतील बॉक्साइट, लोखंड या खाणींचा उपयोग करून कारखाने काढले पाहिजेत. दैनंदिन जीवनांत उपयोगी वस्तूंचे उत्पादन ही खरी कारखानदारी नव्हे. ज्या लोखंडापासून नवी नवी यंत्रसामुग्री तयार होऊन त्यावर जीवनोपयोगी कच्च्या मालाचा पक्का पदार्थ तयार होईल अशा तऱ्हेच्या औद्योगिक विकासाला महाराष्ट्रांत भरपूर वाव आहे.

शेतकऱ्याला मोकळ्या वेळांत पूरक काम देण्याचा मी वर उल्लेख केला. त्यासाठीं गृहोद्योग, छोटेछोटे कारखाने सर्वत्र पसरले पाहिजेत. कोयना योजनेसारखी मोठी विद्युत योजना आता पूर्ण होत असताना त्या विद्युत शक्तीचा वापर लहान लहान शहरांतील उद्योग वाढविण्यासाठीं करावयाचा आहे. या छोट्यामोठ्या कारखानदारीचा विचार करताना आपल्या महाराष्ट्राबद्दल जो एक प्रचिलित समज आहे त्याचा मला उल्लेख करावासा वाटतो. असे नेहमीं म्हटले जाते कीं महाराष्ट्राची बुद्धी केवळ नौकरी-

पेशाच्या उपयोगाची आहे ! आमचे शिक्षण हें नौकरी व कारकून तयार करणारे आहे असें म्हटलें जाते. मला तसे वाटत नाहीं. इतिहासकालाकडे नजर टाकली तर असे दिसेल कीं महाराष्ट्र बुद्धीवादी आहे. काळाची जशी गरज तसा तो पेशा स्वीकारतो. इतिहास काळात लढाऊवृत्तीला वाव होता तर महाराष्ट्रांतल्या मराठा, ब्राह्मण, महार सर्व जमातींनी समशेर गाजविली आहे.

इंग्रजांच्या अमदानीत कारभार नौकरीला तेज आले तेव्हां शिक्षित महाराष्ट्र तिकडे वळला. आता औद्योगिक क्रांतीचा काल आहे हे ओळखून महाराष्ट्रीय बुद्धीवादी त्या क्षेत्रांतहि महत्वाची कामगिरी बजावू शकेल. मला त्यात तिळमात्र संशय नाहीं. लक्ष्मणराव किर्लोस्करांच्या सारख्यांची उदाहरणें ही प्रेरणा स्पष्ट करतात. वैशिष्ठ्य असें आहे कीं प्रतिकूल परिस्थितीतहि केवळ बौद्धिक कौशल्यांची मंडळी आपले धंदे यशस्वी करून दाखवितात. कोल्हापूर भागांत खरे पहाता यांत्रिक कारखानदारीला वाव नाही परंतु कुशल कारागीरि करणारी मिस्त्री मंडळी ते उद्योग धडाडीने करतात.

म्हणून मराठी मनाची प्रेरणा जरूरीच्या गोष्टी हस्तगत करण्याची आहे हे आपण समजून घेतले पाहिजे. आपले विचार आणि शिक्षणाची दिशा औद्योगीकरणाकडे आता वळवली पाहिजे. प्राथमिक दुय्यम शिक्षणापासून विद्यार्थ्यांची प्रवृत्ती कशी आहे त्याचा अंदाज घेऊन दिशा दाखविली पाहिजे. तांत्रिक शिक्षणाच्या शाळा अधिक संख्येनें आपणाला काढाव्या लागतील. नव्या महाराष्ट्रात सर्व विभागात शिक्षणाची दिशा या तांत्रिक शिक्षणाकडे वळविली पाहिजे. औद्योगिक प्रेरणा नव्या पिढीला दिली पाहिजे.

आर्थिक क्षेत्रांतील गरजांची चर्चा आपण पुष्कळ वेळा केलेली आहे; त्याचा मी अधिक विस्तार येथें करीत नाही.

मला एकच गोष्ट पुन्हा सांगावयाची आहे कीं उद्याचा महाराष्ट्र येत आहे. त्या नव महाराष्ट्राचा भाग्योदय मला माझ्या नजरेसमोर दिसत आहे. त्यासाठीं थोडी लांबची वाटचाल आपणाला करावयाची आहे. वाट अवघड आहे, कष्ट कमी नाहींत पण यश निश्चित आहे. माझी यशा-बद्दल नितांत श्रद्धा आहे. शेवटीं आपण विजयी होऊं याबद्दल मला कधींच शंका नव्हती. तीन कोटी मराठी जनतेचे मन मी चांगले ओळखतो. मी आशा करतो कीं ह्या नव महाराष्ट्राची उभारणी करण्यासाठीं आपण सर्वजण एक दिलाने विजिगिषु वृत्तीने हात घालू या. आपण त्यांत यशस्वी आणि यशस्वीच होऊं.

◆◆◆◆

"लोकशाहींत सरकारवर टीका होणें हें कारभार सुधारण्याच्या दृष्टीनें आवश्यक आहे. पण ती टीका विधायक आणि तात्त्विक असावी. विघातक आणि वैयक्तिक स्वरुपाची नसावी."

# माझ्या कल्पनेंतील खेडें

***

माझ्या कल्पनेंतील खेडें म्हणजे केव्हां एका काळीं लोक शेती करूं लागले आणि तिच्याभोंवतीं राहूं लागले म्हणून बनलें तें खेडें नाहीं; किंवा ओढ्याच्या कांठीं शीळ घालीत हिंडणारा आणि कोकिळेची साद ऐकत फिरणारा कवि कल्पना करतो तें खेडें नाहीं, तर देशाच्या जीवनांत आपलें स्थान घेणारें, सदैव विकास करणारें, या टोंकापासून त्या टोंकापर्यंत जीवनाचे पडसाद ज्याच्यावर पडत आहेत आणि जे आपल्या उत्पादनक्षमतेनें इतरांचें लक्ष आपल्याकडे वेधून घेत आहे असें वर्धिष्णु गांव हें माझ्या कल्पनेंतील खेडें आहे.

त्या विकासक्षम वृत्तीच्या मागोमाग इतर सर्व गोष्टी आपोआप येतील असा माझा विश्वास आहे.

***

माझ्या कल्पनेतलं खेडें हें सांगत असताना कवीच्या कल्पनेतलं खेडें रंगवू कीं आपलें खेडेगाव कसं असावें अशी आपली खेड्यासंबंधीची जी कल्पना आहे त्याच्या संबंधात माहिती सांगू हा प्रश्न आहे. असा साधारणतः सर्वांच्या पुढें हा प्रश्न उभा रहातो. माझ्यापुढेंहि तो प्रश्न आहे. पण मी तुम्हाला ज्या खेड्यासंबंधीची कल्पना सांगेन तें खेडें कांहीं एकाद्या कवीच्या कल्पनेतलं खेडें असणार नाहीं. कारण मूळ खेडें ही गोष्ट, हिंदु-

स्थानच्या आर्थिक जीवनामध्यें आणि सामाजिक इतिहासामध्यें जी निर्माण झाली, ती कशी झाली याचा आपल्या मनाशीं आपण पहिल्या प्रथम विचार केला पाहिजे.

आपण अशी कल्पना करूं या कीं आज जिथं खेडें असेल तें खेडं कुणी-तरी सुरवातीला बनवलं असलं पाहिजे. कुणी तरी चार भटक्ये सुरवातीला त्या खेड्याच्या आवतीभोंवती जी शेती असेल ती शेती करण्याकारितां पहिले शेतकरी म्हणून आले आणि त्या खेड्याचे पहिले रहिवासी बनले असतील. तेथें रहायला आले असतील. ते एकमेकांच्या नात्याचे, जिव्हाळ्याचे, रक्ताच्या संबंधाचे असण्याची शक्यता आहे. ते सुरवातीला जेव्हां त्या खेड्यांमध्यें रहायला येऊन आपलं शेतीचं काम त्यांनीं सुरू केलं असेल, तेव्हां त्यांच्यामध्यें एक प्रकारचा भाऊपणा, बंधुबंधूचा जिव्हाळा वसत असण्याची शक्यता आहे. तें इतिहासकाळीं सुरू झालेलें खेडं, हें एक त्या वेळच्या आर्थिक जीवनांतली आवश्यकता म्हणून सुरू झालेलें खेडें, आज तसं खेडें राहिलें आहे कां ? तुमच्या माझ्या कल्पनेतलें खेडें कसें असावे यासंबंधी विचार करण्यापूर्वी या पहिल्या महत्वाच्या प्रश्नाचा आपण विचार केला पाहिजे.

तुमच्या माझ्या कल्पनेतलें खेडें कसें असावं अशी जी कल्पना आपण मांडणार आहोंत, तें खेडें तयार होताना त्याच्या पाठीमागे ही जी कल्पना आहे ती कल्पनाच इथं कशी साकार होईल आणि वस्तुस्थितीचे चित्र इथें कसें उभें राहील हा विचार खेड्याच्या कल्पनेचा विचार करताना प्रथम केला पाहिजे. आपण इंग्रजीमध्यें ज्याला कम्युनिटी असा शब्द वापरतो तो एकमेकांच्या सहकार्यानं, एकमेकांच्या जिव्हाळ्यानं जगण्यासाठीं एकत्र झालेला समूह असं जर समाजाचं वर्णन करायचं असेल तर त्या दृष्टीने आजची आमचीं खेडीं खऱ्याखुऱ्या अर्थानं समाज जीवन चालविण्याकरितां एकत्र आलेल्या लोकांचा समूह कशी बनतील, हा तुमच्या आमच्या समो-रचा महत्वाचा प्रश्न आहे. आणि आता माझ्यासमोरचे कल्पनेतलें खेडें जे मी सांगेन त्याच्यामध्यें ही कसोटी हा मध्य बिंदू असेल. मी माझ्या कल्पनेतलं चांगलं खेडें कसें ते सांगत असताना त्या कसोटीवरती माझ्या खेड्याची परिक्षा करायचा मी प्रयत्न करीन.

कवीच्या कल्पनेतलं खेडं तुम्हांला माहित आहे. ज्या खेड्याच्या कांठानं एकादा सुंदर झुळझुळ वाहणारा ओढा वाहतो आहे, त्या ओढ्याच्या काठच्या झाडावरती, मग कदाचित ती आंब्याची झाडं असतील, आणि ती मोहरलेली आंब्याची झाडं असतील; त्याच्यावरती कोकिळा कुहू कुहू करीत असतील. लांब कुठें तरी एक शेतकरी गाणं गात मोटवणावरती पाणी लावीत असेल. आणि मग त्याची कुणीतरी सखी साजणी भाकरी घेऊन येतांना तो पहातो आहे. असली काल्पनिक, मोहजंजाळांनीं भरलेली खेड्यासंबंधीची चुकीची स्वप्नाळू चित्रं मनाला कदाचित थोडा वेळ समाधान देणारी असली तरी ती वस्तुस्थिती होऊ शकत नाहीं, ही तुम्हां आम्हांला प्रथम जाणीव होते. आणि म्हणून जें खेडें निर्माण करायचे असा आपण प्रयत्न करतो आहोत, जे तुमच्या माझ्या कल्पनेंतलें खेडें व्हावे असा विचार मी सांगणार आहे, त्या माझ्या खेड्याची कल्पना थोडक्यांत अशी आहे.

ज्या खेड्यांतला समाज हा कांहीं तरी उत्पादक कामासाठीं एकत्र आला आहे आणि त्याचं ते उत्पादक कार्य त्याच्या गरजा भागविण्या-इतके समर्थ आहे, असं ते खेडं असलं पाहिजे. ज्या खेड्यांतला समाज आपले सगळे प्रश्न एकमेकांच्या जिव्हाळ्यानें आणि समजुतीनें सोडविण्यासाठीं एकत्र बसून त्याचा निर्णय करू शकतो असं पंचायतीचे जीवन जगणारे खेडें असं चित्र तुमच्या माझ्यापुढें असलें पाहिजे.

एक दुसरी महत्वाची चांगल्या खेड्याची कल्पना सांगत असतांना खेड्यासंबंधीं जो चुकीचा विचार तुमच्या आमच्या राजकीय आणि आर्थिक जीवनांत आजपर्यंत बोलला गेला आहे, त्याच्यासंबंधींचा माझा व्यक्तिशः एक विचार आपणासमोर मला मांडायचा आहे. तो म्हणजे स्वावलंबी खेड्यासंबंधींची कल्पना आजवर कांहीं एक भ्रामक कल्पना फार वेळा बोलली गेली आहे. फार पूर्वी कदाचित् या स्वावलंबी खेड्याची कल्पना व्यवहार्य असेलहि. परंतु आज शेतीचा धंदा हा केवळ राष्ट्रीय धंदा राहिलेला नाहीं. त्याच्या क्षितिजांची अंतरे वाढलेली आहेत. जे पिकते तें तेथेच खपतें असे नाहीं तर त्या धंद्यावर कांहीं आंतरराष्ट्रीय परिस्थितीचे परिणाम घडतात. असा शेती हा एक व्यापारी स्वरुपाचा धंदा झाला आहे. याच्या-कडे तुम्हाला, मला दुर्लक्ष करता येणार नाहीं. आणि ही जर गोष्ट खरी

असेल तर मग शेतीचा धंदा हा आजकालच्या औद्योगिक आणि व्यापारी जगांमध्यें किफायतशीर धंदा होईल हें पाहिलें पाहिजे. या व्यापारी तऱ्हेने चालविला जाणारा शेतीचा धंदा करणारा समाज हें खेड्यांतल्या लोकांच्या जीवनामागचे एक आर्थिक सूत्र आहे. या दृष्टीनें आम्हीं खेड्यांतल्या जीवनाचा विचार केला पाहिजे. आणि तो करीत असतांना माझ्या डोळ्यापुढें अशी मी कल्पना आणूं शकतो कीं तें खेडें आहे. ज्या खेड्यांतला शेतकरी आपला जो शेतीचा धंदा आहे, तो स्वतःला फायदेशीर होईल याचा विचार करून त्या धंद्याची कांहीं योजना आंखतो आहे. ती योजना करण्याकरितां लागणारे साधन त्याच्याजवळ आहे. शेतीचें आपलें काम तो रोज मिळणारी नवी नवी साधनं वापरून करीत आहे. शेतीच्या व्यवसायांत उदय पावणाऱ्या नव्या तत्वांचा उपयोग करून घेऊन, तो आपली शेती करूं शकतो आहे आणि त्याच्यासाठीं लागणारीं साधनं त्याच्याजवळ आहेत. त्या शेतकऱ्याला त्याच्या शेतीच्या धंद्यासाठीं आवश्यक अशीं बाकीचीं साधनें मिळताहेत. त्याला त्याच्या शेतीसाठीं पाणी मिळत आहे. त्याला आवश्यक तें भांडवल देणारी सहकारी सोसायटी तिथें आहे. त्यांच्या धंद्यातून निर्माण होणारा माल हा योग्य बाजारपेठेंत नेऊन त्याला योग्य तो फायदा मिळेल अशी सोय आहे. योग्य तो बाजारभाव मिळेल अशी शाश्वती देणारी एखादी सहकारी व्यापारी पेढी तिथें असेल. किंबहुना, आज आपण महाराष्ट्रांत एक नवीन जीवन निर्माण करूं पहात आहोत. त्याप्रमाणें शेतकरी जो माल निर्माण करतो, त्या मालाचा, त्या कच्च्या मालाचा पक्का माल बनवणारी कारखानदारी तोच उभी करू शकतो असें खेडें मला दिसत आहे. हें मी बोलत असतांना माझ्या डोळ्यापुढें महाराष्ट्रांत उभे राहिलेले सहकारी साखर कारखाने आहेत. शेतकरी आपल्या शेतीमध्यें ऊंस लावतो, त्याच ऊंसाचा पुढें उपयोग करून अशा तऱ्हेची सहकारी कारखानदारी तो उभी करूं शकतो आणि पक्का माल—साखरेचा—निर्माण करून तो स्वतःच्या कच्च्या मालाचा योग्य तो मोबदला पक्क्या मालातून मिळविण्याचा प्रयत्न करू शकतो आहे. हें सहकारी जीवन हें त्याच्या शेतीच्या धंद्याला आवश्यक आहे. या सहकारी क्षेत्रांतील अनेक जबाबदाऱ्याहि तो पार पाडू शकतो. अशा तऱ्हेचें चित्र ज्या खेड्यांमध्यें निर्माण होऊं शकेल, त्या दिवशीं

तुमच्या नि माझ्या सर्वांच्या कल्पनेतील खेडें तुम्ही आम्हीं निर्माण करू शकलो असें समाधानी चित्र मला नजरेसमोर दिसत आहे.

एकमेकांच्या वैरानं वसवलेले, दारिद्र्यानं निराश झालेले, आजपर्यंत एकसारखा कुणी तरी आपल्यावरती अन्याय केला या भावनेनी इतराकडे संशयानं पहाणारे असें गांव वसण्यापेक्षां एकमेकांकडं सहृदयतेनं मदत करण्याच्या भावनेनें पहाणारा बंधुबंधूंचा असा एक निराळा समाज खेड्यांतून आपल्याला उभा करावयाचा आहे. आज त्यांच्यामध्यें ती सहृदयता मनांत लपलेली आहे. त्यांच्यामध्यें आपल्या धंद्याकरितां लागणारं शहाणपणहि आहे. पण तें जाणिवेच्या अभावी लटके पडत आहे. त्यांच्या मनामध्यें सांस्कृतिक परंपरेंतून आलेला उदारपणाहि आहे. परंतु आर्थिक जीवनांतून निर्माण झालेल्यां निराशेच्या तो आहारी गेला आहे. दुबळेपणाची वृत्ती पकड घेऊन बसली आहे. ती घालवून टाकण्याकरितां एक सकस अशा तऱ्हेचें नवे आर्थिक वातावरण त्याच्याभोंवतीं निर्माण करणें हें माझ्या कल्पनेंतलें नवें गांव निर्माण करण्याच्या पाठीमागची महत्त्वाची गोष्ट आहे. आणि ही आहे माझ्या मनांतल्या स्वयंपूर्ण समर्थ खेड्याची कल्पना. जें आपलें प्रश्न तर सोडवितेच पण देशाच्या जीवनांतले एक स्वयंपूर्ण जबाबदार घटक बनते ते आजच्या युगाचे खेडें आहे. तो माझा गांव आहे.

( पुणें आकाशवाणीवरून )

◆◆◆

---

**राज्यकारभाराची कसोटी लोकांच्या समाधानांत आहे. कारभार यशस्वी झाला कीं नाहीं, राज्याच्या अधिकाऱ्यांचें काम चांगले झालें कीं नाहीं याची कसोटी लोकांना त्यापासून कितपत समाधान मिळतें यावर लागणार आहे.**

# ग्रामीण शिक्षणाची माझी कल्पना

***

**ग्रामीण शिक्षण म्हणजे कांहीं शिक्षणाचा एखादा नवा प्रकार नाहीं, तर जें शिक्षण घेतलें तरी तो सुशिक्षित आपल्या गांवापासून दुरावत नाहीं आणि पुन्हां सकस मनानें आपल्या गांवांत परत येऊन गांवच्या विकासाला वाहून घेण्याची त्याची प्रवृत्ति वाढविते तें शिक्षण म्हणजे मला हवें तेंच ग्रामीण शिक्षण अशी माझी व्याख्या आहे.**

***

ग्रामीण शिक्षणाची माझी काय कल्पना आहे, हें मी आज आपणांपुढें सांगितलें पाहिजे अशी अपेक्षा आहे. ग्रामीण शिक्षणासंबंधीच्या माझ्या कल्पना सांगण्यापूर्वी, शिक्षण म्हणजे काय याची थोडीफार कल्पना आपण समजावून घेऊं या. पुस्तक वाचलें म्हणजे येणारें ज्ञान याला शिक्षण असें समजण्याची एक मोठी प्रथा आहे आणि ती कांहीं अंशीं बरोबरहि आहे. परंतु खरें शिक्षण म्हणजे काय याचा एक अर्थ आपण सगळ्यांनीं आपल्या मनाशीं समजावून घेतला पाहिजे. मी माझ्या उपयोगासाठीं शिक्षणाची एक सरळ आणि साधी व्याख्या करून ठेवली

आहे. शिक्षण म्हणजे तें, कीं ज्यामुळें त्या व्यक्तीला स्वतःच्या भोंवतीं घडणाऱ्या गोष्टी आणि जगांमध्यें इतर घडणाऱ्या गोष्टी यांची कांहीं संगति लावतां येते, त्यांचा योग्य अर्थ समजावून घेतां येतो आणि त्यांचा परिणाम आपल्या जीवनावर काय घडतो, आपल्या व्यक्तिमत्वावर काय घडतो हें समजावून घेतां येतें आणि देतां येतें अशी जी गोष्ट आहे त्याला मी शिक्षण मानत आलों आहे. ही एक महत्त्वाची गोष्ट, ग्रामीण शिक्षणाची कल्पना सांगण्यापूर्वीं मला स्पष्ट केली पाहिजे आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट मला आपल्या नजरेला आणायला पाहिजे ती अशी कीं, जेव्हां ग्रामीण शिक्षण असा शब्द आम्ही उच्चारतों तेव्हां ग्रामीण शिक्षण आणि नागरी शिक्षण, खेड्यांतल्या लोकांच्यासाठीं शिक्षण आणि शहरांतल्या लोकांच्यासाठीं शिक्षण असे कांहीं दोन वेगवेगळे प्रकार आहेत का, याची एकदां स्पष्ट कल्पना आपल्या मनाशीं आपण केली पाहिजे.

या बाबतीमध्यें माझें स्पष्ट आणि स्वच्छ असें मत आहे, कीं असे दोन शिक्षणाचे मूलभूत वेगवेगळे प्रकार असूंच शकणार नाहींत. खरे पाहिलें असतांना आपल्या देशाचा प्रमुख आणि अत्यंत महत्त्वाचा असा आजचा जर कोणता प्रश्न असेल तर तो हा आहे कीं, आजच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीमध्यें खेड्यांतील माणूस आणि शहरांतील माणूस यांच्यामध्यें एक प्रकारचे जें कृत्रिम अंतर वाढत चालले आहे तें वाढते अंतर कमी करून त्यांच्यामध्यें एक प्रकारचा तोल निर्माण करणें, जवळचा संबंध निर्माण करणें, जिव्हाळा निर्माण करणें, हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. आणि म्हणून ग्रामीण शिक्षण हा कांहीं वेगळा प्रकार आहे अशा समजुतीने जर आम्ही ग्रामीण शिक्षणाकडे पहात असलों तर ती एक आपली मोटी चूक होईल अशी सूचना मला आपणास दिली पाहिजे·

## एक करुण चित्र

पण एक गोष्ट तर निर्विवाद आहे कीं, आज ज्या तऱ्हेचें शिक्षण आपण पाहून राहिलों आहोंत, जें आपल्या अंवतिभोंवतीं दिलें जातें त्याचा ग्रामीण जविनावरतीं काय परिणाम होतो; नमुन्यासाठीं आपण खेडेगांवातील एखादा मुलगा बाहेरगांवीं शिक्षणासाठीं गेला आहे, त्याच्यावरती त्या

शिक्षणाचा काय परिणाम घडला, आणि त्याचा तो ज्या खेड्यांतून गेला त्या खेड्यासाठीं काय उपयोग झाला याचा विचार केला तर मात्र मनांमध्यें एक प्रकारची खिन्नता आल्याशिवाय रहात नाहीं. अशीं कित्येक उदाहरणें मला माहीत आहेत, आपणांलाहि माहीत असतील कीं, खेडूत बाप आणि आई, त्यांनीं कष्ट सहन करून शिक्षणासाठीं बाहेर पाठविलेला मुलगा पदवी घेऊन जेव्हां शहाणा होतो तेव्हां ते त्याचे शहाणपण खेड्यामध्यें राहून शेती करणाऱ्या किंवा दुसरा उद्योग करणाऱ्या त्याच्या मातापित्यांचे आर्थिक जीवन दुरूस्त करण्यासाठीं उपयोगी पडत नाहीं. तो शहरामध्यें सोयीची, सुखाची कुठें एखादी नोकरी मिळावी या भावनेनें खटपट करीत असतो. कदाचित् तो यशस्वी होतो आणि एका अर्थानें आपले आई, बाप आणि ते ज्या भूमींत वाढले, ते ज्या गावांत वाढले त्या गांवाच्या राज्याला ते मुकले जातात. माझ्या मतानें हें एक मोठें करुण चित्र आहे.

### ग्रामीण शिक्षणाचा विचार : *शेतीस नव्या शोधांची जोड*

शिक्षणाच्या वाढीबरोबर या तऱ्हेचे जर घरोघर प्रश्न निर्माण होणार असतील तर मात्र या शिक्षणासंबंधानें तुम्हां–आम्हांला विचार केला पाहिजे. आणि म्हणून ग्रामीण शिक्षण या अर्थानें जो कुणी शब्द वापरीत असेल कीं, त्या गांवांतून तयार झालेला तरुण हा गांवांतील शेतीच्या विकासाच्या, ग्रामीण जीवनाच्या विकासाच्या उपयोगी पडण्याइतका गांवाचा सकस नागरिक बनावा ह्याला जर ग्रामीण शिक्षण आपण म्हणणार असलों तर आतां या तऱ्हेच्या ग्रामीण शिक्षणाचा विचार करण्याची आज जरूरी आहे यांत शंका नाहीं.

आज तुमच्या आमच्या देशापुढचा जो महत्त्वाचा प्रश्न म्हणून आपण मानतो तो हा आहे कीं, ज्याचा उल्लेख मी थोड्या वेळापूर्वी केला, तो प्रश्न. ग्रामीण जीवन आणि नागरी जीवन, खेड्यांतील जीवन आणि शहरांतील जीवन, यांच्यामधले जें अंतर आहे तें कमी करणें. तें कमी करण्याचा मार्ग एकच, आणि तो हा कीं, गांवाची जी आर्थिक रचना आहे, गांवातील जो धंदा आहे–प्रमुखतः शेतीचा, आणि त्यांच्याशीं संबंधित असणारे

इतर छोटे धंदे—या धंद्यांची गतिमानता कमी झाली आहे, त्यांच्यातला जिवंतपणा कमी झाला आहे, एक प्रकारचा निकसपणा या धंद्यामध्यें आला आहे, तो निकसपणा जाऊन हे धंदे सकस होतील, ते जे करतात त्यांच्या जीवनाला समृद्धी आणण्यासाठीं उपयोगी पडतील, हें करण्याचें काम आज आपल्या देशाने महत्त्वाचें मानलें आहे.

या शेतीच्या प्रश्नाला अनेक अंगं आहेत. दहा, वीस, पंचवीस, पन्नास, शंभर तोंडें असणारा असा एक मोठा मनुष्य आपण आपल्या डोळ्यापुढें जर आणूं शकाल तर शेतीचें स्वरूप अशा एका मोठ्या विशाल माणसासारखे आहे. या शंभर तोंडांच्या माणसाच्या शंभर गरजा आज या शेतीला पार पाडावयाच्या आहेत, आणि हें काम करण्यासाठीं शाळेतून तयार झालेला तरुण उपयोगी पडेल अशा तऱ्हेची शक्ति त्या माणसामध्यें निर्माण करण्याचा प्रयत्न तुम्हां आम्हांला आपल्या शिक्षणाच्या. मार्फत करावयाचा आहे.

शेती, नवीन नवीन जे शोध आहेत, त्यांचा उपयोग करू शकेल या दृष्टीनें शिक्षण देण्याचा प्रयत्न आपणाला करता येईल. शेती, जुन्या पद्धतीनें करीत करीत कांहीं वर्षें, कांहीं शतके खऱ्या अर्थाने आपण आलों त्यामुळें शेतीचा हा धंदा पाठीमागें पडला. आज शेताचा संबंध नव्या नव्या शोधांशीं, नव्या नव्या शेती करण्याच्या पद्धतीशीं जर जोडावयाचा असेल तर नवे शास्त्र शेतीच्या धंद्याशी नेऊन भिडविण्याचें काम केलें पाहिजे. या कामामध्यें आम्हांला शिक्षणाचा उपयोग करून घेतां येईल. मी असें म्हणेन कीं, या तऱ्हेचे शिक्षण, हें ग्रामीण शिक्षणाचा एक चांगलासा परिपाक असें मानावें लागेल. प्रश्न, कोणत्या गोष्टीला ग्रामीण शिक्षण म्हणावयाचा नाहीं. प्रश्न, ग्रामीण शिक्षणाचे हेतू आम्ही काय मानतो, ग्रामीण जीवनाचें स्वरूप आम्ही स्वतःच्या मनाशीं काय ठरवितों, याच्यावरतीं ग्रामीण शिक्षण काय, हें खऱ्या अर्थानें शेवटीं ठरणार आहे. आम्ही जर, आपण ग्रामीण जीवनाचें स्वरूप काय असावे, त्याचा नागरी जीवनाशीं संबंध काय असावा, या प्रश्नाचें, आपल्या मनाशीं निश्चित उत्तर देऊं शकलों, तर ग्रामीण शिक्षणाचा प्रश्न

हळूहळू यशस्वीरितीनें सोडविण्यांत आपण यशस्वी होऊ असें मला वाटतें. ज्या खेड्यांतील कोट्यवधि जनतेचं जीवन मंगलमय करावं, असा हेतू मनाशीं ठेऊन आपले राष्ट्र पुढें पुढें जाण्याचा प्रयत्न करीत आहे, त्या जनतेचें कल्याण करण्याचें हें एक साधन, ह्या अर्थानें ग्रामीण शिक्षणाच्या प्रश्नाकडे पाहण्याचा आपण प्रयत्न करू या.

**[श्री. यशवंतराव चव्हाण यांनीं मुंबई आकाशवाणीवरून १५ ऑगस्ट १९५८ रोजीं केलेलें भाषण.]**

◆◆◆

---

**"मला न्याय मिळेल असा विश्वास लोकांमध्यें निर्माण करण्याची जबाबदारी सरकारची म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांची आहे. अधिकाऱ्यांचें चुकलें आहे किंवा आपल्याला न्याय मिळत नाहीं हें निर्भिडपणें अधिकाऱ्यांना येऊन सांगण्याचें धैर्य लोकांच्या ठिकाणीं असले पाहिजे आणि हा धीर आणि विश्वास अधिकाऱ्यांनीं निर्माण केला पाहिजे."**

# कल्याणकारी राज्यांतील कारभाराची कसोटी

***

देश स्वतंत्र झाल्यानंतर जमाना बदलला आहे. लोक-नियुक्त सरकार हें केवळ शांतता राखून राज्यकरणारेंच सरकार राहिलें नाहीं तर त्या सरकारनें लोककल्याणाची जिम्मेदारी स्वीकारली आहे. या कल्याणकारी राज्यकार-भाराची कसोटी म्हणजे केवळ आपल्या मतानें आपण चांगलें वागतो एवढें पुरें नाहीं तर लोकांना तसें वाटलें पाहिजे, जाणवलें पाहिजे. मला या राज्यांत न्याय मिळेल आणि तो मिळवून घेण्याचा मला हक्क आहे असा विश्वास लोकांमध्यें निर्माण झाला पाहिजे. आपणाला न्याय मिळत नाहीं तर तसें निर्भीडपणें सांगण्याचें लोकांत धैर्य निर्माण केलें पाहिजे.

***

*राज्यकारभारासंबंधी माझ्या काही कल्पना आहेत*

अशा कांहीं कल्पनांचा तुम्हीं पूर्वी विचार केलेला असेल, त्या ऐकलेल्या असतील, वापरलेल्या असतील आणि आचरलेल्याहि असतील, परंतु त्या

कल्पनांची एकदां उजळणी होण्याची आवश्यकता आहे असें मला वाटलें. कारण राज्यकारभार करीत असतांना जसे उद्भवतील तसे प्रश्न सोडवीत जाणें याला कांहीं योजनाबद्ध राज्यकारभार म्हणतां येणार नाहीं. तर त्यासाठीं कांहीं विचारपूर्वक अशा पद्धति, कांहीं तत्त्वें निश्चित करून व त्यांचा स्वीकार करून त्याप्रमाणें जर आम्ही काम करीत गेलों, तर त्याला योजनाबद्ध राज्यकारभाराचें स्वरूप प्राप्त होईल. या दृष्टीनें राज्यकारभाराच्या बाबतींत आपल्या कांहीं मूलभूत कल्पना असतील तर त्या एकदां स्पष्टपणें सांगितल्या पाहिजेत. नव्या राज्याचा कारभार हा कांहीं अंशीं गुंतागुंतीचा आहे; कारण आपणांला माहीतच आहे कीं, नवे पांच राज्यविभाग नव्या मुंबई राज्यामध्यें एकत्र आलेले आहेत- ज्यांचे कायदे निराळे होते, राज्यकारभाराच्या पद्धति वेगवेगळ्या होत्या, परंपरा भिन्न होत्या असे चार वेगळे राज्य विभाग म्हणजे जुन्या मध्यप्रदेश राज्यांतील कांहीं जिल्हे, हैद्राबादमधील कांहीं जिल्हे, कच्छ व सौराष्ट्र हीं राज्यें आणि जुन्या मुंबई प्रदेशाचा विभाग, अशा एकूण पांच पद्धतींचा समन्वय आपल्याला नवीन राज्यामध्यें साधावयाचा आहे. अर्थात् हें काम कांहीसें गुंतागुंतीचें व अवघड असें आहे. परंतु गुंतागुंतीचें आणि अवघड असें काम करण्याकरितांच शहाण्या व कर्तृत्ववान माणसांची जरूरी असते. काम साधे असेल, अगदीं सहजासहजी होणारे असेल, तर त्यासाठीं कर्तृत्ववान माणसांची फारशी आवश्यकता असते असें नाहीं. परंतु कर्तृत्वाची खरी परीक्षा अवघड कामामध्येंच होत असते. तेव्हां एका महान् स्वरूपाच्या, नवीन पण अवघड अशा कामामध्यें आपणा सर्वांच्या कर्तृत्वाची परीक्षा होणार आहे.

भारतामध्यें लोकशाहीचें राज्य येऊन दहा वर्षें झालीं. पण अजूनहि राज्यकारभार ज्या आदर्श पद्धतीचा किंवा त्या पद्धतींतील ज्या पातळीपर्यंत जाऊन पोहोंचायला हवा त्या पातळीपर्यंत वा मर्यादेपर्यंत पोहोंचलेला नाहीं, ही गोष्ट उघड आहे. राज्यकारभार आदर्श अशा पातळीवर नेण्याचें काम, ज्याला सार्वजनिक सेवक म्हणतां येईल, अशांना करावयाचे आहे. सार्वजनिक सेवकांच्या बाबतीमध्यें आम्हीं जुन्या मुंबई राज्यांत दोन प्रकार मानीत होतो. अर्थात ही कल्पना फक्त जुन्या मुंबई राज्यापुरतीच मर्यादित

होती असें नाहीं, तर सार्वजनिक सेवकांचे हे दोन प्रकार संबंध भारताच्या बाबतींत करावे लागतील असें मला वाटतें. जे प्रत्यक्ष सरकारी यंत्रणेमध्यें राहून काम करतात ते तर "सार्वजनिक सेवक" होत आणि जे सरकारी यंत्रणेच्या बाहेर राहून काम करतात तेहि "सार्वजनिक सेवक" असे हे दोन प्रकार आहेत. सरकारी यंत्रणेमध्यें राहून जे काम करतात ते, त्या कामाचें कांहीं विशिष्ट तन्हेचें शिक्षण घेऊन काम करतात. त्यांना त्यासंबंधीं कांहीं ट्रेनिंग मिळालेलें असतें. त्या बाबतींत त्यांच्यावर कांहीं निश्चित अशी जबाबदारी असते. त्या बाबतींत त्यांना कांहीं शिस्त घालून दिलेली असते आणि त्यासाठीं त्यांना वेतन मिळत असतें. ही सरकारी यंत्रणेमधील सार्वजनिक सेवकांची कल्पना आहे. सरकारी यंत्रणेबाहेर काम करणाऱ्या सेवकांनीं सेवेची जबाबदारी आपल्या विचारानें पत्करलेली असते. तो वेतनानें बांधलेला नसतो, तर तो विचारानें बांधलेला असतो. या दोन प्रकारांतील फरक महत्त्वाचा आहे. फरक असला तरी शेवटीं दोघांच्या कामामध्यें एक साम्य आहे तें हें कीं दोघांनाहि शेवटीं जनतेची सेवा करावयाची आहे. या दृष्टीनें मी असें विचारतों कीं, राज्यकारभार चांगला चालला आहे कीं नाहीं याची कसोटी काय ? माझ्या मते चांगल्या राज्यकारभाराची कसोटी लोकांचें समाधान हीच आहे.

## चांगल्या कारभाराची कसोटी

मी जो आतां "सेवक" हा शब्द वापरला तो मी दोन्ही अर्थांनीं वापरला आहे. लोकशाही स्वरूपाच्या राज्यकारभारामध्यें, मी चांगले काम करतो. लोकांच्या उपयोगाचें काम करतो एवढी कसोटी अपुरी आहे.मी माझ्या मनाच्या समाधानासाठीं चांगलें काम करतो असें म्हणूनहि चालणार नाहीं. चांगलें काम तर केलेंच पाहिजे; पण काम चांगल्या प्रकारें झाले आहे याची लोकांना प्रचीति आली पाहिजे, लोकांना तें जाणवलें पाहिजे. म्हणूनच मी असें म्हणतो कीं कारभाराची कसोटी ही लोकांच्या समाधानांत आहे. सरकार चांगलें असून उपयोगी नाहीं तर सरकार चांगलें आहे, राज्यकारभार चांगला आहे, असें लोकांना वाटलें पाहिजे, जाणवलें पाहिजे. तरच तो सरकारी कारभार चांगला म्हणतां

येईल. ही मूळ कसोटी आम्ही आमच्या मनाशीं ठरविली आहे; आणि याच दृष्टीनें कारभार यशस्वी झाला कीं नाहीं, राज्याच्या अधिकाऱ्यांचें काम चांगलें झालें कीं नाहीं,याची कसोटी लागणार आहे. दहा वर्षांचा इतिहास डोळ्यापुढें ठेवून मी आत्मपरीक्षणाच्या दृष्टीनें बोलतो आहे, दोष देण्याच्या बुद्धीनें नाहीं. वैयक्तिक जीवनामध्यें जशी प्रगति असते तशी ती सार्वजनिक जीवनांतहि करावयाची असते. राज्यकारभारामध्यें सुधारणा व प्रगति करण्याचें ठरवून तुम्ही आणि मी जरी एकत्र काम करणार असलों तरी आत्मटीकेची, आत्मसंशोधनाची आपल्याला फार जरूरी आहे. मी आज सकाळींच एके ठिकाणीं बोलतांना सांगितलें कीं "चांगलें" "वाईट", "चांगले होते", "वाईट होते" या शब्दांना कांहीं फारसा अर्थ नाहीं. सारखे चांगले तरी होत असते किंवा वाईट तरी घडत असते. त्याच्यामधली स्थिति असूंच शकत नाहीं. मनुष्य चांगला तरी होत असतो किंवा वाईट तरी होत असतो.तो एकाच वेळीं चांगलाहि होत नाहीं आणि वाईटहि होत नाहीं. अशी स्थिति असूंच शकत नाहीं. तीच गोष्ट राज्यकारभाराची आहे. जर कारभार चांगला करावयाचा असेल तर तो चांगला करण्याची सतत काळजी घेतली पाहिजे. एक क्षणभर जरी आपल्या मनांत अशी कल्पना आली कीं, 'नाहीं, आतां बरे चालले आहे,' आणि ह्या विचारानें आपण जर निष्क्रीय राहिलों, तर पुढच्याच क्षणापासून वाईट होण्याची प्रवृत्ति आणि प्रक्रिया सुरू होईल, ती सुरू होण्याची भीति आहे. म्हणून आपल्याला सतत जागरूक राहण्याची आवश्यकता आहे. म्हणून आत्मटीकेच्या दृष्टीनें पाहिलें असतां मी असें सांगतो कीं, आतांपर्यंत दहा वर्षांचा काळ गेला असूनहि राज्यकारभारासंबंधानें लोकांचें समाधान झालें आहे असें मला वाटत नाहीं. तुमच्या माझ्या भोंवतींचीं दहा माणसें "चांगलें" "चांगलें" म्हणतात ही त्याची कसोटी नाहीं. कारण राज्यकारभाराची परंपरा आपण ज्या परकीय सत्तेपासून घेतली आहे, त्या सत्तेच्या परंपरेमध्येंच असे कांहीं दोष आहेत कीं त्यामुळें, आणि खुद्द सत्ता ही वस्तूच अशी आहे कीं त्यामुळें, आपल्या भोंवती खुषमस्कऱ्यांचा वर्ग नेहमीं निर्माण होत असतो. आम्हीं जें केलें तें बरें केलें, फार चांगलें केलें, छान केलें, सुंदर केलें, असें सांगणारीं माणसें आंवतीभोंवतीं हिंडत असतात. या उलट,

लोकांच्या समाधानाची कसोटी लावून या गोष्टीकडे पाहिलें तर आज मी आपणाला असें सांगूं इच्छितों कीं, राज्यकारभाराबाबत लोकांचे समाधान झालेलें नाहीं. ही जाणीव ठेवून तुम्हांला–आपणा सर्वांना पुढें गेलें पाहिजे. त्याच्यासाठीं काय करायला पाहिजे हें आपण आतां निश्चित करण्याची जरूरी आहे, आणि त्याच दृष्टीनें कांहीं महत्वाच्या चार–पांच गोष्टी मी आज आपल्यापुढें मांडणार आहे.

## लोकांना विश्वास वाटला पाहिजे

पहिली महत्त्वाची गोष्ट अशी कीं, लोकांचें समाधान ही जर आम्हीं कसोटी ठरविली तर लोकांना या बाबतींत स्वतःचें निश्चित मत व्यक्त करण्याइतका धीर आणि विश्वास वाटला पाहिजे व तो आपण निर्माण केला पाहिजे. लोकांमध्यें निर्भीडपणा निर्माण केला पाहिजे. मला न्याय मिळेल असा विश्वास लोकांमध्यें निर्माण करण्याची जबाबदारी सरकारची म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांची आहे. अधिकाऱ्यांचें चुकतें आहे, किंवा आपल्याला न्याय मिळत नाहीं हें निर्भीडपणें अधिकाऱ्यांना घेऊन सांगण्याचें धैर्य लोकांच्या ठिकाणीं असलें पाहिजे. त्यांना तसा विश्वास वाटला पाहिजे. लोक लोकप्रतिनिधीकडे जाऊन राज्य कारभारांतल्या तक्रारी सांगतात त्यांत महत्त्वाची गोष्ट ही आहे कीं, लोकप्रतिनिधींजवळ आपण बोललें पाहिजे असा विश्वास आणि सरकारी अधिकाऱ्यांजवळ आपण बोलूं नये अशी भीति, अशी शंका अजून त्यांच्या मनांत कां आहे, याचा विचार आम्ही केला पाहिजे. मी त्या जिल्ह्याच्या कलेक्टरांना विचारलें,तुमच्याकडे अशी तक्रार केली गेली होती काय ? आणि केली गेली असती तर खात्रीनें त्यांनीं तिचा विचार केला असता, बंदोबस्त केला असता असा विश्वास आहे. परंतु ती तक्रार त्यांच्याजवळ करावी असा विश्वास, धीर अजूनहि लोकांच्या अंगीं कां येत नाहीं, याचा आपण विचार केला पाहिजे. मी हें अशासाठीं सांगितलें कीं, 'मी माझें काम चांगलें करीत आहे ना' एवढाच विचार करण्याची जी वृत्ति आहे, ती आपण सोडून दिली पाहिजे. मी जर चांगलें काम करीत असेन तर त्याचा परिणाम माझ्या आंवतीभोंवतीं असणाऱ्या लोकांवर होत आहे किंवा नाहीं अगर तो किती होत

आहे हेंहि पाहण्याचें काम आपलें आहे. अधिकारी आपल्या कचेरींत बसल्यानंतर त्याचा चोपदार बाहेर कसा वागतो आहे, हें त्याला कळणें अवघड असतें. तथापि हें पाहण्याचेंहि काम त्या अधिकाऱ्याचें आहे, असें आपण मानलें पाहिजे. कारण असा विश्वास निर्माण झाल्याशिवाय लोकांना राज्यकारभाराबाबत समाधान वाटतें किंवा नाहीं हें कळणें अतिशय अवघड आहे. तेव्हां पहिली गोष्ट म्हणजे आपण लोकांच्या मनामध्यें विश्वास निर्माण करण्याचें काम केलें पाहिजे. पण हें आपण केव्हा करूं शकू ? हें करण्याचा मार्ग तेव्हांच उपलब्ध होईल कीं जेव्हां सरकार आणि अधिकारी यांच्या दृष्टिकोनामध्यें एक प्रकारची एकात्मता निर्माण होईल. इथें मला एका गोष्टीचा स्पष्टपणें खुलासा करावयाचा आहे; आपण जनतेचे सेवक आहोंत याचा अर्थ काय हें स्पष्टपणें समजून घेण्याची आवश्यकता आहे. सरकारी अधिकारी हे जनतेचे सेवक आहेत ही गोष्ट खरी आहे. मात्र ते जनतेला जबाबदार नाहींत, तर सरकारला आहेत. ह्या दोन गोष्टी आपण स्पष्टपणें लक्षांत घेतल्या पाहिजेत. या बाबतींत पुष्कळ वेळां गोंधळ होण्याचा संभव असतो, म्हणून हें मी आपल्याला सांगत आहे. आपण जनतेचे सेवक आहांत, आपल्याला जनतेची सेवा करायची आहे, जनतेशीं एकनिष्ठ राहून ती करायची आहे ही गोष्ट खरी; पण हें करीत असतांना तुमची जबाबदारी सरकारवर आहे, हें तुम्ही विसरतां कामा नये. तुमच्याकडे असलेलें काम पुरें करण्याची जबाबदारी सरकारनें घेतलेली आहे. एकादे वेळीं असा चुकीचा समज होण्याचा संभव आहे कीं, सरकारी अधिकारी हा आधी जनतेला आणि नंतर सरकारला जबाबदार आहे. अशा तऱ्हेचा चुकीचा विचार मनाशीं आला तर त्यांतून गुंतागुंती निर्माण होण्याचा आणि त्यामुळें जनतेची सेवा करण्याचा प्रश्न बाजूला राहून दुसऱ्याच कांहीं आपत्ति कोसळण्याचा संभव आहे. म्हणून ह्या दोन गोष्टींतील फरक स्पष्टपणें समजावून घेतला पाहिजे. आपल्याला जनतेची जी सेवा करायची आहे ती अधिकारावर असलेल्या सरकारच्या कार्यक्रमामार्फत करायची आहे; त्यानें जो कार्यक्रम, जें धोरण, जी पद्धति स्वीकारली आहे, त्या कार्यक्रमानुसार काम पार पाडावयाचें आहे. कार्यक्रम पार पाडतांना जन-सेवेच्या भावनेनें पार पाडला पाहिजे हीच त्यांत महत्त्वाची गोष्ट आहे.

सरकार जे धोरण, जो कार्यक्रम स्वीकारतें, त्या कार्यक्रमाच्या बाबतींत आपल्याकडून साडेनव्याण्णव टक्के नव्हे तर १०० टक्के निष्ठेची मी अपेक्षा करतो. कारण जो कार्यक्रम, जें धोरण आपण स्वीकारलें असेल, त्या धोरणाच्या बाबतींत मनांत पाव टक्कासुद्धां शंका राहतां कामा नये. याचा अर्थ असा नव्हे कीं, तुमचीं कांहीं वैयक्तिक मतें असूं शकणार नाहींत. ज्याला वैयक्तिक मतें नाहींत, तो माणूसच असूं शकणार नाहीं. या देशामध्यें तुमचें स्वतःचे असें कांहीं व्यक्तिमत्व असेल; परंतु जेव्हां सरकारी यंत्रणेमध्यें आपण जबाबदारी उचलतां तेव्हां तुम्ही, ज्याला मी "ट्रेनिंग" म्हटलें, तें सार्वजनिक कामाचें ट्रेनिंग तुम्ही घेत असतां. हें ट्रेनिंग असें आहे कीं, माझें स्वतःचें कांहींहि मत असेल, माझ्या स्वतःच्या कांहींहि भावना असतील, परंतु सरकारी यंत्रणेंत बसल्यानंतर जें सरकारी धोरण असेल तें मी निःपक्षपातीपणानें आणि १०० टक्के निष्ठेनें पार पाडीन, ही मनोभूमिका असली पाहिजे आणि अशा निष्ठेची आपणांकडून अपेक्षा करतो.

## कार्यक्षम कारभार

आम्ही सारखें सांगत असतों कीं, राज्यकारभार कार्यक्षम पाहिजे. कार्यक्षम राज्यकारभाराच्या आपल्या काय कल्पना आहेत? याबाबतींत माझ्या कल्पना अगदीं साध्या अशा आहेत. पहिली गोष्ट अशी आहे कीं, कार्यक्षम कारभार याचा अर्थ जें ठरलें असेल, जें करायचें असेल तें तांतडीनें केलें पाहिजे. ज्याला आपण 'क्विक डिस्पोझल' असें म्हणतों तें झालें पाहिजे. तसेंच तें प्रामाणिकपणानें केलें पाहिजे, आणि तें करून आम्हीं लोकांचें समाधान केलें पाहिजे. त्यामुळें लोकांचें समाधान झालें पाहिजे. माझ्या कल्पनेप्रमाणें कार्यक्षम राज्यकारभाराच्या ह्या तीन कसोट्या आहेत. विलंब कां लागतो? मला असे वाटतें कीं, या बाबतींत वारंवार तपासणी केली पाहिजे. विलंब टाळण्याचा एकच मार्ग आहे व तो म्हणजे आलेलें काम एका ठराविक मर्यादेंत पुरें केलेंच पाहिजे अशी मनाला संवय लावून घेतली पाहिजे आणि ती संवय इतरांना लावली पाहिजे. एकाद्या प्रकरणासंबंधीं अधिक माहिती मागवावयाची नसेल तर प्रश्नच नाहीं. पण अधिक माहिती मागवावयाची असेल तर त्यामुळें अधिक विलंब होतो,

असा आपला अनुभव आहे. तेव्हां माहिती मागविण्याच्या बाबतींत आपण मनाशीं निर्णय घेतला पाहिजे कीं, सदरहू माहिती एका ठराविक काळांत आलीच पाहिजे. यासंबंधीं आपल्या मनाला सतत चिंता लागून राहिल्या-शिवाय, आपल्या मनाला क्लेश झाल्याशिवाय हा विलंबाचा प्रश्न सुटणार नाहीं. विलंब हा सबंध राज्यकारभाराच्या पाठीमागें लागलेला राक्षस आहे, असें माझें मत आहे, आणि त्याचा वारंवार पराभव करण्याची नित्य जागरुकता ठेवल्याशिवाय हा राक्षस पराभूत होणार नाहीं. तो एकदां पराभूत होऊन जात नाहीं. तो रोज जन्माला येतो. प्रत्येक क्षणाला जन्माला येतो, प्रत्येक क्षणाला त्याच्याशीं युद्ध करावें लागतें.

माझ्या कल्पनेप्रमाणें या बाबतींत एकच निर्णय असूं शकतो, तो असा कीं, समोर आलेलें काम ज्या दिवशींचें त्या दिवशींच पुरें करणें. आणि अधिक माहिती मागविण्याकरितां काम जायचें असेल त्याच्यासंबंधींहि कांहीं निश्चित असे निर्णय घेतले पाहिजेत. जी माहिती लवकर द्यायची असेल त्याच्याकरितां दोन दिवसांची, कांहींच्या करितां आठ दिवसांचा, कांहींच्या करितां दहा दिवसांची, पंधरा दिवसांची ह्याप्रमाणें जास्तीत जास्त काल-मर्यादा घातली पाहिजे. माहिती मागविण्याकरितां गेलेला कागद हा अमुक दिवसांनीं परत आलाच पाहिजे, अशी आपल्या मनाला आणि त्याचप्रमाणें ज्याच्याकडून माहिती मागवावयाची असेल त्यालाहि संवय लागली पाहिजे.

## व्यक्तिनिरपेक्ष कारभार

दुसरा एक प्रश्न आहे तो म्हणजे लांचलुचपतीचा. आपण कांहीं असें म्हणूं शकणार नाहीं, मी असा दावा करूं शकणार नाहीं कीं, राज्यकारभा-रांतून लांचलुचपत अजिबात नाहींशी झाली आहे. सगळेच तसे आहेत असेंहि नव्हे. मला सांगायला आनंद वाटतो कीं,भारताच्या राज्यकारभारा-मध्यें वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांतील लांचलुचपत जवळ जवळ संपूर्णपणें कमी झाली आहे. अशा तऱ्हेनें आमच्या राज्यकारभारामध्यें अधिकारी-वरच्या दर्जाचे अधिकारी-सुधारले आहेत, ह्यांत कांहीं शंका नाहीं. ज्याला 'करप्शन बाय एक्स्टॉर्शन' म्हणतां येईल अशी, म्हणजे सक्तीनें पैसे वसूल करण्याची लांचलुचपत कांहीं काळ, कांहीं सर्व्हिसेसमध्यें चालू होती. अशी

पैसे-वसुली आतां बंद होत चालली आहे. ती बंद करण्यामध्यें लांचलुचपत प्रतिबंधक खातें थोडें फार यशस्वी होत आहे. परंतु संमतीनें कांहीं गोष्टी करण्याची जी पद्धत आहे, त्या बाबतींत आळा घालण्याच्या दृष्टीनें आपण कितपत यशस्वी झालों आहोंत हें मला नाही माहित. या बाबतींत मी आपणांला एक विनंति करणार आहे कीं, आपण जिल्हाधिकारी, या अनिष्ट गोष्टींना कोणत्या पद्धतीनें आळा घालता येईल यासंबंधीं विचार करून सरकारला सूचना देत चला. या बाबतींत आपल्या सहकार्याची मला अतिशय आवश्यकता आहे. लांचलुचपतीचा दुसरा एक अप्रत्यक्ष मार्ग आहे. मी त्याला लांचलुचपतच म्हणतो. कांहीं ठराविक पद्धतीनेंच अधिकाऱ्यांकडे गेले तरच काम होतें. त्यामध्यें प्रत्यक्ष असें दिलें जात नाहीं, घेतलें जात नाहीं, याची मला खात्री आहे. पण समाजामध्यें जर असा समज निर्माण झाला कीं, अमक्या अधिकाऱ्याकडे काम व्हावयाचें असेल तर ओळखीनें जायला पाहिजे, एका विशिष्ट पद्धतीनें जायला पाहिजे, तर ती गोष्ट चांगली नाहीं. असें करण्यामागें कदाचित पूर्णपणें चांगला हेतु असेल, त्यामध्यें ज्याला लांचलुचपत म्हणतात, असें कांहीं असणार नाहीं; तरी देखील अशा तऱ्हेची लोकांची भावना होणें याला मी लांचलुचपत म्हणतों आणि ह्या दृष्टीनें राज्यकारभार हा व्यक्तिनिरपेक्ष होण्याची आवश्यकता आहे. कोणीही येवो, कोणत्याही पक्षाचा मनुष्य येवो, त्याला असा विश्वास वाटला पाहिजे कीं, या अधिकाऱ्याकडून आणि राज्यसत्तेकडून माझें काम होईल. इतक्या प्रमाणांत राज्यकारभार व्यक्तिनिरपेक्ष होण्याची आवश्यकता आहे. आपण व्यक्तिपलीकडे जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मात्र याचा अर्थ असा नव्हे कीं, व्यक्तिनिरपेक्ष होण्याची जी एक दुसरी प्रवृत्ति आहे तिचा आपण अवलंब करावा. ही पद्धति फार धोक्याची आहे. ती अशी कीं, एकदां नियम करायचा आणि तो नियम डोळे झांकून पाळायचा म्हणजे झाला व्यक्तिनिरपेक्ष राज्यकारभार ! हें फार धोक्याचें आहे. कोणत्याहि गोष्टींत शेवटीं माणुसकीची बाब म्हणून असते. जो मानवी संबंध येतो तो टिकविण्यास २४ तास नुसते कायद्याकडे आणि नियमांकडे बोट दाखवून चालत नाहीं. आपल्यापुढें असलेल्या कामांपैकीं जें होण्यासारखें काम असेल तें आलेल्या अडचणींतून मार्ग काढून केलें पाहिजे. अशा रीतीनें

एकादा प्रश्न सोडविण्याची जी युक्ति असते ती सोडून देता कामा नये. या अर्थानें कारभार व्यक्तिनिरपेक्ष व्हायला पाहिजे. कोणीहि मनुष्य येवो, त्याचें समाजांतील स्थान कोणतेंहि असो, पण त्याची मागणी जर बरोबर असेल, त्याला न्याय मिळण्याची जर आवश्यकता असेल तर तो दिला गेला पाहिजे. तो गरीब आहे,त्याला आपले प्रश्न व्यवस्थितपणें मांडतां येत नाहींत,तो पुढें यावयास घाबरतो,त्याची आणि तुमची ओळख नाहीं असल्या अडचणी येतां कामा नयेत. तो मनुष्य कदाचित् वाईटहि असेल, पण वाईट मनुष्याचा प्रश्न बरोबर असेल तर ? तो कदाचित् कांहीं गोष्टीसंबंधीं आपल्या कानांवर बरं वाईट घालण्यासाठींहि आला असेल. तो, जो प्रश्न, जें गाऱ्हाणें घेऊन आला असेल तें जर बरोबर असेल, तर त्याच्यावर आपल्याकडून अन्याय होतां कामा नये.

## लोकांशीं कसें वागावें

आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगण्याची जरूरी आहे; ती लोकांशीं वागण्याच्या पद्धतीसंबंधींची आहे. अर्थात् त्यामध्यें आतां पूर्वीपेक्षां पुष्कळ सुधारणा झाली आहे. माझ्या दृष्टीनें, अशी सुधारणा फक्त पोलिस खात्यामध्यें तेवढी होण्याची आवश्यकता आहे.

याबाबतींत काय करतां येणें शक्य आहे याचा मी विचार करतो तेव्हां माझ्या मतें त्याला एकच उपाय आहे, तो असा कीं अधूनमधून तपासणी करणें. वर्दी देऊन केलेली तपासणी ही खरी तपासणी नव्हे. साहेबबहादूर अमक्या दिवशीं येणार आहेत, अशी बातमी देऊन झालेली तपासणी, तपासणीच नव्हे. तें तपासणीचें नाटक होय. या बाबतींत पोलिस अधिकाऱ्यांना मी असें सुचवीन कीं, खात्याच्या लोकांची वागण्याची पद्धत सुधारावयाची असेल तर मधून मधून आगाऊ वर्दी न देतां अचानकपणें तपासणी केली पाहिजे.

## चूक आणि शासन

समोरचा अधिकारी चुकला तर त्याला शासन करण्याचें काम मला करावें लागेल आणि तें टाळतां आलें तर बरें होईल अशी जी दृष्टि आहे, ती सोडून मी सांगितल्याप्रमाणें तपासणी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

मी असें म्हणत नाहीं कीं, तपासणीमध्यें जर कांहीं चुकीची गोष्ट निदर्श-नाला आली तर ताबडतोब तुम्हीं त्याला जास्तींत जास्त शिक्षा दिली पाहिजे. माझा असा उद्देश नाहीं. सारखी हातांत छडी घेऊन शिक्षा करीत हिंडणारा माणूस सुधारणा करू शकतोच असें मी मानीत नाहीं. सुरुवातीला त्याला समजावून सांगावें लागेल कीं तूं चूक केली आहेस, ती पुन्हां करूं नकोस. पहिल्या एकदोन प्रसंगीं आपणांला असें सांगावें लागेल. पण अशा एकदोन प्रसंगांनंतर पुन्हां तसेंच दिसलें,तर मात्र शिक्षा करायला कोणी पुढें मागें पाहूं नये. प्रसंग पडला तर वरचा अधिकारी शासन करील ही भीति असल्याशिवाय 'सर्व्हिसेस' मधील शिस्त कधीं वाढणार नाहीं आणि या दृष्टीनें अत्यंत तांतडीनें सुधारणा होण्याची आवश्यकता पोलिस आणि रेव्हेन्यूखात्यामध्यें आहे. मी आपणाला सांगूं इच्छितो कीं रेव्हेन्यू खात्यानें तालुका कचेऱ्यांतून आणि गांवच्या कचेऱ्यांतून या गोष्टीकडे अधिक काळजीपूर्वक लक्ष देण्याची जरूरी आहे. कारण राज्यकारभाराच्या बाबतींत आपण लोकांचें समाधान ही कसोटी मानली तर दररोज,प्रतिक्षणीं लोकांच्या जवळ जाणारा कारभाराचा जर कोणता घटक असेल तर तो कलेक्टर किंवा मामलेदार किंवा फौजदार किंवा डी. एस. पी. हा नव्हे. कोणी तरी हेड कॉन्स्टेबल, कोणी तरी सर्कल ऑफिसर किंवा कोणीतरी तलाठी यांचा शेवटीं लोकांशीं दैनंदिन संबंध येत असतो, आणि लोकांचें समाधान कर-ण्याची कुवत, कारभाराच्या ह्या सर्वांत खालच्या थरांत जोंपर्यंत आम्हीं आणूं शकत नाहीं तोंपर्यंत जनतेच्या समाधानाच्या कसोटीस उतरण्याच्या बाबतींत आम्हीं फारसे यशस्वी होणार नाहीं. तेव्हां सुधारणा करण्यासाठीं आणि जरूर पडली तर शिक्षा करण्याकरितां, अशा या दुहेरी हेतूनें अचानक तपासणीचें काम वारंवार हातीं घेतलें पाहिजे.

## कल्याणकारी राज्य

मला आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे. राज्य-कारभाराच्या दृष्टीनें ही गोष्ट मी महत्त्वाची मानतो. नव्या राजवटींत आपलें सरकार हें केवळ लोकशाही सरकार आहे असें नव्हें, तर या लोकशाही सरकारनें लोक-कल्याणाची जबाबदारी स्वीकारलेली आहे. बहुमतानें

निवडून आलेलें सरकार जें धोरण ठरवील त्याची अम्मलबजावणी करावयाची एवढेंच नव्हे तर हें सरकार लोककल्याणाचा जो कार्यक्रम पुरा करण्याची जबाबदारी घेऊन आलेलें आहे ती जबाबदारीहि आपल्याला पार पाडावयाची आहे. म्हणजे कल्याणकारी राज्याची जबाबदारी सरकारनें आपल्यावर घेतलेली आहे. याचाच अर्थ आपल्यावरील जबाबदाऱ्या अधिक वाढल्या आहेत. माझ्या कल्पनेप्रमाणें तीन-चार महत्त्वाच्या खात्यांवरील-जबाबदाऱ्या यामुळें अधिक वाढतात. शिक्षण, सहकार, शेती आरोग्य, हीं तीं चार महत्वाचीं खातीं आहेत. मला असें दिसून येते कीं ज्या जुन्या परंपरेंत आम्हीं वाढलों आहोंत, त्या परंपरेमुळें अजूनहि पोलिस आणि रेव्हेन्यू खात्यांचे वर्चस्व लोकांच्या आणि अधिकाऱ्यांच्या मनांतून जात नाहीं. अधिकाऱ्यांच्या संबंधी लोकांची जी कल्पना आहे तीच मंत्रिमंडळासंबंधीहि आहे. पोलिसकारभार ज्याच्या हातीं असेल त्याला कांहीं तरी विशेष सत्ता आहे, असे लोक अजूनहि मानतात. हा चुकीचा दृष्टीकोन हळूहळू बदलला पाहिजे. लोककल्याणकारी राज्यामध्यें जोंपर्यंत मी आतांच सांगितलेल्या चार खात्यांना त्या खात्यांच्या कामांना प्राधान्य आणि महत्त्व मिळत नाहीं, तोपर्यंत तें खरें लोककल्याणकारी राज्य झालें आहे असें मानता येणार नाहीं. शेवटीं असेंच म्हणावें लागेल कीं या देशांतील राज्यकारभार जर यशस्वी व्हावयाचा असेल, या देशांतील लोकशाही जर यशस्वी व्हावयाची असेल, तर या चार खात्यांचें काम यशस्वी झालें पाहिजे. या खात्याचे लोक ज्या प्रमाणांत लोकांच्या जवळ जाऊं शकतील, त्यांच्याबद्दल लोकांच्या मनांत ज्या प्रमाणांत आपुलकी आणि जिव्हाळा वाढेल, त्या प्रमाणांत या देशांतील लोकशाही आणि राज्यकारभार यशस्वी होणार आहे. म्हणून या खात्यांकडून माझ्या अधिक अपेक्षा आहेत. मी मघाशीं ज्या कसोट्या सांगितल्या त्यांच्या बाबतींत मी खात्यांकडून जास्त अपेक्षा करीत आहे. त्यांनीं प्रथम नव्या परंपरा निर्माण केल्या पाहिजेत. त्यांनीं लोकांकडे जाऊन त्यांचें समाधान करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांनीं आत्मविश्वासानें वागण्या ा प्रयत्न केला पाहिजे; आणि ज्याला उपक्रमशीलता म्हणतात ती दाखविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

[ भाषण : १५-१२-१९५६ ]

# जिल्हा अधिकारी आणि जनता संपर्क

***

लोकांचे समाधान हीच कल्याणकारी राज्यांताल सरकारची कसोटी ठरली म्हणजे त्या कसोटीवर घासला जाणारा सरकारी यंत्रणेचा प्रमुख भाग कलेक्टर– जिल्हा अधिकारी-हा असतो. राज्य हा एक विशाल पुरुष कल्पिला तर त्याचे डोळे, कान एवढेच नव्हे तर समर्थ असे बाहू म्हणजे कलेक्टर हे आहेत. राज्यकारभाराच्या या प्रचंड यंत्रणेचा कलेक्टर हा कणा आहे–

त्याने जनता संपर्क कसा ठेवावा...

***

आपणा सर्वांना हें माहितच आहे कीं, आपलें राज्य लोकशाहीप्रधान आहे. आतां हा एक अर्थहीन शब्द झाला आहे. ज्यावेळीं आपण स्वातंत्र्याचा लढा तीव्रतेनें देत होतों त्याचवेळीं आपणांस असें दिसून आलें कीं,

केवळ स्वराज्य म्हटल्यानें काम भागत नाहीं. या लढ्यांतच स्वराज्य म्हणजे काय तें जाणून घेण्याची आमची इच्छा होती. आपला राज्यकारभार लोकशाही पद्धतीचा आहे असें केवळ म्हणून भागणार नाहीं तर ही लोकशाही पद्धति म्हणजे काय त्याची आपण व्याख्या करावयास हवी.

राज्यकारभारांत रूढ झालेला आणखी एक वाक्प्रचार म्हणजे 'कल्याणकारी राज्य' हा होय! समाजवादी धर्तीच्या समाजरचनेची उभारणी हें आतां आपण आपलें ध्येय ठरविलें आहे. ही सारी शब्दयोजना आतां राजकीय पक्षांबरोबरच राज्यकारभारानेंहि स्वीकारली आहे.

आपल्या देशांतील परिस्थिती लक्षांत घेऊन, व खूप चर्चा केल्यानंतर समाजवादी धर्तीच्या समाजरचनेचें सर्वांगीण ध्येय स्वीकारण्यांत आलें आहे. ध्येयाचीं तीन किंवा चार महत्वपूर्ण वैशिष्ट्यें आहेत. पहिले म्हणजे, समाजवादी किंवा समाजवादी धर्तीच्या समाजांतील अर्थोत्पादनाचें कार्य हें सामाजिक फायद्याच्या दृष्टीनें केलेलें असावें. वैयक्तिक स्वार्थानें प्रेरित होऊन केलेलें नसावें, हें फार महत्वाचें वैशिष्ट्य आहे. या समाजरचनेचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे अशा समाजांत विषमता मुळींच नसावी किंवा असल्यास ती कमीत कमी किती असावी; तिसरें म्हणजे, समाजांतील प्रत्येक व्यक्तीला विकासाच्या सारख्या संधि मिळावयास हव्यात. सामान्यतः हेंच सूत्ररूपानें सर्वांना समान संधि असें सांगण्यांत येतें.

समाजवादी धर्तीच्या समाजरचनेचें ध्येय म्हणजे कांहीं कोणा एकानें आपल्या सोयीनुसार साधावयाची गोष्ट नाहीं. तें राज्यानें, शक्य झाल्यास विशिष्ट मुदतीच्या आंत, साध्य करावयाचें आपलें ध्येय ठरविलें आहे. आणि तें टप्प्या टप्प्यानें साध्य करावयाचा एक कार्यक्रम आंखला आहे. या ध्येयाशीं नियोजनाचा संबंध येथें येतो. टप्प्या टप्प्याचा कार्यक्रम ही शब्द योजना वापरून मला संपूर्ण दुसऱ्या योजनेचा निर्देश करावयाचा नाहीं. जेथें कलेक्टर आणि राज्य यांचा संबंध येतो तेथें राज्याचा प्रत्यक्ष संबंध असलेल्या भागासंबंधीं बोलण्याची माझी इच्छा आहे.

नुकतेंच असें कळून चुकलें आहे कीं, शेतीचा विकास हा केवळ महत्वाचाच नाहीं तर आपल्या देशाच्या योजनाबद्ध प्रगतीला तो पायाभूत आहे. शेतीच्या विकासाशिवाय आपल्या देशाची आर्थिक प्रगति होणें शक्य

नाही. शेतीच्या विकासाशिवाय आर्थिक विकासाचा केलेला कुठलाहि प्रयत्न विफल झाल्याशिवाय राहणार नाहीं. सध्यां जो संघर्ष निर्माण झाला आहे तो या वस्तुस्थितीची दखल न घेतल्यानें झाला आहे असें मला वाटतें. योजनेनुसार आपल्यापुढें फार महत्त्वाचें ध्येय आहे. पण यावर्षी आपल्याला असें एकाएकीं आढळून आलें कीं, शेतकी मालाच्या उत्पादनाचा प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केल्याशिवाय योजनेची अखंड प्रगति होऊं शकत नाहीं. राज्यानें ही जबाबदारी अंगावर घेतली पाहिजे आणि त्या अनुषंगानें येणारा दोषहि स्वीकारावयास हवा. येथें एकत्र बसून आपण आजपर्यंत जें केलें त्याचा विचार करावयास हवा. आपण जें करावयास हवें तें केलें किंवा नाहीं,नसेल केलें तर तें करण्यांत आपण अयशस्वी कां झालो ? आणि सर्व परिस्थिती सुधारण्यास उपाय कोणते यांचा विचार येथें व्हावयास हवा. या प्रश्नांवर तुम्ही गंभीरपणें विचार करावा अशी माझी सूचना आहे. शेतकी उत्पादनाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे मार्ग आपण शोधून काढावयास हवेत. आपण इतर सर्व बाबतींत यशस्वी झालों आणि शेतकी उत्पादनाच्या बाबतींत यशस्वी होऊं शकलों नाहीं तर तें यश खरें यश ठरणार नाहीं.

कदाचित् ईश्वराची कृपा होऊन आपल्या पुढील अडचणींचे निवारण होईल पण तरीहि आपल्याला भविष्यांत कठीण काळाला तोंड द्यावें लागलें तर आपण त्यासाठीं सिद्ध रहा. लोकांत आत्मविश्वास निर्माण करा ! लोकांत अविश्वास असेल तर त्याचें निराकरण कसें करतां येईल तें पहा ! आपल्याला जी महत्त्वाचीं उद्दिष्टें लक्षांत ठेवावयाची आहेत त्यापैकीं कांहींचा मी उल्लेख केला आहे. हीं उद्दिष्टें साध्य करणें हें आमचें ध्येय आहे. ज्यावेळीं तुमच्या जिल्ह्यांतील एखाद्या प्रश्नाचा तुम्ही विचार करतां किंवा तुम्हाला एखादी शंका असते त्यावेळीं तुम्ही या मूलभूत तत्त्वाचें चिंतन करा ! शंका असेल तेव्हां ' मूलभूत तत्त्वांचें चिंतन करा ' या सिद्धांतावर माझा विश्वास आहे. जीवनाचें हें चिरंतन तत्त्व आहे. तुमचा मूलभूत तत्त्वांवरील विश्वास, निराशा आणि शंका यांचें निराकरण करील.

## यशस्वी राज्यकारभाराची कसोटी

यशस्वी राज्यकारभाराची अंतिम कसोटी कोणती असावी ? आपण एखादी कसोटी निश्चित केलेली बरी ! आपण अस्मिता आणि कार्यक्षमता याविषयीं नेहमींच बोलतों. पण या दोन्हीं शब्दांची निश्चित व्याख्या करणे कठीण आहे. अस्मिता आणि कार्यक्षमता हे तुलनात्मक शब्द आहेत. त्यांचें अर्थ देखील स्थलकालपरत्वें बदलत असतात. पण तरीहि वादांतील अशी एक कसोटी आहे ती म्हणजे आपण लोकांचें कल्याण करतो हें पुरेसें नाहीं तर लोकांना आपलें भलें केलें जात आहे हें वाटणें जरूर आहे, ही होय ! आपल्याला लोकांचें भलें करावयाचें आहे आणि त्यासाठीं आपण प्रयत्न पण करीत आहोत. मला याविषयीं अजिबात शंका नाहीं. तुम्ही करीत असलेल्या कष्टांची देखील मला जाणीव आहे. तरीहि लोकांचें समाधान हीच यशस्वी राज्यकारभाराची अंतिम कसोटी आहे. कदाचित् लोकांचें समाधान मोजण्याचें माप कोणतें ? असा प्रतिप्रश्न कोणी करीलहि. या प्रश्नाला एकदम उत्तर देणें खरोखरीच कठीण आहे. पण, प्रत्येक जण स्वतःपुरतें कां होईना पण हें माप शोधून काढूं शकतो. उदाहरणार्थ, कलेक्टर जेव्हां आपल्या जिल्ह्याच्या दौऱ्यावर जातात, तेव्हां त्यांना किती लोक भेटतात आणि तक्रारीसंबंधीं त्यांच्याशीं किती लोक स्पष्टपणें बोलतात हें मला माहीत नाहीं. पण कांहीं बाबतींत तरी लोक तसें बोलतात हें मला ठाऊक आहे. मला असें आढळून आलें आहे कीं, दौऱ्यावर असतां बरेच लोक मला येऊन भेटतात आणि कांहीं गोष्टी सांगतात. मी त्यासंबंधीं कलेक्टरांना विचारलें तर ते म्हणतात कीं, हे गृहस्थ माझ्याकडे कधींच आले नाहींत. ते जर माझ्याकडे आले असत तर वस्तुस्थितीची कल्पना देऊन मी त्यांचें समाधान केलें असतें.

लोक कलेक्टरांकडे जाऊन त्यांच्या तक्रारीसंबंधीं कां बोलत नाहींत हें मला माहीत नाहीं. तुम्हीं असें ठरविलें आणि तशी कल्पना लोकांना दिली कीं ते तुम्हाला एका विशिष्ठ ठिकाणीं भेटून तुमच्या पुढें त्यांच्या अडचणी आणि तक्रारी मांडू शकतात तर मला वाटतें कीं लोकांच्या समाधानाचें मोजमाप तुम्हांला करतां येईल. तुमच्या कार्याची परीक्षा करण्याचा हा एकमेव मार्ग नसला तरी तो महत्त्वाचा मार्ग निश्चित आहे.

## राज्यकारभाराची आंस

कलेक्टर हे फार महत्त्वाचे अधिकारी आहेत. मला जर असें कोणी विचारलें कीं राज्यकारभाराच्या यंत्रणेचा कलेक्टर हा कोणता भाग आहे, तर मी त्याला असें उत्तर देईन कीं, कलेक्टर हा राज्यकारभाराच्या यंत्रणेची आंस आहे. सबंध राज्याला जर एका विशाल पुरुषाची उपमा दिली तर आपण त्याचे केवळ डोळे किंवा कानच नाहीं तर दोन्हीं समर्थ असे बाहू पण आहांत. आपण पहावयाचें तें पाहिलेंच नाहीं किंवा चुकीचें पाहिलें, ऐकावयाचें तें ऐकलेंच नाहीं किंवा चुकीचें ऐकलें आणि करावयाचें तें केलेंच नाहीं किंवा चुकीच्या मार्गानें केलें, तर राज्याचें भवितव्य अंधारून जाईल. म्हणून माझी आपणाला अशी विनंती आहे कीं, मी जे आपणाला सांगितलें तें नीट ध्यानांत ठेवून नव्या राज्याच्या सुदृढ प्रगतीला योग्य असें वातावरण निर्माण करण्यासाठीं आपण अविरत प्रयत्न करा.

सामान्यतः जनतेशीं, विधान सभेच्या सदस्यांशीं आणि स्थानिक संस्थांशीं कलेक्टरांचे संबंध चांगले आहेत. पण तरीहि लोकांच्या प्रतिनिधीशीं कलेक्टर चांगले वागत नाहींत अशा तक्रारी कांहीं कलेक्टरांच्या बाबतींत माझ्याकडे अजूनहि येतात. एका कलेक्टरांची तर अशी पद्धत होती कीं, ते घरीं कुणालाच भेटत नसत हेंहि मला माहित आहे. ही पद्धत खरोखरीच चांगली आहे आणि मी तिला प्रोत्साहन पण देईन; पण एका आमदारांना त्यांची ही पद्धत माहित नसल्यानें ते त्यांच्या घरीं त्यांना भेटावयाला गेले. आमदारांना असें सांगण्यांत आलें कीं त्यांना कलेक्टरांना घरीं भेटतां येणार नाहीं. मला वाटतें यापेक्षां चांगल्यारीतीनें हेंच त्यांना सांगतां आलें असतें. त्या आमदारांनीं तक्रारीच्या सुरांत ही हकीगत मला लिहून कळविली. मी त्यांना समजाविण्याचा प्रयत्न केला आणि त्यांची चूकहि त्यांच्या निदर्शनास आणून दिली. तरीहि हें उदाहरण मला द्यावेंसें वाटतें. कारण अशा अनेक घटना असूं शकतील आणि कदाचित् त्याबाबत तक्रारहि करण्यांत आली नसेल.

कलेक्टरांविरुद्ध लोकांच्या प्रतिनिधीला माझ्याकडे तक्रार करावीशी वाटते याचाच अर्थ असा कीं अद्याप आपल्याला बरीच सुधारणा करणें

शक्य आहे. या बाबतींत मला कुठलेहि विशिष्ट नियम घालून द्यावयाचे नाहींत. आपण स्वतः एखादी पद्धत आपल्यासाठीं निश्चित करा मग ती प्रत्येक व्यक्ती गणिक बदलली तरी हरकत नाहीं. तुम्ही आमदारांना दोन महिन्यांत जरी एकदा व्यक्तिशः भेटलात तरी ते तुमच्या व त्यांच्या दृष्टीनें सोयीचें होईल. पुष्कळसे आमदार निरनिराळ्या सभासाठीं येतात आणि तुम्हांला असें वाटतें कीं आपण त्यांना भेटलों. पण कुठलीहि सभेंतील चर्चा ही एका विशिष्ट विषयापुरती मर्यादित असते आणि तीत लोकांच्या प्रतिनिधींना त्यांच्या तक्रारी किंवा इतर विचार सांगता येत नाहींत.

लोकांशीं संबंध ठेवण्याच्या बाबत अजूनहि सुधारणेला बरीच जागा आहे असें मला वाटतें. कलेक्टर याबाबतींत स्वतः लक्ष घालीत असून कसोशीनें प्रयत्न करीत आहेत, हें मला ठाऊक आहे. पण, त्यांच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांच्या बाबतींत मात्र हें म्हणतां येणार नाहीं. मामलेदारांच्या कार्यालयांत लोकांना वाईट वागणूक मिळते या संबंधींच्या कितीतरी तक्रारी मजकडे येतात. एक दोन वेळां तर माझ्याकडे राज्याच्या नव्या आणि जुन्या विभागांतून अशाहि तक्रारी करण्यांत आल्या कीं लोकांना थांबावयाच्या सोयीं नसल्यानें चपराशांनीं त्यांना मामलेदारांच्या कार्यालयांतून काढून लावलें. हें ऐकल्यावर मला खरोखरीच लाज वाटली. समाजवादी समाजरचना, लोकशाही आणि कल्याणकारी राज्य यांच्या गोष्टी आपण बोलत असतांना लोकांना अशी वाईट वागणूक देण्यांत आली तर ती खरोखरीच अतिशय चिंतेची गोष्ट आहे. म्हणून मला तुम्हांला असें सांगावेंसें वाटतें कीं ही परिस्थिती सुधारण्याचे मार्ग तुम्ही शोधून काढा आणि आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांना अशी जाणीव द्या. बाकी लोकांना चांगलें वागविणें हें त्यांचें कर्तव्य आहे. कांहीं मामलेदार चांगले वागतात हें मला ठाऊक आहे. आणि म्हणूनच मी हें विधान सर्वच मामलेदारांना उद्देशून करीत नाहीं.

तपासणी आणि अचानक दिलेल्या भेटी यासंबंधीं मी आतां बोलतों. तुम्ही जर सामान्य लोकांप्रमाणें मामलेदारांच्या कार्यालयाला भेट देऊन तेथें कसें कार्य चालले आहे तें पाहिलें तर मला तें आवडेल. अशा भेटीपासून तुम्हांला आणि सरकारला बरेंच शिकतां येईल. अचानक भेटी देणें

आणि तपासणी करणें हें सुधारणा घडवून आणण्याचे उत्तम मार्ग आहेत. कांहीं वेळां चुकांचा माणुसकीच्या दृष्टीनें विचार करावा लागतो हें मला मान्य आहे. तुम्ही अधिकाऱ्यांना शिक्षा करण्याकरितां कार्यालयांना भेटी द्या असेंहि मला म्हणावयाचें नाहीं. तुम्ही अपराध्याला शिक्षाच केली पाहिजे असें नाहीं. त्यांच्यावर कुणाची तरी नजर आहे असें त्याच्या ध्यानांत आणून दिलें तरी पुरें. पण एवढेंहि करून तो सुधारला नाहीं तर मात्र त्याला शिक्षा करा. जरूर असेल तर कडक शिक्षा करा. अपराध सिद्ध झाले असतांनाहि एकमेकांना वाचविण्याची प्रवृत्ति शेवटीं आपणा सर्वांनाच घातक ठरेल. कारण दिरंगाई आणि लांचलुचपत यांच्याशीं तिचा संबंध असतो.

## पेन्शनसंबंधीचे कागद

सचिवालयांत जर दिरंगाई होत असेल तर त्याबद्दलचा दोष घ्यायला मी तयार आहे. पण माझी कलेक्टरांना अशी विनंती आहे कीं मामलेदारांचे कार्यालय किंवा खेडें पातळीवरची दिरंगाई त्यांनीं दूर करावी. रेकॉर्डच्या प्रती मिळविण्यासारख्या अगदीं छोट्या बाबींच्या बाबतींत अजूनहि दिरंगाई होते आणि ती दूर करण्याचा मार्ग अद्यापहि आपल्याला गवसलेला नाहीं. याशिवाय आणखी अशाच कितीतरी गोष्टी आहेत कीं ज्यामुळें लोक त्रस्त होतात. परिणामतः आपण जें चांगलें केलेलें असतें तें वाया जातें.

चोपदार, कनिष्ठ कारकून आणि छोटे अधिकारी यांच्या पेन्शनचे कागद निकालांत काढण्यांत येणारी दिरंगाई ही अशीच एक चिंतेची बाब आहे. अकाऊंटंट जनरलनीं मला असें दाखवून दिलें कीं, १९४७ पासून म्हणजे सुमारें १० वर्षांपासून कांहीं पेन्शनची प्रकरणें तशीच अनिर्णित पडलीं आहेत. मला नेहमीं असें सांगण्यांत येत असे कीं, या दिरंगाईचा दोष सर्वस्वी अकाऊंटंट जनरलच्या कार्यालयावर आहे. म्हणून मी त्यांच्याशीं चर्चा केली आणि त्यांनीं मला असें पटवून दिलें कीं याबाबतींतील दोष सर्वस्वी त्यांच्या कार्यालयाचा नाहीं. यांत कांहीं गोष्टी अशा असतात कीं त्या आपल्याला देखील कराव्या लागतात. कदाचित् पेन्शनचे कागद हाता-

ळण्यासाठीं योग्य प्रशिक्षित नोकरवर्ग कलेक्टरांच्या कार्यालयांत नसेल किंवा तेथील नोकरवर्गाला उद्यावर काम ढकलण्याची संवय असेल. हेंहि खरें आहे कीं, कांहीं तांतडीनें लक्ष देण्यासारखे कागद कार्यालयांत येतात, आणखीहि कांहीं कामाकडे तांतडीनें लक्ष द्यावें लागतें. आणि या साऱ्या घाईगर्दींत पेन्शनचे कागद तसेच पडून राहतात. पण ते तसेच वर्षानुवर्षे पडून राहिल्यानें ज्यांनीं जन्मभर नोकरी केली त्यांच्यावर अन्याय होतो. एक वर्ष होऊन गेल्यावरहि त्यांची पेन्शन मंजूर झाली नाहीं तर त्याची त्यांना खंत कां वाटूं नये ? आणि त्याला आपण सर्वजण जबाबदार आहोंत. म्हणून माझी आपणाला अशी विनंती आहे कीं या छोट्या गोष्टी ध्यानांत ठेवून परत त्यांचा तपास करा आणि कांहीं पेन्शनचे कागद तसेच पडले असतील तर त्याबाबतींत काय करणें शक्य आहे आणि अडचणी असल्यास त्या कशा सोडवितां येतील तें शोधून काढा.

लांचलुचपत आणि दिरंगाई नष्ट करण्यास ज्यावेळीं मी आपणाला सांगतो त्यावेळीं जिल्ह्याच्या कारभारांतील अडचणी मला जाणवत नाहींत असें नाहीं. जिल्ह्याच्या कारभारांत सर्वस्पर्शी बदल करण्याची वेळ आली आहे असें मला वाटतें. नवे प्रश्न निर्माण झाले आहेत आणि परिस्थिती इतक्या मोठ्या प्रमाणावर बदलली आहे कीं जिल्ह्याच्या कारभार यंत्रणेला त्या दृष्टीनें जिल्हा व तालुका पातळीवर कार्यप्रवण करणें आवश्यक आहे. इतरहि राज्यांत या प्रश्नावर विचार चालू आहे. उद्‌भवलेले नवे प्रश्न व निर्माण झालेलीं नवीं कामें उत्तमरीतीनें पार पाडतां येतील असा बदल शोधण्याचा आम्ही सुद्धां प्रयत्न करीत आहोंत; मी याचा येथें मुद्दामच उल्लेख करीत आहे. कारण तुमच्या अडचणी सरकारला समजणें जरूर आहे. 'अमूक करा आणि अमूक करूं नका' असें नुसतें सांगितल्यानें अडचणी सुटणार नाहींत. आपल्याला जर निश्चित फळ हवें असेल तर त्याकरितां तुमच्या अडचणी बरोबर समजून घेणें आवश्यक आहे.

## *समान कार्यातील अधिकारी-सहकारी*

मी आपल्याला आपणांपुढील महान् कार्यातील माझे सहकारी समजतों. एखादा वरिष्ठ आहे किंवा एखादा कनिष्ठ आहे, एक मुख्यमंत्री आहे तर

दुसरा मंत्री आणि तिसरा उपमंत्री आहे असा प्रश्न नाहीं. मला तशी तुलना ध्यानांत ठेवून बोलावयाचें पण नाहीं. आपण सर्व समान आहोंत याची आपणाला जाणीव झाली पाहिजे. आपल्याला कांहीं तरी महत्त्वाचें साधावयाचें आहे. गेल्या १२ एप्रिलला मुख्यमंत्री या नात्यानें मी लोकांना एक आश्वासन दिलें होतें त्याची मी पुनरुक्ति करतो. मी त्यांना असें आश्वासन दिलें होतें कीं, निःपक्ष आणि कार्यक्षम राज्यकारभार निर्माण करण्यासाठीं कुठलाहि प्रयत्न शिल्लक ठेवला जाणार नाहीं. मी त्यांना हें आश्वासन दिलें यावेळीं आपण सर्व माझ्या नजरेसमोर होता. राज्याच्या नोकरवर्गाबद्दल मला पूर्ण विश्वास आहे. राज्यकारभाराची उच्च परंपरा, रीतिरिवाज, अस्मिता आणि कार्यक्षमता हीं माझें आश्वासनें विफल होऊं देणार नाहींत अशी माझी खात्री आहे.

उच्च परंपरा ही जशी अभिमानाची तशीच जबाबदारीची बाब असते. त्या उच्च जबाबदारीची तुम्हाला जाणीव असल्यामुळें तुम्ही,मी आणि आपण सर्वजण लोकांच्या सेवेचें आपलें ध्येय गांठू शकूं अशी मला खात्री आहे.

( ता. ३-९-५७ चे कलेक्टर परिषदेंतील भाषण )

◆◆◆

**"सरकारी अधिकारी हे जनचे सेवतेक आहेत; पण ते सरकारला जबाबदार आहेत, जनतेला नाहींत. अधिकाऱ्यांना जनतेची जो सेवा करायची ती अधिकारावर असलेल्या सरकारच्या कार्यक्रमामार्फत करावयाची असते."**

# कल्याणकारी राज्यांत पोलिसदल

***

**पोलिस दलानें आपल्या स्वतःलाच प्रश्न विचारावा कीं आपण काय केलें आणि जनतेच्या मनांत आपणाविषयीं विश्वास उत्पन्न होण्याइतके यश आपण मिळविले आहे काय ? तुमच्या वागणुकीनें जनतेला असे वाटले पाहिजे कीं पोलिस दल हे आपले रक्षणकर्ते आहे. नडी अडचणींच्या वेळीं आपण त्या दलाकडे वळले पाहिजे...**

***

या प्रसंगाला आपणा सर्वांना ( पोलिस अधिकारी ) भेटण्यांत मला आनंद होत आहे. आपणापैकीं एकेकास मी पूर्वी भेटलो आहे परंतु सर्व अधिकाऱ्यांना सामुदायिकरितीनें भेटण्याचा हा प्रसंग विशेष महत्त्वाचा आहे. माझ्यासमोर मी आज तरूण, हुशार अधिकारी जमा झालेले पहात आहे. ते आपले प्रश्न आणि कामांतील अनुभव याची आपापसांत चर्चा करीत आहेत. आपले मुद्दे एकमेकांस सांगत आहेत आणि त्यांतून असे निष्कर्ष ते शोधणार आहेत कीं, ज्यांचा उपयोग त्यांना आपल्या पुढच्या कार्यांत होणार आहे. खरोखर विचाराल तर मी अशा संधीची वाटच पहात होतो. सर्वांना एकदम सामुदायिकरीतीनें माझें मन एकदां खुलें करावें असें मला वाटत होते.

आपण सर्व जाणता कीं, एका मोठ्या कार्यात आपण सर्वजण गुंतलो आहोत. एका तऱ्हेनें खांद्याला खांदा लावून काम करणारे आपण सहकारी आहोत. निरनिराळ्या पातळीवरची जबाबदारी आपणाला वाटून घ्यावयाची आहे. आपणाला एकाच समान—ध्येयाकडे जावयाचे असून एकाच समान कार्यक्रमांत आपले हात गुंतलेले आहेत. आणि म्हणून मी मोकळ्या मनानें बोलण्याचा प्रयत्न करणार आहे. कांहीं थोड्या जणांना हें कदाचित् आवडणार नाहीं; त्यांनीं मला क्षमा करावी. त्यांनीं लक्षांत घ्यावे कीं, मी कोणा व्यक्तींवर टीकास्त्र उगारलेले नाहीं तर आपल्या पुढच्या कार्याकडे माझी नजर आहे. त्यासाठीं सरकारसह आपणा सर्वांचेबाबत माझे विचार मोकळेपणानें मी मांडणार आहे. आपल्या कार्यात संपूर्ण यशस्वी झाल्याचा दावा आपण आज मांडू शकत नाहीं. या बाबतींत केवळ अधिकारीच सदैव जबाबदार असतात असे नाहीं. आपल्या अपयशाला कांहीं वेळां समोरच्या प्रश्नाचें स्वरूप नीट आकलन न झाल्याचे कारण होते तर कांहीं आपल्या धोरणांत कोठें तरी अपूर्णता राहून गेलेली असते. स्वाभाविकपणेंच आपण अगदीं मोकळेपणानें बोलून आपापली मनें जाणून घेतल्याशिवाय आपणाला जें काम करावयाचें आहे तें करणें अशक्य होईल. आपण सर्वजण असे क्वचितूच एकत्र येतो. आणि कधीं जमलोच तर घाईघाईत असतो. एखाद्याप्रसंगीं आजच्याप्रमाणें जेव्हां खास चर्चेसाठींच सर्वजण जमू तेव्हां परस्परांशीं विचारविनिमय करता येतो. विचारपूर्वक आणि योजनापूर्वक आपल्या प्रश्नाचा विचार करता येतो. या दृष्टीनें आजची सभा तुम्हा सर्वांना आणि सरकारलाहि उपयुक्त ठरेल. सरकारला तुमचे सामूहिक मन कळेल. तुमच्या विचारांना योग्य मार्गानें बाहेर पडण्याची आज संधीच मिळणार आहे.

राज्यामध्यें पोलिसांचे म्हणून जें काम आहे त्याच्या तपशिलांत शिरण्यापूर्वीं साधारणपणें माझीं मतें मी प्रथम मांडतों. स्वातंत्र्यापूर्वीं पोलिसांना जें काम करावे लागले ते आणि आजच्या परिस्थितींत जें काम त्यांना करावयाचे आहे त्यांत मोठें अंतर आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या बाबतींत मी फारसा तपशिलांत शिरत नाहीं. कारण आपण सर्वजण ती परिस्थिती जाणतो. आपले पोलिस दल हें आतां केवळ शांतता, सुव्यवस्थेचे

रक्षक दल राहिलेले नाहीं. जेव्हां आपण कल्याणकारी राज्याची गोष्ट करतो तेव्हां आपल्या प्रत्येक शाखेचे स्वरूप कल्याणकारी असले पाहिजे. खरोखर पहाता पोलिस अधिकारी अधिक कार्यक्षम बनून सरकारला कल्याणकारी राज्य निर्मितींत मदत करूं शकतील आणि तेच आपण बनावे अशी आमची अपेक्षा आहे.

तुमच्या यशाची कसोटी काय? लोकशाही जमान्यांत जनतेचे समाधान हीच राज्ययंत्रणेची कसोटी आहे. लोकांच्या समाधानी उद्गारांना सर्वांत जास्त मोल आहे. जनतेचे समाधान ही चीज मोठी विशाल आहे. तिच्या मर्यादेची व्याख्या करणें सोपे नाहीं. पोलिस खात्याच्या यशाची कसोटी अधिक मोजक्यारितीनें मांडतां येईल; आणि ती म्हणजे जनतेचा विश्वास आपण किती मिळवू शकता ही आहे. मला असें वाटते कीं, पोलिस हा दुर्बलांचा स्नेही आणि दलितांचा सहाय्यकर्ता होणें हे त्याचे कर्तव्य आहे. वरिष्ठ जागावरच्या अधिकाऱ्याबरोबर मला वरचेवर काम करावे लागते. इथल्या बहुतेक सर्वांना मी ओळखतो. निरनिराळ्या श्रेणीचे अनेक अधिकारी असे आहेत कीं ज्याचा सरकारला अभिमान वाटावा; असा अधिकारी वर्ग आहे कीं ज्याच्याबद्दल मला स्वतःला मोठा अभिमान वाटतो; असें असतांना मी जें मोकळेपणानें बोलतो ते स्वाभाविकच सर्वसाधारण स्वरूपाचे असते.

गेल्या वर्षी आपणाला जें काम करावे लागलें तें फार कठिण काम होते हे मी जाणतो. आपले राज्य कठिण काळांतून जात आहे. जनता अस्वस्थ मनःस्थितींत आहे. ही नव्या राज्याची घडण केवळ जनतेच्या कल्याणासाठींच आहे आणि त्यांनीं ती मान्य करावी हे जनतेला आपणाला पटवून द्यावयाचे आहे. नुसत्या चर्चेनें, वादविवादानें त्यांची समजूत पटणार नाहीं. त्यांना मनाला असें पटलें पाहिजे कीं, जें केलें आहे तें त्यांच्या हिताचे आहे. आपणाला तसे वातावरण निर्माण करावयाचे आहे. आपण प्रत्येक जण आपल्या मनाला हा प्रश्न विचारूं या. गेल्या दहा वर्षांकडे मागे वळून पहातांना आपणाला आढळेल कीं, आपण खात्रीनें प्रगती केलेली आहे. कल्याणकारी राज्याच्या यंत्रणेची पायाभरणी आपण केलेली आहे. पण आपण त्याच वेगानें पुढें जात आहोंत का? हा खरा

दा. क. १००८९

महत्वाचां प्रश्न असून त्याचें उत्तर शोधावयाचें आहे. पोलिस अधिकाऱ्यापुरते मी असें म्हणेन कीं, ज्याची परीक्षा त्यानें स्वतःच घ्यावी. वरिष्ठ-श्रेणीच्या या अधिकाऱ्यांची कसोटी आणखी कोणीतरी लावावी हे मला बरे वाटत नांहीं. आपले आपणच आत्म–परीक्षण करावे आणि आपल्या कामाच्या आठवड्यानंतर, महिन्यानंतर किंवा वर्षानंतर तुम्ही तुम्हालाच प्रश्न विचारावा कीं आपण काय केले आणि जनतेच्या मनांत आपणा-विषयीं विश्वास उत्पन्न होण्याइतके यश आपण मिळविले आहे काय? जर या प्रश्नाचें उत्तर आपल्या मनानें होकारार्थी दिलें तर तुम्ही तुमचे कर्तव्य बजावलें असें होईल. जर या प्रश्नाचे उत्तर तुमच्याच मनानें नकारार्थी दिलें तर तुम्ही तुमच्या प्रयत्नांची अधिक शिकस्त केली पाहिजे आणि अधिक कार्यश्रम बनले पाहिजे हा त्याचा अर्थ होईल.

आपण जे ऐक्य घडवून आणीत आहोत ते केवळ व्यावहारिक नाहीं. सर्वांचे भावनात्मक ऐक्य आपणाला घडवून आणावयाचें आहे. आपण असे ओळखलें पाहिजे कीं, या नव्या राज्यांत आलेल्या प्रत्येक विभागास कांहीं सक्रीय वाटा उचलावयाचा आहे. तसें झालें तरच सर्वांना सुखदायक वातावरण निर्माण होणार आहे. कॉन्स्टेबल्स्, हेडकॉन्स्टेबल्स आणि सब्-इन्स्पेक्टर्स यांचेमध्यें ही भावना निर्माण करण्याचें कार्य तुम्हां अधिकाऱ्यांना करावयाचें आहे. कॉन्स्टेबलपुरता हा प्रश्नच येणार नाहीं. कारण ते आपापल्या मूळ जिल्ह्यांतच रहाणार आहेत. त्यांच्या बदल्या होणार नाहींत. परंतु सब्-इन्स्पेक्टर्स लोकांत आपणाला हा विश्वास निर्माण करावयाचा आहे. वरच्या श्रेणीवर असलेल्या तुम्हा अधिकाऱ्याबद्दल मला फारशी तक्रार करावयाची नाहीं. पण त्या खालच्या श्रेणीच्या अधिकाऱ्यांबद्दल मला बरीच तक्रारीस जागा दिसते.

परंतु जेव्हां खालच्या श्रेणीच्या अधिकारी वर्गाबद्दल मी तक्रार आहे म्हणतो तेव्हां ती तक्रार खरें पहाता तुमच्याविरुद्धच येते. कारण तुमच्या वर्गानेंच त्यांना नेतृत्व द्यावयाचें आहे. तुम्ही म्हणजे पोलिस राज्याच्या पोलिस संघटनेचे आघाडीवरचे पुढारी आहांत आणि तुमच्या कामांत तुम्ही कमी पडतां कामा नये. जर एखाद्या सैन्याला माघार घ्यावी लागली तर त्या अपयशाचा धनी तिचा सेनानायक ठरतो. जर मुंबई राज्यांत

माघार झाली तर मी विधिमंडळांत असे म्हणू शकणार नाहीं कीं पोलिस खात्यानें मला अपयश दिलें. मला म्हणावे लागेल कीं मी अयशस्वी झालो. म्हणून या प्रश्नाकडे तुम्हीं या नेतृत्वाच्या नजरेनें पाहिले पाहिजे. केवळ तुम्ही स्वतःचे काम व्यवस्थित करण्यानें कार्यभाग होणार नाहीं तर तुमच्या हाताखालचे लोकहि चांगले वागतात आणि लोकांचे कल्याण साधतात हे पहाण्याचे काम तुमचें आहे. तुम्हा सर्वांच्या वागणुकीनें जनतेंत असा एक विश्वास निर्माण झाला पाहिजे कीं पोलिस दलाकडे त्यांनीं आपले रक्षणकर्ते म्हणून पाहिले पाहिजे, त्या दलाकडे मदतीसाठीं वळले पाहिजे.

आपण सर्व अधिकारी वर्ग आपल्या हाताखालच्या पोलिस ठाण्यास अकल्पित भेट देऊन तपासणी करतां कीं नाहीं मला माहीत नाहीं. मला स्वतःला पोलिस ठाण्यास भेट देण्याची इच्छा होते. एकदोन वेळीं मी मराठवाड्यांतील पोलिस ठाण्याला डी. आय्. जी. ना बरोबर घेऊन भेट दिली. ते पोलिस स्टेशन म्हणजे मराठवाड्यांतीलच नव्हे तर साऱ्या राज्यांतील एक नमुना होता. इन्स्पेक्टर जनरलनी आपल्या भाषणांत म्हटल्याप्रमाणें पोलिस ठाण्याचा अधिकारी हा हॉस्पिटलमधील डॉक्टरसारखा असला पाहिजे. त्याच्याकडे कोणी तक्रार घेऊन गेला तर डॉक्टरकडे येणाऱ्या रुग्णासारखी त्याची विचारपूस केली पाहिजे. त्याची तक्रार समजून घेण्यास मदत होईल असे प्रश्न विचारले पाहिजेत. मला वाटते असें अजून घडत नाहीं. हे आपले हेतू साध्य होण्यासाठीं कोणते मार्ग व व्यवस्था करावी त्याचा शोध केला पाहिजे. आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यामध्यें हें वातावरण निर्माण केल्याशिवाय जनतेचें समाधान होणार नाहीं. मला हें कळतें. कीं ही गोष्ट मी सहज बोलून गेलो ती प्रत्यक्षांत आणण्यास प्रयत्नांची गरज आहे. पण मी नुसती आपल्या कार्याची दिशा आणि मार्गांचा उल्लेख करीत आहे. त्या मार्गावरून शेवटीं यशाकडे जावयाचें आहे.

मी तुम्हांला स्पष्टपणें सांगितले पाहिजे कीं लोक बऱ्याच वेळां पोलिस अधिकाऱ्याविरुद्ध वैयक्तिक तक्रारी करतात. ते सांगतात अमूक अधिकारी बरा आहे. अमूक वाईट आहे. अशी बोलणी नेहमी चालतात. या तक्रारींची मला फारशी काळजी वाटत नाहीं. परंतु संपूर्ण पोलिस खात्याबद्दलच लोक बरे बोलेनासे होतात तेव्हां वाईट वाटते. आपले नागरिक

कृतघ्न आहेत का? कां ते अप्रामाणिक आहेत? जर लोक चांगले आहेत तर आपल्या दलाबद्दल बरें का बोलत नाहींत? एखादी व्यक्ति कृतघ्न असूं शकेल. दुसरी एखादी व्यक्ति त्याची री ओढेल. तिसरा त्यांना साथ देईल. असेंहि होईल कीं एखादा गट अशा कृतघ्नपणानें वागेल असें समजू या पण असें आपण कसें म्हणूं शकू कीं सारा समाज कृतघ्न बनला आहे! तुम्हीं विचार कराल तर आढळेल कीं जनता कृतज्ञ आणि सत्य प्रियच असते. त्यांचे मत सदैव बरोबर ठरते. मलातरी हा विश्वास आहे. एखादी व्यक्ती चुका करील. एखादा पुढारी चुकेल. एखादा गट चुकीच्या मार्गानें जाईल. पण सर्व समाज कधींहि चुका करीत नाहीं. जर समाज असें म्हणतो कीं, पोलिसदलांत कांहींतरी चुकलेले आहे तर आपण शोधून पाहूं या. मी हे आत्मशोधनाचें काम तुमच्यावरच सोपवित आहे. पोलिशी कामांतला मी कांहीं तज्ञ नाहीं.

आपल्या दलांत आतां डी. आय. जी. हुद्यावरचे खूप लोक आहेत. त्यांनीं आतां आपल्या पोलिसदलाच्या नेतृत्वाची जबाबदारी घेतली पाहिजे. पोलिस दलांतील इतर व्यक्तींना साह्य देऊन मार्गदर्शन करण्याचें काम या डी. आय. जी. पदावरच्या अधिकाऱ्यांचें आहे. पूर्वीं आपलें विभाग फार मोठे होते, आतां सुटसुटीत लहान विभाग केलेले आहेत. प्रत्येक डी. आय. जी. कडे साधारण आठ जिल्हे येतात. या विभागांत जें घडेल त्या जिल्ह्यांतील जिल्हा सुपरिटेन्डेण्टलाच मी त्याबद्दल जबाबदार समजेन असें नव्हे तर त्या विभागाच्या डी. आय.जी. वरहि ती जबाबदारी आहे असें मी मानतो. डी. एस. पी. हे आपल्या जिल्ह्यांत काय घडतें त्याला प्रत्यक्ष जबाबदार आहेत हें खरें पण त्याचबरोबर डी. आय. जी. ज्या त्रयस्थ दूरस्थ नजरेनें एखाद्या घटनेकडे पाहूं शकतील तसें डी. एस. पी. करू शकणार नाहीं. म्हणून मी डी. आय. जी. पदावरच्या अधिकाऱ्यांना विनंतीपूर्वक सांगेन कीं त्यांनीं डी. एस. पीं. ना योग्य अंतरावर राहून प्रत्यक्ष हस्तक्षेप होऊं न देतां कामांत मार्गदर्शन करावे. डी. आय्. जी. ची बुद्धीमत्ता, अनुभव, शिक्षण याचा उपयोग डी. एस. पी. ना झाला पाहिजे. ही माझी सर्वसाधारण कल्पना आपणापुढें ठेवली आहे. त्या दृष्टीनें आपण पुढें पहा.

दंगा दंगलीच्या वेळीं दंगेखोरांशीं कसें वागावें याबद्दलहि मला थोडसे बोलावयाचे आहे. गेल्या कांहीं दिवसांत बऱ्याच वेळीं मी याबाबत माझी मतें बोललों आहे. विधिमंडळांत केलेल्या माझ्या भाषणांची प्रत प्रसिद्धी खात्यातर्फे तुमच्याकडे आली असेल असें मी समजतो. बदलत्या कालानुसार या दंगलीसारख्या प्रसंगीं आपली वागणूक आणि धोरण कसें असावें त्याचा खुलासा त्या भाषणांत आहे. विशेष गोष्टीवर कसा भर द्यावा तेहि मी बोललो आहे. तुम्हांस माहित आहे कीं योग्य कारणाकरितां निदर्शन करणें किंवा प्रसंगीं संपावर जाणेचा हक्क घटनेनेंच नागरिकांना दिलेला आहे. त्यामुळें सरकार कोणत्याहि पक्षांचे असो आणि त्या सरकारचें धोरण कांहींहि असो पण यासारख्या अवघड परिस्थितीला तोंड देण्याचा प्रसंग पोलिस दलावर येणारच आहे. मला एवढेंच नमूद करावयाचें आहे कीं विविध प्रकारच्या समुदायाला तोंड देतांना आपण हत्याराला हात घालतां कामा नये. याचा अर्थ मी तुम्हांला शक्तिहीन करूं इच्छितो असा बिलकूल मानूं नका. जर तुम्ही दुर्बल बनला तर त्याचा अर्थ मी बलहीन झालो असा होईल. तसा माझा उद्देशहि नाहीं. परंतु उठल्याबसल्या हत्यारावर विसंबण्याची वृत्ती सोडली पाहिजे हें माझें सांगणें आहे.

गोळीबाराबाबत एका अनुभवी अधिकाऱ्यानें असें मत दिलें आहे कीं जेव्हां जेव्हां गोळीबार केला तेव्हां शेकडा नव्वद प्रसंगाला गोळीबाराचा हुकूम कमकुवत मनाच्या अधिकाऱ्याकडून प्रथम दिला गेला असें आढळतें. तसेंच त्या वृत्तीच्या लोकांकडूनच प्रथम गोळी झाडली जाते हें सर्वसाधारण गणित आहे. पण सर्व परिस्थिती पहाता असा निष्कर्ष काढावा लागतो यांत शंका नाहीं. जास्त दमदार माणूस सहजासहजी हत्याराला हात घालत नाहीं. आणि म्हणून अवघड प्रसंगीं आपण व्यवस्थेची सूत्रें योग्य माणसांचेच हातीं देतो कीं नाहीं हें पहाण्याचें काम तुमच्यावर आहे. जर अशी माणसे तयार झालेली नसतील तर ती तयार केली पाहिजेत. सर्वांत प्रथम या गोष्टीकडे लक्ष दिलें पाहिजे. सरकारला कांहीं जादा खर्च येणार असला तरी आपण तो करूं. आपण स्वतःची खात्री करून घेऊं या कीं कठिण काळांत कसोटीला उतरतील असे लोक आपल्या दलांत आहेत आणि ते कसल्याहि परिस्थितीला तोंड देतील. गेल्या कांहीं दिवसांत मुंबई,

पुणें व इतरत्र जे शिक्षणाचे वर्ग घेतले ते या दृष्टीनें अर्थातच उपयुक्त ठरले. बदलत्या परिस्थितींत आपण फरफटत न जाता पुढें काय घडणार हें ओळखून त्या भविष्याला तोंड देण्याची तयारी ठेवली पाहिजे.

गेल्या कांहीं दिवसांत चॅप्टर केसेसची संख्या सर्व जिह्यांत फार वाढली आहे अशी मी टीका ऐकली. एस्टीमेटस् कमिटीचा अहवाल आपण सर्वांनी एकदा पहावा. पोलिसदलाबद्दल काय बोललें जातें हें आपणा सर्वांना कळले पाहिजे. पोलिस ॲक्टच्या कांहीं कलमांचा उपयोग कायदा व व्यवस्था राखण्यासाठीं करण्याऐवजी इतर हेतूनें केला जातो अशी टीका ऐकूं येते. हे म्हणणें कितिसे सत्यासत्य आहे तें आपणच पहावें: एका जिल्ह्यांत माझ्या माहितीप्रमाणें ९०० चॅप्टर केसेस भरल्या गेल्या आणि त्यापैकीं ७०–८० केसेसच कोर्टांत टिकल्या. पोलिस खात्याविरुद्ध हा फार मोठा निवाडा आहे, असें दिसेल. कांहीं अधिकाऱ्यांची माझ्या दौऱ्यांत मी गाठ घेतली. एका खेड्यांत दोन फळ्या होत्या; तेथील वस्तुस्थितीची मी माहिती घेतली. कोणाहि माणसास त्या ठिकाणच्या कोणत्या गटाचे चुकले आहे हें सहज कळून आलें असतें. परंतु तेथील अधिकाऱ्यांनीं तटस्थ प्रेक्षकांचीच भूमिका घेतल्याचें आढळलें. कदाचित त्याला वाटलें असेल कीं दोन्ही पक्षाविरुद्ध कारवाई सुरू करून आपण बाजूला सरावे.

अशी भूमिका आपण घेऊं शकता पण ती बरोबर ठरणार नाहीं. एक तऱ्हेनें आपल्या जबाबदारीला बगल देण्याचा हा प्रकार आहे. तसें न करतां प्राप्त परिस्थितीची जिम्मेदारी स्वीकारली पाहिजे. आपलें कर्तव्य बजावत असताना कांहीं चुका होऊं शकतील पण जर त्या चुका योग्य हेतूच्या मार्गात घडलेल्या असल्या तर क्षम्य ठरतील. जर चुका होण्याचा संभव टळावा म्हणून परिस्थितीची जबाबदारीच घ्यावयाची नाहीं असें आपण ठरविलें तर पोलिस दलाचे सदस्य या नात्यानें मोठ्यांत मोठा गुन्हाच आपण केला असें होईल. जबाबदारीची वेळ आली तर तिला तोंड द्या. योग्य मार्गानें जात असतांना कांहीं चुका झाल्या तरीहि तुमचे वरिष्ठ अधिकारी व सरकार तुमच्या पाठीशी उभे राहील.

## कोर्टातील खटले-सुटका

कोर्टांत पाठविल्या जाणाऱ्या फौजदारी खटल्यांत आरोपी दोषमुक्त ठरल्याची संख्या फार मोठी आहे. आपलें सर्वांचे लक्ष या गोष्टीकडे मी मुद्दाम वेधूं इच्छितो. प्रामुख्यानें डी. आय्. जी. मंडळींनी याबाबतींत लक्ष घालून या खटले सुटण्याच्या परिस्थितीस कसा आळा घालता येईल याबाबत सरकारला त्यांचा सल्ला द्यावा. कोर्टांत खटले भरल्यानंतर इतक्या मोठ्या संख्येनें आरोप नाशाबित होतो याचा अर्थ आपल्या चौकशी पद्धतींत कांहींतरी मोठा मूलग्राही दोष आहे असें मला वाटतें. या चुका कोणत्या त्या शोधून नाहीशा केल्याशिवाय कारभार सुधारणार नाहीं. अशा तऱ्हेनें कोर्टांत खटले सुटण्यानें आपणाला दोन्ही बाजूंनीं दोषाचे वांटेकरी व्हावें लागतें. न्यायाधीश आणि जनता दोघांचाही ठपका मिळतो. आपण जर योग्यरीतीनें गुन्हे सिद्ध करूं शकलो नाहीं तर कायदा अंमलबजावणींत आपण दुर्बल ठरलो असाच त्याचा अर्थ होईल. आपल्या पोलिस दलाने चुकीच्या लोकांवर खटले भरले किंवा खऱ्या गुन्हेगारांना पकडले पण खटला चुकीच्या मार्गानें चालविला तर पोलिसच गुन्हेगार ठरतात. असा आक्षेप पोलिसांवर येता कामा नये. जर सद्हेतूने ते प्रयत्न करतील तर यशाचा संभव वाढलाच पाहिजे. या परिस्थितीची आपण गंभीरपणें दखल घेतली पाहिजे. सरकारहि या बाबतींत काय करतां येईल याचा विचार करीत आहे. सुटलेल्या केसेसबाबत पुन्हा छाननी करावी कीं काय असा एक विचारआहे. एवढेंच पुरेसे होईल असें मला वाटत नाहीं. खटला सुटल्यानंतर कोणीतरी तिसऱ्यानें येऊन खटला कसा सुटला नसता, हें तुम्हाला शिकवावे हेंच मला पटत नाहीं.

दुसरी एक गोष्ट माझ्या नजरेस आली ती ही कीं जेव्हां जेव्हां गुन्हेगारी संबंधीं विचारणा तुम्हाकडे होते तेव्हां गेल्या दहापांच वर्षांचे आंकडे व या वर्षांचे आंकडे असे तुलनात्मक तक्ते तुम्ही देता. असें एखादे वर्ष तुलनेसाठीं घेणें मला योग्य वाटत नाहीं. केवळ आंकडे शास्त्रज्ञासाठीं ही तुलना ठीक असेल पण आपणासाठीं ज्या आकड्याची तुलना करावीशी वाटेल असें वर्ष अजून सांपडलेले नाहीं. तसें किमान गुन्हेगारीचे उत्तम वर्ष

अजून यावयाचे आहे. 'बिनगुन्हेगारीचे' वर्ष केव्हां येईल त्याकडे मी आशेने पहात आहे. सरकार वरिल प्रकारच्या आंकडेवारीला आतां मान्यता देणार नाहीं. जिल्ह्यांत सर्वत्र शांतता आहे हें दिसण्यासाठीं जीवित वित्त विषयक गुन्ह्यांची संख्याच कमी झाली पाहिजे. अजूनहि ग्रामीण भागांत जनतेला असुरक्षितता वाटत असते.

नुकतीच सरकारविरुद्ध मला रास्त टीका ऐकावयास मिळाली. असेंब्लीमध्यें आलेल्या एका तहकुबी सूचनेवरच्या चर्चेचा अहवाल तुम्हां सर्वांकडे पाठविण्यास मी गृहखात्याच्या चिटणिसांना सांगणार आहे. त्या चर्चेत काय बोललें गेलें हें सर्व तुम्हाला कळावें अशी माझी इच्छा आहे. मराठवाड्यांतील एका खेड्यांत सवर्ण हिंदूंचा एक जमाव महारवस्तीत गेला आणि त्यांनीं त्या महार लोकांच्या झोपड्या जाळून त्यांना बेदम मारहाण केली. आपण स्वतंत्र भारत आणि समाजवादी समाजरचनेच्या गोष्टी उच्चस्वरांत बोलत असतांना या विसाव्या शतकांत अशा गोष्टीं घडल्या. मला माझी स्वतःची आणि या राज्यांतल्या या परिस्थितीची खरोखर लाज वाटली. मला तुम्हा सर्वांना विनंती करावयाची आहे कीं या असल्या घटनेकडे तुम्ही काळजीपूर्वक लक्ष द्या.

पददलित म्हटल्या जाणाऱ्या हरिजनाना आपण सर्व तऱ्हेची मदत दिली पाहिजे. अशा घटनेची व्यवस्था स्थानिक अधिकाऱ्याकडे सोपवून भागणार नाहीं कारण त्याचे हात अनेक कामांत अगोदरच गुंतलेले असतात. हातातल्या केसेसचा छडा लावण्यासाठीं त्याला अनेकांना भेटावे लागते. कांहींजण त्याचे नेहमीचे टेहळये असतात. अशा लोकांच्या कोंडाळ्यांत तो अधिकारी गवसला म्हणजे गांवांतील जमात प्रमुखांकडून त्याच्यावर नाना तऱ्हेचे वजन आणलें जाते. साहजिकच दलितांचीं दुःखें तशीच राहून जातात. ही गोष्ट मला पसंत पडणार नाहीं; अशा घटनांची वार्ता कानीं आली कीं नुसता अहवाल मागवून थांबू नका. स्वतः वैयक्तिकरितीनें तपास करून सत्य शोधून काढा. आपण लोकांत अशी जाणीव निर्माण केली पाहिजे कीं चुकीच्या गोष्टी शासनाशिवाय सुटणार नाहींत. आपण लोकशाही जमान्यांत रहात आहोत; मतामतांचें अंतर कितीहि असो, पण समाजांतल्या कोठल्याहि वर्गाला कोणी दहशत दाखवितां कामा नये. हरिजनांना असा

विश्वास वाटला पाहिजे कीं आपली छळणूक होणार नाहीं. मी मुद्दाम या गोष्टीचा उल्लेख केला कारण मला या गोष्टीची बोंच अतिशय तीव्रतेनें वाटते. अशा प्रसंगी जरूरी वाटेल तेव्हां जिल्हा अधिकाऱ्यांना सांगून सर्व पक्षीय शांतता कमेट्यांची स्थापना करावी.

आपण लोकशाहीचे सेवक आहोंत. तुम्ही अधिकारी प्रत्यक्ष राजकारणांत भाग घेत नाहीं हें खरे; पण राजकीय पक्षांत असो किंवा सहकारी नौकरींत असो प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे कीं त्यानें देशाच्या विकासकार्यांत आपला भाग उचलावा. लोकशाही वृत्ती आणि संकेत यांची जोपासना करण्याचें काम सर्वांचे आहे. आपल्या समाजांत फार पूर्वींपासून या जात व वंशाच्या भेदानें धुमाकूळ घातलेला आहे. या दुष्टचक्रांतून लोकांनीं बाहेर पडले पाहिजे. प्रस्तुत परिस्थितींत तुम्ही मंडळी खूप मोठें जनसेवेचें काम करूं शकाल असें मला वाटतें.

## लांचलुचपतीचें उच्चाटण

आणखी एका विषयावर मला बोलावयाचे आहे. तो विषय म्हणजे लाचलुचपतीचा आहे. पोलिस खात्यांत मोहाचें क्षण फार येतात. इतर खात्यांत तुमच्यापेक्षांहि मोठ्या लाचलुचपतीची ओढ निर्माण होत असेल आणि तशी संधीहि येत असेल हें खरे पण पोलिस खात्याच्या कामांत प्रत्येक पाऊलागणीक संधी उभी राहून बोलावीत असते. तुम्ही दूर कसे पळाल ? तुम्हाला माहीत आहे कीं पूर्वीं मी स्वतःच एक राजकीय चळवळ्या होतो. पोलिस लोकांशीं निरनिराळ्या तऱ्हेनें माझा संबंध आलेला आहे. एका वेळीं मी खटला चालू असतांना तुरुंगांत होतो. पोलिस ठाण्याजवळच माझी जेल कोटडी होती. तीस दिवस अहोरात्र मी तेथील लाचलुचपतीचा प्रकार डोळ्यांनीं पाहिला आहे.

जर लाचलुचपत थांबली नाहीं तर आपणाला भविष्यकालच शिल्लक रहाणार नाहीं; मी अशा ठाम निर्णयाला आलो आहे कीं जर लाचलुचपत थांबली नाहीं, निदान तिला पायबंद बसला नाहीं तर या देशाचे भवितव्य ठीक नाहीं. आर्थिक क्षेत्रांत विकास होणार नाहीं कीं वागणुकींत सुधारणा दिसणार नाहीं. तुम्ही ही जाणीव स्वतःमध्येंच निर्माण करून भागणार

नाहीं तर तुमच्या हाताखालच्या लोकामध्येंहि ही जाणीव झाली पाहिजे. हाताखालच्या लोकांना शिक्षा करण्याचें कामीं संयम ठेवूं शकाल, त्यांना सुधारण्याची संधीहि देऊं शकाल पण ही संधी एकदाच मिळावी. गुन्ह्याची पुनरावृत्ती झाली तर त्याला सुटका नाहीं. त्यावेळीं तुम्ही अतिशय टणक राहिले पाहिजे. लांचलुचपत प्रतिबंधक यंत्रणा आपल्यामध्यें निर्माण करण्याचा विचार आहे. या प्रतिबंधक उपायाबाबत आम्ही यशस्वी होऊं शकलो नाहीं कारण प्रामुख्यानें आम्ही पोलिस दलावर विसंबून राहिलो. म्हणून या लांचलुचपत प्रतिबंधक यंत्रणेचा संबंध इतर खात्याशी ठेवण्यासंबंधीं मी विचार करीत आहे. हा फार महत्वाचा प्रश्न असून मी त्यांतून खात्रीनें मार्ग शोधून काढीन.

एखाद्या अधिकाऱ्याला आपल्या जिल्ह्यांत कामावर असतांना लाचलुचपत कमी झाल्याचें दिसलें तर त्यानें केलेल्या प्रयत्नांबाबत गुप्त अहवाल अधिकाऱ्यांनीं सरकारकडे पाठविला तरी चालेल. तुम्ही मला अशारितीनें लांचलुचपत कमी करण्याचा मार्ग दाखवूं शकता. तुमच्या हाताखालच्या पोलिस दलाला ही कसोटी लावल्याशिवाय तुम्ही तुमचे काम पूर्ण केलें असें मी समजणार नाहीं; या गोष्टीबद्दल पुन्हा पुन्हा मी बोलत रहावे असें मला वाटत नाहीं. मी मोकळेपणानें बोललो परंतु वैयक्तिक दृष्ट्या मी कोणाविरुद्ध नाहीं. आपल्या खात्याच्या सुधारणेस उपयुक्त अशा सूचना मला नेहमीं द्याव्याशा वाटतात. आपलें राज्य हे भारतांतील एक उत्कृष्ट राज्य मानलें जातें. मला माहित नाहीं त्यांत खरे किती ? कदाचित त्यात रूढ समजुतीचाहि कांही भाग असेल. आपल्यापुरतें बोलावयाचे तर मी अभिमानानें सांगेन कीं आमचें राज्य प्रगमनशील आहे. राज्याच्या मोठेपणाचा वांटा राज्ययंत्रणेच्या सर्व खात्यांतील नौकर वर्गाकडे जातो. मी आशा करतो कीं तुमचाहि त्या यशांत भाग आहे. तुम्ही तुमचे कठीण कर्तव्य तत्परतेनें आणि हंसतमुखानें पार पाडा. मी तुमचा आभारी आहे.

[ भाषण १९–१२–५७ ]

◆◆◆

# पोलिस गोळीबार आणि चौकशी

***

स्वातंत्र्यांत गोळीबार ! ही गोष्टच कानाला चमत्कारिक वाटते. कारण पारतंत्र्यांतील गोळीबार आपल्या आठवणींत रेंगाळत आहेत. पण शासन संस्थेला नाइलाजानें राज्य व रयत रक्षणासाठीं गोळीबार करावा लागतो हें तत्व कोणी नाकारू शकणार नाहीं. मग त्याची मर्यादा, आवश्यकता, हेतू आणि त्यासाठीं चौकशी...

श्री. चव्हाण ज्या सरकारचे नेते आहेत त्या सरकारचे मत पुढें उधृत केलेलें आहे.

***

## विधिमंडळांतील उत्तरें

अध्यक्ष महाराज, सरकारला या प्रश्नाबाबतचें आपलें धोरण स्पष्ट करण्याची संधि दिल्याबद्दल मी प्रथम हा ठराव मांडणाऱ्यांचे आभार मानतो. तसेंच ज्या सन्माननीय सभासदांनीं या चर्चेंत भाग घेऊन चर्चेची पातळी अत्यंत उच्च ठेवली त्यांचेहि आभार मानतो. एका दृष्टीनें या प्रश्नावरील ही चर्चा कांहींशी तात्त्विक स्वरुपाची ठरणार असली तरी संबंध

देशाच्या दृष्टीनें हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. ज्या प्रश्नामुळें लोकांच्या मनावर फार परिणाम झाला आहे अशा प्रश्नाबाबत लोकमतानुवर्ती सरकारनें आपलें धोरण स्पष्ट करण्याची जरूरी असते.

## मानवी जीविताच्या हानीबद्दल खेद

सुरुवातीस मला ही गोष्ट स्पष्ट करावयाची आहे कीं, मानवी जीवित मूल्यवान आहे याबाबत सरकार आणि विरोधी पक्षांचे सभासद यांच्यामध्यें मुळींच मतभेद नाहींत. आपण लोकशाही सरकार हें श्रेष्ठ प्रकारचें सरकार मानतो; कारण अशा प्रकारच्या व्यवस्थेंत मानवी जीवित अत्यंत महत्त्वाचें समजलें जातें. लोकशाही पद्धतीच्या सरकारमध्यें मानवी जीवित बहुमोल मानलें जातें, मानवी प्रतिष्ठा राखली जाते आणि व्यक्तिस्वातंत्र्याची व विकासाची हमी मिळते याबद्दल खात्री झाल्यानंतरच आपण लोकशाही पद्धतीचें सरकार स्वीकारलें आहे. तेव्हां महाराज, मानवी जीवित मूल्यवान आहे याबाबत मतभेद नाहींत. तेव्हां, ज्यामुळें मानवी जीविताची हानि होईल अशा प्रकारे गोळीबार करणें हें कोणत्याहि लोकशाही सरकारला आवडणार नाहीं आणि अशा गोळीबारामुळें मानवी जीविताची हानि झाली तर त्या गोष्टीबद्दल कोणत्याहि लोकशाही सरकारला निश्चितपणें खेद वाटेल. कोणत्याहि कारणामुळें अशा प्रकारे मानवी जीविताची हानि झाली असली तरी जे लोक मरण पावले ते याच देशांतील होते, ते याच देशाचे नागरीक होते आणि ते सर्वजण आपलेच बांधव होते, ही गोष्ट कदापीहि नाकारता येणार नाहीं. तेव्हां या प्रश्नाच्या या बाजूबाबतहि मतभेद असण्याची शक्यता नाहीं.

## कायदा व सुव्यवस्था राखणें

माननीय सभासदांनीं एक गोष्ट मान्य केली आहे, याबद्दल मला आनंद वाटतो. ती म्हणजे पोलिसांना गोळीबार करावा लागण्यासारखे प्रसंग उद्भवू शकतात. त्यांनी आपल्या ठरावाचा विषय राजकीय निदर्शनाविरुद्ध केलेल्या गोळीबारापुरता मर्यादित केला आहे. असें करतांना त्यांनीं हें मान्य केलें आहे कीं, इतर प्रकरणांत लोकमतानुवर्ती व लोकशाही सरकारलाहि पोलिस गोळिबाराचा अवलंब करावा लागतो. सामान्यतः,

कोणतेंहि लोकमतानुवर्ती सरकार या मार्गाचा अवलंब करीत नाहीं. खुद्द सरकार गोळीबाराचा हुकूम देते असें होत नाहीं. कायदा व सुव्यवस्था राखणें ही पोलिसांची जबाबदारी आहे आणि ती पार पाडण्यासाठीं पोलिसांना विशिष्ट परिस्थितींत जेथल्या तेथें निर्णय करावे लागतात. तेव्हां महाराज, या सर्व प्रश्नाचें सार इतकेंच आहे कीं, हा प्रश्न तात्त्विक विवेचनाचा नसून व्यवहाराचा आहे. पोलिसांना ज्या परिस्थितीत काम करावें लागतें त्या परिस्थितींतील त्यांच्या अडचणी आपण सर्वजण जाणून घ्याल अशी आशा आहे. मी ज्यावेळीं असें म्हणतों, तेव्हां त्याचा अर्थ पोलीस जे कांहीं करतात ते मी समर्थनीय मानतो असा नाहीं, परंतु त्यांना विशिष्ट जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात हें आपण समजावून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कायदा व सुव्यवस्था राखणें ही त्यांची जबाबदारी आहे.

कायदा आणि सुव्यवस्था म्हणजे काय आणि ती कशी राखायची याबद्दल मला विनाकारण विस्तृत विवेचन करावयाचें नाहीं. कायदा आणि सुव्यवस्थेबाबतची अंतीम कल्पना मनांत ठेवून मी सन्मान्य सभासद यांना असा प्रतिप्रश्न केला कीं, गृहमंत्र्यानें याबाबतचें धोरण कसें ठरवून द्यावें अशी आपली अपेक्षा आहे? नागरिकांना आपल्या मूलभूत हक्कांचा सुरक्षितपणें उपयोग करतां येईल अशी परिस्थिति निर्माण करणें म्हणजे कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करणें होय. कायदा आणि सुव्यवस्थेबाबतची मला वाटते हीच मूलभूत कल्पना आहे. मालमत्तेबाबतचे हक्क, भाषण स्वातंत्र्याचा हक्क वगैरे हक्क आणि मानवी जीवित धोक्यांत आहे अशी परिस्थिति निर्माण झाल्याचे जेव्हां एखाद्या पोलिस अधिकाऱ्याला आढळून येतें तेव्हांच तो गोळीबार करण्याचा हुकूम देतो. अर्थातच त्यानें आपल्या तारतम्य बुद्धीचा योग्य उपयोग केला पाहिजे. सन्मान्य सभासद यांनीं लोकशाहींत कोणालाहि नियंत्रण ठेवल्याशिवाय तारतम्य बुद्धीचा वापर करू देतां कामा नये या गोष्टीवर भर देण्याचा प्रयत्न केला. मलाहि त्याबद्दल शंका नाहीं;नाहींतर ती लोकशाहीच राहणार नाहीं.परंतु या तारतम्य बुद्धीच्या वापरावर नियंत्रण कसें ठेवावयाचें हा पुन्हा व्यावहारिक प्रश्न आहेच. आणि नेमका याच ठिकाणीं असा प्रश्न उद्भवतो कीं, पोलिसांनी केलेल्या प्रत्येक गोळीबाराची न्यायालयीन चौकशी करण्याचा हुकूम दिला

पाहिजे किंवा कसे ? सरकारचें सध्यांचें याबाबतचें धोरण काय आहे ? महाराज, पोलिसांनीं केलेल्या प्रत्येक गोळीबाराची—मग त्यांत जीवित हानि झाली नसली आणि कांहीं इसमांना किरकोळ दुखापती झाल्या असल्या तरी—चौकशी करण्याचे धोरण या सरकारने यापूर्वीच स्वीकारलें आहे. परंतु ही चौकशी मॅजिस्ट्रेट मार्फत करण्यांत येईल. याचा अर्थ पोलिस कमिशनर किंवा जिल्हा भागांत पोलिस खात्याचे प्रमुख किंवा अन्य कोणी पोलिस अधिकारी हें चौकशीचें काम करतील असा नाहीं; तर बृहन्मुंबईत चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटांमार्फत आणि ग्रामीण भागांत डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट किंवा सब्‌डिव्हिजनल मॅजिस्ट्रेटांमार्फत हें काम करण्यात येईल. सरकार त्यांच्या अहवालाची तपासणी करील. अलिकडेच कांहीं प्रकरणांत केलेला गोळीबार अतिरेकी असल्याचें सरकारला आढळून आलें; तेव्हां सरकारनें संबंधित अधिकाऱ्यांना तात्पुरतें कामावरुन दूर करण्याचे आणि त्यांच्या विरुद्ध योग्य ती उपाययोजना करण्याचे हुकूम दिले आहेत.

## *संरक्षक यंत्रणा कमकुवत नको*

परंतु पोलिसांनीं जेथें गोळीबार केला असेल अशा प्रत्येक प्रकरणाची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे हें तत्त्व स्वीकारणें म्हणजे कायदा व सुव्यवस्था राखण्याचें काम करणारी यंत्रणा कमकुवत करणें होय. त्याचा अर्थ अखेर असा होईल कीं, मूलभूत हक्क सुरक्षित राहणार नाहींत. मूलभूत हक्क सुरक्षित राहतील अशी दक्षता घेणें हें सरकारचें काम असून त्याचसाठीं सरकारला कांहीं व्यावहारिक बाजूंचाहि विचार करावाच लागतो. गोळीबार करतांना वापरावयाच्या तारतम्य बुद्धीवर चौकशीचें नियंत्रण असावें हाच अखेर ठरावाचा गाभा आहे. आणि सरकारनें तें तत्त्व स्वीकारलें आहे. अशा प्रत्येक प्रकरणांत मॅजिस्ट्रेटमार्फत चौकशी करण्याचा हुकूम देण्यांत येईल असें मी सन्मान्य सभासदांना आश्वासन देतो. हें पुरेसे नाहीं काय ?

सन्मान्य सभासदांना हें एवढें पुरेसें वाटत असेल असें मला वाटत नाहीं. त्यांना आणखी कांहीं तरी पाहिजे आहे. परंतु हें आणखी योग्य ठरणार नाहीं. एखाद्या विशिष्ट प्रकरणांतील परिस्थितीमुळें न्यायालयीन

चौकशी करणें आवश्यक ठरलें तर सरकार न्यायालयीन चौकशी करण्याचा हुकूम देईल. परंतु तो नियम करणें अयोग्य ठरेल.

याबाबतींत निर्णय घेतांना प्रत्येक बाबतात परिस्थितीचा विचार करावा लागेल. नुकत्याच झालेल्या भाषिक चळवळीच्या वेळीं पोलिसांनीं केलेल्या गोळीबारासंबंधी सभासदांनीं प्रश्न उपस्थित केलेले नाहींत हें मला माहित आहे, आणि त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. कारण झालेल्या जखमा भरून काढून राज्यांत जनतेला सलोख्यानें राहतां येईल अशा प्रकारची नवी परिस्थिति निर्माण करण्याची सरकारची तीव्र इच्छा आहे. भाषिक चळवळींत ज्यांनीं दुर्दैवानें आपलें प्राण गमावले त्यांच्या कुटुंबियाबद्दल सरकारला भ्रातृभाव आणि काळजी वाटते आणि त्यामुळेंच या सरकारनें त्यांना मदत करण्याचा निर्णय केला आहे. ती मदत केवळ दुखवटा व्यक्त करण्याची एक रीत म्हणून दिलेली नाहीं. कारण, कांहींहि झाले तरी ज्यांनीं आपलें प्राण गमावले ते आपले बांधव होते.

तेव्हां, महाशय, विरोधी सभासदांनाहि केव्हांतरी या बाजूला येऊन कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पत्करावी लागेल, या दृष्टीनें आपण ह्या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. हे सभासद ताबडतोब पोलिस दल बरखास्त करणार आहेत काय ? ते तसें करतील तर लोकशाहीचा घात करणारा याहून अन्य दिवस असूं शकेल असें मला वाटत नाहीं. लोकशाही ही प्रस्थापित करावी लागते आणि शांततामय परिस्थितींतच ही गोष्ट शक्य आहे. सन्मान्य सभासदांनीं हा मुद्दा ध्यानांत घ्यावा अशी माझी त्यांना विनंति आहे. पोलिसांनीं अमूक तऱ्हेनें वागावें असें ते जेव्हां सांगतात तेव्हां त्या प्रश्नाला दुसरीहि एक बाजू असते. याबाबतींत जनतेच्या पुढाऱ्यांवर, सर्व राजकीय प्रश्नांच्या नेत्यांवर एक जबाबदारी असते. अशा प्रकारच्या उठावामध्यें निरपराध अनुयायी तेवढे बळी पडतात, हें मी पाहिलें आहे. पुढारी नेहमीच गोळीबाराच्या प्रसंगी दूर रहातात.

(एक सन्मान्य सभासद—तुम्ही त्यांच्यावर कां गोळीबार करीत नाहीं ?)

आम्हांला तसें करावयाचें नाहीं. ज्यामुळें शेवटीं भावनावश आणि निरपराध माणसें बळी पडतात अशी परिस्थिति पुढारी निर्माण करतात.

आणि आपण मागें राहून ते जाहीर चौकशीची मागणी करतात. मला कोणावर टीका करावयाची नाहीं. आपण सर्वजण एकाच नीतिनियमानुसार वागूं या. ज्या मूलभूत मागणीसाठीं सार्वत्रिक उठाव झाला असेल त्या मागणीवर टीका करण्याचा मी प्रयत्न करीत नाहीं. ती मागणी कदाचित् बरोबर असेल. आपण जेव्हां लोकशाहीची भाषा करतो, तेव्हां सामुदायिक मागणी करण्याला, चळवळ करण्याला वाव असतो. तथापि आपण जेव्हां अशा स्वरुपाच्या गोष्टी बोलतो, तेव्हां कांहीं नैसर्गिक निर्बंध आपण मान्य केले पाहिजेत. या निर्बंधांकडे आपण लोकशाहीच्या दृष्टिकोनांतून पाहिले पाहिजे. याबाबतींत सामुदायिक चळवळ कशी करावी, लोकांना त्यांच्या मागण्या पुढें मांडण्यासाठीं कसें तयार करावें यासंबंधीं आपल्याला सर्वांसाठीं वर्तणुकीचे नियम तयार करावे लागतील. असे नियम तयार झाल्यानंतर जर गोळीबार करण्याचा प्रसंग उद्‌भवला तर त्याबाबतींत जाहीर चौकशीची मागणी करतां येईल.

महाशय, सरकारचें काय धोरण आहे हें मी स्पष्ट केलें आहे. गोळीबाराचे प्रसंग कसे टाळतां येतील या दृष्टीनें आम्ही प्रयत्न करीत आहोंत, हें सभागृहाला माहीतच आहे. जमावाला काबूत राखण्याच्या कलेसंबंधीं आम्ही आमच्या पोलिस अधिकाऱ्यांना शिक्षण देत आहोंत. अलिकडेच, तीन रिफ्रेशर कोर्स सुरू करण्यांत आले असून तेथें जमावाशीं कसें वागावें आणि जमावाला कसें काबूत ठेवावें याच्या निरनिराळ्या पद्धतीचें पोलीसांना आणि पोलीस अधिकाऱ्यांना शिक्षण देण्यांत आलें. जमावाला काबूत ठेवणें ही एक कला असून ती कला अवगत होण्यासाठीं शिक्षणाची आवश्यकता असते आणि या कलेचा विकास करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोंत. आमच्या पोलिस अधिकाऱ्यांच्या शिक्षणक्रमांतच या कलेचा समावेश करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोंत. नेहमीच्या ·३०३ टाईपच्या बंदुकीऐवजी ·४१० टाइपची बंदूक उपयोगांत आणण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. पोलिसांना यदा कदाचित गोळीबार करावा लागला तर त्यामुळें शक्य तेवढी कमी हानी होईल,अशी आम्ही काळजी घेत आहोंत. जेव्हा गोळीबार करावा लागेल त्यावेळीं गोळीबारामुळें कमीत कमी हानी होईल अशा रीतीनें तो करण्यांत यावा, अशा स्वरूपाचे हुकूम यापूर्वींच काढण्यांत आले आहेत.

या बाबतींत आपल्या जबाबदारीची सरकारला संपूर्णपणें जाणीव आहे. पोलिसांना गोळीबार करावा लागण्यासारखी परिस्थितीच निर्माण न होऊं देण्याचे कामीं सार्वजनिक नेत्यांनीं सरकारशीं सहकार्य करावें अशी माझी अपेक्षा आहे. आपण सर्वांनीं जर त्या दिशेनें जनमत तयार करण्याची पराकाष्ठा केली तर गोळीबार करण्याची अजिबात आवश्यकताच राहणार नाहीं. पोलिसांनीं गोळीबार करण्याचा प्रसंगच न येण्याची परिस्थिति ज्या दिवशीं निर्माण होईल तो दिवस मी लोकशाहीच्या दृष्टीनें भाग्याचा समजेन.

महाशय, सरकारचें धोरण ज्या मूलभूत तत्त्वांवर आधारलेलें आहे तीं तत्वें मी स्पष्ट केली आहेत. गोळीबार करतेवेळीं पोलिस अधिकाऱ्यांनीं सारासार विचार करून जो अधिकार वापरला त्याची स्वतंत्रपणें चौकशी करून तपासणी करण्यांत यावी असें जर सन्मान्य सभासद श्री. साठे यांना म्हणावयाचें असेल तर सरकारनें तें तत्त्व अगोदरच मान्य केलें आहे आणि कोणताहि अपवाद न ठेवतां सर्व बाबतींत तें धोरण अंमलांत आणण्याची सरकारची इच्छा आहे. म्हणजे पोलिसांनीं गोळीबार केलेल्या प्रत्येक प्रकरणीं, मग तेथें जीविताची हानी झालेली असो किंवा नसो, मॅजिस्ट्रेटांकडून चौकशी करण्यांत येईल. सरकारनें हें मान्य केलें आहे आणि सन्मान्य सभासदांचें यामुळे समाधान झालें असेल तर आपला ठराव मागें घेण्याची मी त्यांना विनंति करतो. ( २२–जून १९५७ )

◆◆◆

---

**सरकारी धोरण आंखतांना तें पक्षाच्या कार्यक्रमानुसार आंखावयाचें पण राज्यकारभार पक्षातीत चालवावयाचा अशी लोकशाहीची परंपरा असते. मीहि ती परंपरा पाळीन असें आश्वासन या प्रसंगीं मी देऊं इच्छितों.**

**१–११–१९५६**

# सत्यावर आधारलेली माहिती-प्रचार

***

**" आधुनिक काळांत प्रचार आणि माहिती हें राज्य-कारभाराचे एक अंग बनले आहे. प्रचार हा खऱ्याबरोबर खोट्याचाहि होऊं शकतो. जनतेला वळण लावतां येते, पण खऱ्या कल्याणकारी राज्यांत जनता शहाणी, सूज्ञ, जाणती करणे हा खरा हेतू असतो म्हणून सरकारच्या प्रसिद्धी संपर्क अधिकाऱ्यासमोर मुख्यमंत्र्यांनीं सांगितले " आपली माहिती सत्यावर आधारलेली असावी ".**

***

प्रसिद्धी सहाय्यक परिषदेच्या उद्घाटन प्रसंगीं यशवंतराव म्हणाले, " ज्यांच्यामार्फत आम्हाला लोकांशीं बोलावयाचें आहे, त्यांचेशीं मी बोलत आहे याची मला चांगली जाणीव आहे, अशा परिषदा क्वचित् होतात म्हणून तुम्ही मला अधिक स्पष्टपणें बोलण्यास परवानगी द्याल. आपण राजकारणाच्या सर्वसामान्य धोरणाबद्दल चर्चा केली तर अधिक चांगलें होईल; आणि अशा प्रसंगींच खाते प्रमुखाला आपल्या हाताखालील माण-साशीं, मित्राशीं बोलण्याची संधी मिळते, प्रसिद्धि अधिकाऱ्यांना मी इतर सरकारी किंवा सार्वजनिक अधिकाऱ्यापेक्षां वेगळे मानतों; कारण राज्य किंवा राज्यासंबंधींच्या कल्पना नवें रूप घेत आहेत याचा प्रत्यक्ष पुरावा

म्हणजेच हें प्रसिद्धी खातें आहे. आजकाल आपण पोलीस राज्य व कल्याणकारी राज्य यांत फरक करतो. प्रसिद्धीचा मूळ उद्देशच असा आहे कीं आपल्या अधिकाऱ्यांच्या राज्यकारभाराच्या कल्पना लोकांचे प्रत पोहोंचविणें; आपण आपलें अंतिम ध्येय समाजकल्याण आहे हें मान्य केल्याचा हा पुरावा आहे, म्हणून आपले समोरील सर्वमान्य धोरणाचा आपण विचार केला पाहिजे.

प्रसिद्धि खातें प्रमुखांनीं प्रसिद्धीचीं तीन मूलभूत तत्त्वें सांगितलीं तीं जरा अधिक विस्तारानें मी सांगतो. प्रसिद्धि ही कला आणि शास्त्र आहे. तुम्ही तें कोणत्या अर्थानें घेतां याची मला कल्पना नाहीं, परंतु मला एक गोष्ट सांगावीशी वाटते कीं चुकीनें प्रसिद्धि म्हणजे प्रचार समजला जातो; माझें ठाम मत आहे कीं प्रसिद्धि म्हणजे प्रचार नव्हे ! कांहीं वेळां प्रसिद्धि ही प्रचारासारखी दिसत असेल पण तो कांहीं प्रसिद्धि करणाराचा दोष नव्हे. परंतु प्रसिद्धी खात्याची योजना व निर्मिती ज्या हेतूनें झाली तो हेतू म्हणजे सत्यवार्ता या मूलभूत गोष्टीची आपल्याला जाणीव असेल तर आपलें काम सोपें आहे कारण आपण जो कार्यक्रम अंमलांत आणणार आहोत त्याचें मुख्य साधन निःसंदिग्ध मन व स्वच्छ विचार हें आहे, म्हणून या मूलभूत गोष्टीविषयीं आपण अगदीं स्पष्ट असलें पाहिजे. एकदां कां तुम्हाला ही मूलभूत दृष्टि आली म्हणजे काय करावयाचे याचा तुम्हाला आपोआप-उलगडा होईल याची मला खात्री आहे.

'कार्यक्षम व यशस्वी राज्यकारभाराचें अंतिम ध्येय हें लोकांचें समाधान आहे' या गोष्टीचा स्वीकार आपण कलेक्टर परिषदेंत केलेला आहे, तें आपण कसं साध्य करणार ? चुकीचे मार्गानें आपण लोकसंबंध ठेवतो याची मला भीति वाटते, ज्यावेळीं मी तुम्हाला सांगतो कीं आम्ही लोकसंबंध ठेवतो त्यावेळीं आपण प्रचार करण्यासाठीं नसतो, आपण लोकांना माहिती दिली पाहिजे. लोकांच्यासंबंधीं आपल्या कल्पना अगदीं स्पष्ट पाहिजेत. आपण जर अडाणी जनसमूहाला कांहींतरी शिकवायचें आहे या चुकीचे भावनेनें लोकांशीं संबंध ठेवूं लागलो तर आपलें ध्येय साध्य केलें

असें होणार नाहीं. ज्यावेळीं मी लोक—सामान्य जनता—म्हणतो त्यावेळीं ते तुमच्यासारखे विद्वान नसतील, त्यांना आपल्या कल्पना तुमच्याप्रमाणें किंवा माझ्याप्रमाणें लिहितां बोलतां येत नसतील, परंतु कृपा करून त्यांना असें समजूं नका कीं ते अडाणी आहेत. सामान्य माणूस हा मुळींच अडाणी नाहीं. तुम्ही हें चांगलें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं तुम्हाला शहाण्या माणसा-कडेच जावयाचें आहे. खरोखरीच फार शहाण्या, कदाचित् तुमच्या माझ्यापेक्षांही ! त्यानें तुमच्यासारखीं निरनिराळ्या विषयांवरील पुस्तकें वाचलीं नसतील; परंतु खचितच त्यानें जीवनाचे पुस्तकांतून खूपच वाचलें आहे आणि त्यानें जीवनाचें पुस्तक मोठी किंमत देऊन वाचलें आहे, म्हणून ज्यावेळीं आपल्या कल्पना घेऊन आपण लोकांचेजवळ जातो त्यावेळीं लोक आपणांविषयीं आपल्या सरकारविषयीं काय म्हणतात, त्यांचे काय प्रश्न आहेत, त्यांच्या अडचणी काय आहेत हें जाणून घेणें अगत्याचें आहे. या अर्थानें प्रसिद्धी ही कला आहे. तुम्हाला आपल्या गिऱ्हाईकांशीं कोणत्या पद्धतीनें वागावें हें समजलें पाहिजे; त्याच्या काय अपेक्षा आहेत ! त्याच्या आवडी निवडी कोणत्या आहेत ? त्यांच्या गरजा कोणत्या आहेत ? हें समजलें पाहिजे.

प्रसिद्धी अधिकाऱ्याला आपल्या गिऱ्हाईकाशीं ओळख झाली नाहीं तर तो आपल्या कल्पना प्रसृत करूं शकणार नाहीं.

प्रसिद्धी ही कांहीं एकमार्गी वहातुक नाहीं, ती दुहेरी आहे, ज्याप्रमाणें तुम्हीं तुमच्या कल्पना घेऊन लोकांचेकडे गेलें पाहिजे; त्याचप्रमाणें तुम्ही तुमचें अंतःकरण मोकळें ठेवलें पाहिजे; कान उघडे ठेवले पाहिजेत; हें जर आपण करूं शकलों नाहीं तर आपण जी प्रसिद्धी पत्रके किंवा साहित्य काढूं तें सर्व निरर्थक होईल, म्हणून प्रथमतः आपण लोकांना समजून घेतलें पाहिजे. दुर्दैवानें अनेक वेळां मला असं पहावयास सांपडतें कीं प्रसिद्धी अधिकारी आपल्या भोंवतालच्या इतर नोकरशाहीं पद्धतीच्या मार्गानेंच जाण्याचा प्रयत्न करतात. मला कांहीं तरुणांची माहिती आहे, ते प्रसिद्धी खात्यांत नोकरीस येण्यापूर्वी धाडशी, हुशार होते, चांगले चिकित्सक होते

आणि ते लिहितांना किंवा बोलतांना त्यांचे विचार मोठे परिणामकारक होते. परंतु ते प्रसिद्धी खात्यांत नोकरीस लागले नंतर चारदोन वर्षांतच सरकारच्या इतर खात्यांतील अधिकाऱ्याप्रमाणेंच ठोकळेबाज बनले. मला वाटतें ही शोचनीय घटना आहे, मला त्यांना दोष द्यावयाचा नाहीं. नोकरीच्या पद्धतींतील कांहीं मूलगामी कारणेंही या गोष्टीला जबाबदार असतील, म्हणून आपण हें असं कां व कसें घडतें याचें कारण शोधून पहाणें अत्यावश्यक आहे; एकदां, दोनदां शेंकडों वेळां प्रयत्न करून कां होईना यांचा आपण शोध घेतला पाहिजे.

तुम्ही याठिकाणीं केवळ माझें भाषण ऐकण्यासाठीं जमला नाहीं; तुमच्या अडचणी सांगा, तुम्हांला काय म्हणायचें आहे व तुमच्या गरजा काय आहेत तें मला कळलें पाहिजे. कोणत्याहि खात्याच्या दुसऱ्या अधिकाऱ्यास फक्त त्याच्या खात्याविषयींच माहिती असते म्हणून तुमची ही परिषद चर्चा मंडळासारखी आहे असें मी मानतो, सर्व खात्यांचे अधिकाऱ्यांत तुम्हींच तेवढे असे आहांत कीं तुम्हाला तुमच्या खात्यासंबंधीं माहिती असते हें गृहीत धरूनही तुम्हांला इतर सर्व खात्यांची संपूर्ण माहिती असली पाहिजे अशी तुमच्याकडून माझी अपेक्षा आहे, हें तुम्ही जोपर्यंत करीत नाहीं तोपर्यंत तुम्ही खरे प्रसिद्धी अधिकारी होवूं शकत नाहीं, म्हणून सरकारी धोरण हें प्रथम प्रसिद्धी अधिकाऱ्यांना चांगलें माहित असणें हें अत्यावश्यक आहे, तुम्ही कार्यांत पुढाकार घ्यावा अशी माझी अपेक्षा आहे परंतु हा पुढाकार तुम्हाला तुमचें मन समजलेखेरीज घेतां येणार नाहीं. तुम्हाला कोणता माल विकावयाचा आहे हें समजल्या खेरीज तुम्ही चांगले विक्रेते होयूं शकणार नाहीं म्हणून वर्षांतून केव्हां तरी किंवा कार्यांचे ओघानें निरनिराळ्या खात्यांचीं धोरणें तुम्हाला चांगल्या तऱ्हेनें समजावून सांगणें हें अत्यंत जरूरीचें आहे.

पुष्कळ वेळां योजनेच्या संदर्भांत प्रसिद्धी अधिकाऱ्यांचे कार्याकडे पाहून त्यांना त्याविषयीं अनेक गोष्टी सांगितल्या जातात परंतु मूलभूत गोष्ट तशीच राहते; कारण पुष्कळ वेळां कांहीं प्रश्नामुळें लोकांत गैरसमज पसरतात हें

मला माहीत आहे. म्हणून लोकांत जाऊन सरकारी धोरण समजावून सांगणें जरूरीचें आहे, परंतु ज्यावेळीं तुम्ही कांहीं निश्चित कल्पना घेऊन लोकांत जातां त्यावेळीं त्या कल्पना किंवा तुमचा मार्ग बरोबर परिणामकारी आहे कीं नाहीं, हें तुम्ही पाहिलें पाहिजे; तें जर तसें नसेल तर त्याप्रमाणें तुमचें मत तुम्ही प्रसिद्धी प्रमुखाला किंवा सरकारला कळविलें पाहिजे, नंतर आपणाला आपलें धोरण परिणामकारक कां होत नाहीं हें पहातां येईल. प्रचार पद्धतींत दोष आहे का सरकारी धोरणांतच दोष आहे, हें कळेल त्यामुळें सरकारला आपल्या धोरणाचें परीक्षण करणेंही सोपें जाईल.

आपलें शेवटचें ध्येय लोकांचे समाधान करणें हें आहे व ज्यावेळीं आपण तसें म्हणतो त्यावेळीं आपण पाहिलें पाहिजे कीं आपण लोकांचें समाधान कां करूं शकत नाहीं, आपले धोरणांत काय चूक आहे आणि ती कशी दुरुस्त करतां येईल या. अर्थानें प्रसिद्धी खातें हें दुहेरी दळणवळण आहे, ही दळणवळणाची दुसरी बाजू आहे; तुमच्या कल्पना, तुमचे अनुभव व तुमच्या अडचणी या आपलें धोरण कोठें चूक आहे हें सांगतांना टीकेसह सरकारला कळल्याच पाहिजेत.

लोकांची खरोखरीची तक्रार जर योग्य मार्गानें मंत्री, सेक्रेटरी किंवा प्रसिद्धी प्रमुखाचे कानावर घातली तर मला मुळींच वाईट वाटणार नाहीं. एकदां कां प्रसिद्धी यंत्रणेची एवढी पूर्वतयारी झाली म्हणजे मी खात्रीनें सांगूं शकतो कीं आपलें कार्य अधिक प्रभावीपणें झाल्याशिवाय राहणार नाहीं. प्रचार आणि प्रसिद्धीचा मुख्य हेतू आपले सरकारनें काय केलें हें सांगणें होय; परंतु सरकारी कार्यक्रमांत असे कांहीं विषय असतात कीं त्याबाबत सरकारनें काय केलें हें सांगून भागत नाहीं तर लोकांना सतत कांहीं गोष्टी करण्याबद्दल प्रवृत्त करावें लागतें.

तुम्ही प्रसिद्धीच्या या बाजूचा विचार केला आहे कीं नाहीं हें मला माहित नाहीं; मला इथं कूळकायद्यासंबंधीचें एक उदाहरण सांगावेंसें वाटतें, या कायद्याचे अंमलबजावणींत प्रसिद्धी अधिकारी हा प्रभावी व महत्त्वाचा

दुवा आहे असें माझें मत आहे, कुळांना आपल्या हक्काची आणि कर्तव्याची जाणीव नसल्यामुळें जमीनदारांनीं सोडचिठ्या घेऊन त्यांना लुबाडल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. मला याची जाणीव आहे कीं ज्या पक्षाचें सरकार आहे त्या पक्षाचें हें कर्तव्य आहे, परंतु सरकारनें एकदां कायदा म्हणून मान्यता दिल्यावर प्रसिद्धी खात्याचें सुद्धां हें कर्तव्य आहे कीं आपण लोकांकडे जाऊन त्यांना त्यांचे हक्काची माहिती देणें व तें रक्षणाचे मार्ग सांगणें. मी हें उदाहरण म्हणून सांगत आहे,आपण लोकांना सरकारमार्फत आपणांस सहाय्य घेण्यासाठीं नेहमी तयार ठेवलें पाहिजे. एकदां ही कार्यपद्धती तुम्हाला बरोबर समजली म्हणजे कोणत्या पद्धतीनें तुमचें कार्य प्रभावी होईल हें तुमच्या ध्यानीं येईल याची मला खात्री आहे.

आपणाला वरून आलेले हुकूमाचीच आपण अंमलबजावणी करीत आहोंत हें तुम्हांला खरोखरीच समजलें असेल तर तुम्हीं तुमचें कर्तव्य केलें आहे असें म्हणावें लागेल. तुम्ही मंत्र्याचे दौऱ्यांत सहभागी झालांत तर फक्त तुम्ही तुमचें काम केलें असें होईल पण मी त्यावर समाधान मानणार नाहीं. तुम्ही मंत्र्याचे किंवा मुख्य मंत्र्याचेही दौऱ्यांत सहभागी झाला नाहींत तर मला त्याबद्दल कांहीं वाटणार नाहीं, कारण तें कांहीं अत्यंत महत्त्वाचें काम नाहीं. प्रसिद्धी खात्याचे प्रमुख अधिकाऱ्यांनीं म्हटल्याप्रमाणें खरोखरच आमचा हेतु एकादी व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह मोठा करण्याचा नाहीं; तर समाजाची बांधणी करावयाची आहे; समाजाला राष्ट्रकार्यांत सहभागी करावयाचें आहे; त्यासाठीं आपणाला समाजाची बांधणी करण्यास उपयुक्त अशी माहिती व कल्पना समाजाप्रत नेण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. आम्ही लोकांचेसाठीं खूप कार्य करीत आहोंत, परंतु लोकांचे पदरांत शेवटीं फारच थोडें पडतें. आपणांस त्याचें कारण शोधलं पाहिजे व ही परिस्थिति बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे. माझ्या मतानें नेहमीच्या राज्यकारभारांत हीच मूलभूत स्वरुपाची अडचण आहे. आतांपर्यंत आपण जें कांहीं केलं आहे, त्यावर मी समाधानी नाहीं, ही गोष्ट मी याठिकाणींच बोलतो आहे असें नाहीं तर दिल्लीचे परिषदेंतही सांगितलें आहे कीं आपणाला खूप करावयाचें आहे पण त्यामानानें आपण

फारच थोडें केलें आहे. या संदर्भांत मी नेहमी एका इंग्लीश कवितेचा उल्लेख करतो. (The little done, the undone vast) काम थोडं पण घोटाळा फार. आपणाला जें करावयाचे आहे तें आपण केलें नाहीं आणि इतक्या गोष्टी करावयाच्या राहिल्या आहेत कीं त्यासाठीं आपणांस फार मोठे परिश्रम घेतले पाहिजेत. ''

प्रथम आपणांस कोणतें मूलभूत कार्य करावयाचें आहे तें सांगितल्यानंतर मला प्रसिद्धीची दुसरी बाजू सांगितली पाहिजे. आपण आपल्या कल्पना लोकांचे समोर कशाप्रकारें मांडतो हें पाहिलें पाहिजे. कधीं कधीं मला आश्चर्य वाटतें कीं आमच्या या छोट्या पुस्तकांचा लोकांना खरोखरीच उपयोग होतो काय ? आपण प्रकाशित केलेलीं पुस्तकें मी वाचतो. कित्येक वेळां ती केलेल्या घटनांची यादी असते किंवा लोकांना कळूं शकणार नाहीं अशा पद्धतीनें तरी लिहिलेलीं असतात. प्रसिद्धी हें शास्त्र आहे असें म्हणतात. लोकांचे समोर कसें मांडलें पाहिजे, हें आपणांस समजलें पाहिजे. जेव्हां तुम्ही मागासलेल्या भागांत किंवा मागासलेल्या खेडेगावांत जातां, तुमच्या कल्पना त्या लोकांना समजल्या पाहिजेत. तुम्ही तसा कधीं प्रयत्न केला आहांत काय ? विषयाचे दृष्टीनें तें कार्य अडचणीचें आहे याची मला जाणीव आहे, परंतु त्यांतूनच तुम्ही कांहींतरी मार्ग शोधून काढला पाहिजे.

" लोकांचे समोर विषयाची मांडणी करणें ही अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. ज्यावेळीं प्रकाशित पुस्तकाद्वारा लोकांना खऱ्या कल्पना देतां येत नाहींत, त्यावेळीं आपण फिल्म आणि रेडिओचा उपयोग केला पाहिजे. कित्येक वेळां रेडिओवरील भाषणांचा आपल्या कल्पना लोकांप्रत नेण्यास खरा उपयोग होतो कीं नाहीं याची मला शंका आहे. आपण कुठंतरी चुकत असल्याचें मला वाटतें. पुष्कळवेळां लोकांचेसाठीं मी जीं भाषणें करतो त्यांतील १० टक्के देखील कल्पना ज्यांचेसाठीं भाषण केलेलें असते, त्यांना समजली कीं नाहीं याचें मला आश्चर्य वाटतें. आपण हें चांगलें कसें करूं याचा मार्ग शोधावयाचा आहे. या प्रयत्नांतच आपण आपणालाही आणि सरकारलाही मदत करूं शकतो. विषयाची मांडणी अशी पाहिजे कीं ती लोकांना समजली पाहिजे. ''

"प्रसिद्धीची दुसरी आणखीं एक बाजू मला तुम्हांला सांगावयाची आहे; वर्तमानपत्रांशीं आपले संबंध कसे असावेत? वर्तमानपत्रांशीं एक-प्रकारचें नातें ठेवणें हाही आपल्या कामाचा एक स्वाभाविक भाग आहे. यांत आपण किती यश मिळवलें हें मला सांगतां येणार नाहीं. कांहीं प्रमाणांत आपण यशस्वी झालों आहोंत; परंतु वर्तमानपत्रांशीं आपण कसे संबंध ठेवतो? याठिकाणीं मला एक गोष्ट सांगावीशी वाटते कीं जर तुम्हांला एखादी गोष्ट पटली नाहीं तर दुसऱ्याला त्याची खात्री पटविणें हें फार अवघड आहे; प्रसिद्धीप्रमुखानीं सांगितल्याप्रमाणें खरोखरच सनदी नोकरीच्या कल्पनेप्रमाणें निःपक्षपातीपणा आणि कार्यांचा प्रामाणिकपणा हेंच सरकारी अधिकाऱ्याचें कर्तव्य आहे. तुमचे व्यक्तीगत विचार किंवा आवडीनिवडी कांहींही असूं शकतील परंतु एकदां कां सरकारी धोरण कायम होऊन त्याचा स्वीकार केला गेला म्हणजे तें धोरण तुमचें धोरण बनतें, तुमचे विचार आणि तुमची श्रद्धा बनते. तुम्ही तुमचीं अंतःकरणें तपासून पहा, सरकारी धोरणाशीं तीं किती सुसंवादी आहेत. प्रसिद्धी अधिकाऱ्यांचे बाबतींत हा सुसंवादीपणा फार पाहिजे व त्याची फार गरज आहे. कारण सरकारला—सहाय्यभूत अशी पूर्वतयारी करण्याचे काम तुम्हांला करावयाचें आहे. कांहीं वेळां कांहीं अधिकारी वृत्तपत्रांशीं आपणाकडे कांहीं चूक आहे या पद्धतीनें बोलतात हें मला माहित आहे—" माझं खरं मत असं आहे. परंतु हें सरकारी धोरण आहे म्हणून कृपा करून या सरकारी धोरणाला प्रसिद्धी देऊन माझ्या कामांत मदत करा. " मला तुम्हांला स्पष्टच विनंती करावयाची आहे कीं तुम्हांला तुमच्या विवेकाची तशा प्रकारची अडचण असेल तर तुम्ही सरकारला सांगितलं पाहिजे कीं मला सरकारची सेवा करतां येणार नाहीं. त्यांत कांहीं चुक नाहीं परंतु जोपर्यंत तुम्ही सरकारी सेवेंत आहांत तोपर्यंत तुमचे विचार हे सरकारचेच विचार असले पाहिजेत, तुमच्या कल्पना या सरकारच्याच कल्पना असल्या पाहिजेत. तुम्हाला सरकारच्या कल्पना चुकीच्या वाटत असतील, तर सरकारला सांगा कीं अमुक कारणा-करितां लोकांना सरकारी कल्पना आवडत नाहींत, दुरुस्तीचे हे मार्ग आहेत. तुम्हीही ते शोधले पाहिजेत. तुम्ही जर हें केलेंत तर मला खात्री आहे कीं वृत्तपत्राशीं योग्य संबंध ठेवणें अवघड नाहीं."

"प्रसिद्धी ही एक कला असेल तर मी कोठेंतरी कलेची व्याख्या वाचलेली आहे ती आपणांस सांगावीशी वाटते. कलेची व्याख्या ठरवतां येईल कीं नाहीं हें मला माहित नाहीं. मला असं वाटतं कीं जगांत कोणत्याही वस्तूची खरी व्याख्या सांगतां येणार नाहीं. परंतु माझ्या पहाण्यांत कलेची एक व्याख्या आली व मला ती फार आवडली; ती म्हणजे; "Art lies in concealing art" (कला ही दिसूं न देण्यांतच कला आहे.) तुम्हाला खरोखरी वृत्तसंस्थेकडे जावयाचें आहे आणि त्यांना तुमचे विचार स्विकारावयास लावायचे असतील तर तुम्ही तसें करतां आहांत असें वृत्त संस्थेला वाटतां उपयोगी नाहीं. गेल्या कांहीं महिन्यांत असें कांहीं प्रसंग आले कीं-कित्येक संपादकांनीं माझ्याजवळ येऊन सांगितलें-"तुमच्या अधिकाऱ्यांना आम्हांला कसं सांगावं हें कळत नाहीं." यांत एकच गोष्ट ध्यानांत घ्यावयाची कीं प्रसिद्धीच्या कार्याची कला समजली नाहीं; आपण त्यांना असं सांगितलं पाहिजे कीं आपण त्यांविषयीं सांगतो आहोंत असं त्यांना वाटतां उपयोगी नाहीं. मला वाटतं तुम्हाला हें काम करावयाचे आहे."

"वृत्तसंस्थेशीं संबंध ठेवतांना आपण ही गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे कीं आपण ज्यांच्या हातांत शद्बसामर्थ्याची सत्ता आहे अशा चाणाक्ष लोकांशीं काम करीत आहोंत; आणि जगांत शद्बासारखी सत्ता कशांतही नाहीं. शद्ब हे कदाचित् अॅटम बॉम्बपेक्षांही अधिक प्रभावी असतील, शद्ब कोणत्याही गोष्टीची उलथापालथ करूं शकतात. शद्बांनीं क्रान्त्या निर्माण केल्या आहेत आणि कदाचित् अॅटम बॉंबची उत्पत्तीसुद्धां शद्बांतूनच झाली असेल; मी तुम्हांला शद्बाचें महत्त्व सांगत बसत नाहीं कारण तुम्ही शद्बसृष्टीचे राजे आहांत हें गृहीत आहे; परंतु ज्यावेळीं तुम्हीं वृत्तसंस्थेशीं संबंध ठेवाल त्यावेळीं एक गोष्ट विसरूं नका कीं ज्यांचें शद्बरचनेवर प्रभुत्व आहे व ज्यांना शद्बांचीं कसरत करतां येते अशाशीं तुम्ही आपलें काम करीत आहांत, म्हणून तुम्हाला फार सावधगिरी बाळगली पाहिजे. ज्यावेळीं त्यांच्याकडे जाल त्यावेळीं मोठ्या कलात्मक रितीनें तुम्हीं तुमचें काम केलें पाहिजे."

“ शेवटीं माझ्या मनांतील प्रसिद्धीसंबंधाच्या कांहीं मूलभूत कल्पना आपणांस सांगितल्या पाहिजेत. कोणीही कुणाला शिकवूं शकत नाहीं, मी याठिकाणीं तुम्हांला कांहीं शिकवण्यासाठीं आलों नाहीं; मला फक्त तुमच्या कार्याविषयींच्या माझ्या भावना व्यक्त करावयाच्या होत्या. आपण सर्वजण एका महत्त्वाच्या कार्यांत गुंतलों आहोंत. माझ्या भावना मी कलेक्टरना सांगितल्या, त्या तुम्हाला सांगण्याची आवश्यकताही नाहीं. आपलें हें लोकशाही राज्य गेलीं दहा वर्षें चालू आहे, आपण जें करावयास हवें तें अद्याप करूं शकलों नाहीं, तेव्हां प्रत्येकानें जागरुक राहून आपण आपल्यावरील जबाबदारी पार पाडण्यासाठीं काय केलें पाहिजे याचा विचार करून कामाला लागलं पाहिजे. मला तुमचें तें सहकार्य पाहिजे आहे, कार्याचा प्रामाणिकपणा हवा आहे. सरकारी धोरणाची जाणीव आणि चाणाक्षपणा हवा आहे आणि खरोखरीच माझी अशी अपेक्षा आहे कीं तुम्ही प्रेमानें च सूज्ञपणें लोकांशीं संबंध ठेवावा. तुम्ही जर हें केलें तर मला खात्री आहे कीं आपण जें करावयास पाहिजे तें कार्य पार पाडलें असें होईल ! ”

(१८ सप्टेंबर १९५७)

◆◆◆

अधिकाऱ्यांनीं व्यक्तिनिरपेक्ष असलें पाहिजे. याचा अर्थ मात्र २४ तास नुसते कायद्याकडे वा नियमाकडे बोट दाखवून अधिकाऱ्यांनी वागावें असा नाहीं. माणुसकीकडे त्यांनी कानाडोळा करतां कामा नये.

# कल्याणकारी राज्याची कल्पना

***

**लोकशाहींत जनतेचे राज्य जनतेकरतां आणि लोक-प्रतिनिधींनी चालविलेले असते पण त्याचे प्रत्यक्ष स्वरूप जनतेला दैनंदिन जीवनांत पहावयास मिळाले तरच जनता-राज्य म्हणता येईल. लोकशाहींत कल्याणकारी राज्याची कल्पना कशी सर्व संग्राहक असते याची सुबोध चर्चा श्री. यशवंतरावजींनी रोटरी क्लबांत विचारवंत श्रोत्यांच्या समोर केलेली आहे. तें महत्त्वाचें भाषण मुद्दाम उधृत केलें आहे.**

***

" मला वाटतं कल्याणकारी राज्य म्हणजे सरकारने जनतेसाठीं कांहीं सोयी करणें किंवा सेवा करणें एवढेंच नसून त्यापेक्षांही त्यांत अधिक आहे. कल्याण शब्दाचा मूळ अर्थ घेतला तरी एकाद्यानं दुसऱ्याला कांहीं देऊन टाकणें असा नव्हे. कल्याण हें शांततेप्रमाणेंच अविभाज्य आणि परस्पर-पूरक आहे. ज्याप्रमाणें एक दिवा दुसऱ्यास प्रकाशित करतो त्याप्रमाणें कल्याण हें ज्यावेळीं अधिकाधिक लोकांच्या वांट्याला येतें त्यावेळीं तें विस्तृत होत, वाढत जातें; तें कमी होत नाहीं. तथापि ज्यावेळीं अधिक

उत्पादन करूं त्यावेळीं प्रत्येकाच्या गरजेस पुरेसं होईल, परंतु तें प्रत्येकाच्या लोभी वासनेला पुरें पडणार नाहीं. मला वाटतं कल्याणकारी राज्याची निर्मितीची ही मूलभूत गरज आहे. दुसऱ्याचं कल्याण करणें या तत्त्वाचा स्वीकार केल्यानें स्वतःच्या कल्याणास विरोध होत नाहींच परंतु ते स्वतःच्या कल्याणास अधिक उपयुक्त आहे. इतकेंच नव्हे तर स्वतःचें अधिक चांगलें होण्यास मदत करते. डिझरायली ज्यावेळीं म्हणाला, "कार्यांच्या समूहांतून समाज निर्माण होतो" त्यावेळीं त्यानें मोठें सामाजिक तत्त्व सांगितलें आहे ही गोष्ट केवळ बुद्धिनं समजून घेऊन भागणार नाहीं तर तिची भावनेनं जपवणूक केली पाहिजे. एक नागरिक या नात्यानें आपला कोणता मोठा दोष असेल तर आपल्यापैकीं पुष्कळ आपलें कर्तव्य विसरले आहेत. 'दुसऱ्यांनीं तें करावें' ही सामान्य प्रवृत्ति आहे. हें 'दुसऱ्याचें काम आहे, आपलें नव्हे हा चोहोकडे पसरलेला समजच आज चांगल्या राज्यकारभारांतील अडचण आहे; दुसऱ्यांनीं चांगल्या राज्यकारभाराकरतां त्याग केला पाहिजे, आपण मात्र कांहीं एक न करतां जे करतात त्यांच्यावर टीका करावयाची अशा धोकादायक समजुतींत आपणापैकीं पुष्कळजण आहेत.

"आपणाला कदाचित प्रशियाच्या फ्रेडरीक राजाची गोष्ट माहित असेल. तो बर्लिन शहराच्या बाहेरच्या एका रस्त्यावरून चालला होता, त्यावेळीं समोरून येणाऱ्या एका वृद्ध गृहस्थाची त्याचेशीं टक्कर झाली. राजानें विचारलें "कोण आहे ?" तो म्हातारा म्हणाला "मी राजा आहे." "राजा" फ्रेडरिकनें आश्चर्यानें विचारलें, "कोणत्या राज्यावर तूं राज्य करतोस ?" "माझ्या स्वतःवर" असें तें अभिमानयुक्त उत्तर होतें; "मी माझ्या स्वतःवर राज्य करतो कारण माझा माझ्यावर ताबा आहे. मी माझ्या स्वतःचा अधिकारी आहे.

"स्वातंत्र्यपूर्ण राज्याची किंवा चांगल्या राज्याची अगर कल्याणकारी राज्याची तुम्ही त्याला कांहींही म्हणा,—सुरवात ही प्रत्येक व्यक्तींतून होते. व्यक्तीला स्वतःवर ताबा ठेवण्याची गरज ज्या प्रमाणांत लक्षांत येते

त्या प्रमाणांत त्यास आपलें दुसऱ्याशीं नातें कसें असावें याची दिशा आणि मार्गदर्शन सरकारकडून व्हावें असें वाटत असतें. व्यक्तीला योग्यप्रकारें ऐक्यात्मक सामाजिक दृष्टी येण्यासाठीं वातावरण निर्माण करणें हे आजच्या नियोजकाचे कर्तव्य आहे. लोकांना सामुदायिक प्रयत्नाचे फायदे दिसूं लागले तर त्याच्यांत सामाजिक जागृती वाढत असते. म्हणून माझें असें मत आहे कीं कल्याणकारी राज्यांत सहकारी चळवळीला फार मोठें कार्य करावयाचें आहे. ''

आम्हाला जे कल्याणकारी राज्य वाटतें त्यामुळें कांहीं मूठभर किंवा जास्ती लोकांचें कल्याण साधावयाचें असें नसून सर्वांचें कल्याण साधावें ही दृष्टी आहे. म. गांधीनीं आपल्या एका लेखांत रास्किनच्या ' unto this last ' या पुस्तकांतील गोषवारा सांगितला आहे, ' व्यक्तीचें हीत हें समाजाच्या हितांत आहे, सेवेचें जीवन हेंच खरें जीवन आहे आणि कोणतेंही लहान मोठें काम असूं द्या त्याचं महत्व सारखेंच आहे हें सर्वोदयाचें तत्वज्ञान आहे. आधुनिक लोकशाही ज्या पुरोगामी तत्वावर आधारलेली आहे त्यांत हें प्रगत आहे. सर्वांचें कल्याण–अगदीं शेवटच्या माणसाचें कल्याण हें जास्तीत जास्त लोकांचें कल्याण या तत्वापेक्षां मोठें तत्वज्ञान आहे. कारण जास्तींत जास्त लोकांचा गट हा अधिक समर्थ असतो म्हणून त्यांचें कल्याण होतें. वस्तुतः या अपूर्ण जगांत आणि विशेषतः आपल्यासारख्या अप्रगत देशांत बहुधा सर्व लोकांचा विकास हा आवश्यक आहे. म्हणून सर्वोदयाची कल्पना ही आतांपर्यंतच्या राजकीय तत्ववेत्त्यानें अगर एकाद्या प्रेषितानें वर्णिलेल्या कल्पनेहून अत्युत्तम आहे. या एका शब्दांत वयांत आलेल्या प्रत्येकांस मतदानाचा हक्क, मतपेटी, विचार स्वातंत्र्य आणि इतर जीं कांहीं आधुनिक लोकशाहीची साधनें आहेत ती व्यक्त होतात. कल्याणकारी राज्य साकार होण्याची गुरुकिल्ली सर्वोदयांत आहे. सर्वोदय हाच खरा मानवतावाद आहे आणि तो इतर वाद (''isms'') आहेत. त्यांतला फोलपणा आणि मूर्खपणा सिद्ध करतो. महात्मा बुद्धापासून तो म. गांधीपर्यंत भारतीय संस्कृतीची जी परंपरा पहावयास सांपडते त्यास अनुरूप अशीच ही कल्पना आहे.'

कार्यांची जबाबदारी आणि सर्वांचें कल्याण करण्याचें कर्तव्य या दोन गोष्टी अशा यंत्रणेवर आधारल्या पाहिजेत कीं त्यांत जास्तीत जास्त माणूसकी आहे आणि कमीतकमी नियंत्रण आहे. पंतप्रधानांनीं असं सांगितली आहे कीं राज्यकारभारांत सार्वजनिक विवेकाची आणि नीतिमत्तेची वाढ झाल्याशिवाय तो राज्यकारभार आजची कारभारविषयक गरज भागवूं शकणार नाहीं. त्यांनीं एका गोष्टीचा खास उल्लेख केला कीं राज्यकारभार हातीं असणाऱ्यांनीं आपल्या स्वतःचा असा वरिष्ठवर्ग आहे ही भावना सोडून दिली पाहिजे; ती वरिष्ठपणाची भावना कल्याणकारी राज्याला धोक्याची आहे. राजसत्तेकडे दाद मागणारा प्रत्येकजण आपल्या एकाच समाजाचा सारखा घटक आहे ही भावना पाहिजे.

" राज्यकारभाराचें हें तत्त्व प्राचीन कालीं भारतांत होतें. दाद मागण्यासाठीं न्यायघंटा वाजवली जाई. हें तत्व शिक्षणानें आणि आपल्या पुढाऱ्यांचे मार्गदर्शनानें फार प्रगत झालें आहे. आतां दाद मागण्यासाठीं अगर न्याय मिळविण्यासाठीं न्यायघंटा वाजविण्याची गरज नाहीं. आपली एकमेकांतील वागणूकच अशी पाहिजे कीं त्याचा पाया न्यायावर आधारलेला असावा."

" आदर्श राज्यांत सरकारला कमीत कमी महत्व असते. म्हणून प्रत्येक नागरिकानें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं तो राज्याचा एक भाग आहे, महत्वाचा घटक आहे आणि त्यांच्यावर कांहीं जबाबदाऱ्या आहेत. सरकारचा राज्यकारभार पहाणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे, आणि हें कर्तव्य तो ज्या प्रमाणांत पार पाडतो त्या प्रमाणांत तो राज्याला उपयुक्त आहे. कल्याणकारी राज्यांत सरकार नागरिकाचे मदतीस तत्पर असतें एवढेंच नव्हे तर नागरिकही सरकारला मदत करणेंस तत्पर असतात. असें कल्याणकारी राज्य अनुभवास येणेंस अवधी लागेल परंतु सर्वांनीं आतांपासूनच प्रामाणिकपणें आणि उत्साहानें त्या प्रयत्नास लागलें पाहिजे."

◆◆◆

# कोकण विकास

***

द्विभाषिक मुंबई राज्याचें विभाजन होऊन मराठी व गुजराथी अशीं दोन राज्यें आतां होत आहेत. महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागाचे विकास साधण्याची तांतडीची गरज आहे असे चोहोबाजूंनी आवाज ऐकूं येत आहेत. श्री. यशवंतरावजी चव्हाण यांच्या नजरेसमोर अविकासित प्रदेश व त्यांच्या गरजा निश्चितपणें उभ्या होत्या हें पूर्वी कोकण विकास परिषदेपुढें त्यांनीं केलेल्या भाषणावरून दिसून येईल.

***

आजच्या या अतिशय महत्त्वाच्या प्रसंगीं, कोंकण विभागाच्या प्रतिनिधींनीं, मला बोलावण्याइतका माझ्यावर विश्वास दाखविला त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. आणि बोलावल्यानंतरच्या कामाची सुरुवातहि फारच चांगली केली आहे. शासनाच्या प्रतिनिधीकडून थैली घेण्याकरितां त्याला बोलावतात पण आपण सुरुवात थैली देऊन केली आहे याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद देतों.

योजनेच्या क्षेत्रांतला एक विधायक प्रयत्न आणि अत्यंत महत्त्वाचा प्रयत्न म्हणून आजच्या या परिषदेचें महत्त्व माझ्या दृष्टीनें फार आहे. कोंकण विकासाचा प्रश्न हा जसा एक महत्त्वाचा प्रश्न आहे तसा तो कांहींसा दुखावलेला प्रश्न आहे याची मला जाणीव आहे आणि म्हणून या

विकासाच्या प्रश्नावर जास्तीत जास्त विधायक दृष्टीनें आणि वास्तवतेच्या भूमिकेवरून पाहण्याचा प्रयत्न करणें आवश्यक आहे. आपण मंडळी या परिषदेमध्यें आपल्या सर्व प्रश्नांचा विचार याच भूमिकेवरून कराल व त्याच्या पाठीमागें ही विधायक दृष्टी ठेवाल अशी मला आशा आहे आणि तसा माझा विश्वासहि आहे.

कोंकणचा प्रश्न पाठीमागें कां पडला या प्रश्नाची मीमांसा कदाचित् अभ्यासकाला योग्य वाटण्याचा संभव आहे. इतिहासकाराच्या दृष्टीनेंहि कदाचित् तो महत्त्वाचा विषय ठरण्याचा संभव आहे. परंतु आज आणि उद्यां यांच्याशीं ज्यांचा संबंध आहे, अशा मंडळींना मी येवढीच नम्र विनंती करीन कीं या मीमांसेमध्यें जाण्यापेक्षां कोंकण विकासाचा प्रश्न किती निश्चितपणानें व्यवहार्यतेच्या भूमिकेवरती आणि किती वेगानें सोडवितां येईल, त्याचा विचार करण्याची दृष्टी आपल्या परिषदेनें आपल्यासमोर ठेवावी.

आजकाल हिंदुस्थानच्या योजनांचा आणि विकासाचा विचार करतांना त्यामध्यें अनेक दृष्टीनें या दोन भूमिकांचा विचार करण्याचा प्रसंग येतो. कारण शेवटीं विकासांचा आणि योजनांचा विचार करतांना या दोन महत्त्वाच्या दृष्टीकोनांचाच आज आपल्या देशामध्यें विचार होत आहे. मला वाटतें, योजनांचा विचार करणाऱ्या सर्वच मंडळींना सर्वच ठिकाणीं या दृष्टीनें विचार करावा लागत असेल. मी कांहीं या विषयांतला तज्ञ नाहीं; त्यामुळें या गोष्टी कांहीं मी येथें बोलू इच्छित नाहीं. परंतु आज या देशामध्यें योजनांचा विचार करणारी मंडळी जी आहेत, त्यांचा विचार अधिकाधिक वस्तुस्थितीनिष्ठ असा होऊं लागलेला आहे यांत शंका नाहीं. पहिल्या आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनांनीं जरी आपली सफर दहा वर्षें पुरी करत आणली असली तरी योजनेचा विचार आणि आचार हा आपल्या देशामध्यें नवीन आहे. असें जरी असलें तरी ही सफर करीत असतांना त्यांतल्या कांहीं ठाम गोष्टींचा विचार देशाकडून निश्चितपणें स्वीकारला जातो आहे व त्याचप्रमाणें याबाबतींत येणारा अनुभव व त्याबरोबरच

निर्माण होणाऱ्या कांहीं नवीन नवीन गोष्टी आपणांस स्वीकाराव्या लागत आहेत आणि शिकाव्याहि लागत आहेत.

मी आपणाला असा विचार सांगत होतो कीं, विकासाचा विचार करीत असतांना ज्या क्षेत्रामध्यें, ज्या भागामध्यें, ज्या प्रदेशामध्यें विकास करावयाचा आहे, त्या प्रदेशाच्या दृष्टीनेहि विकासाचा विचार व्हावयास पाहिजे ही एक दृष्टी आहे. परंतु त्याबरोबरच ज्या ज्या विषयांचा विकास करावयाचा आहे तो कोणत्या हेतूनें करावयाचा आहे,याहि गोष्टींचा विचार योजनेच्या विचारांमध्यें व्हावयास पाहिजे. हा जो दुसरा विचार आहे तो गेल्या पांच दहा वर्षांमध्यें प्राधान्येंकरून डोळ्यापुढें येऊं शकला नाहीं, आजपर्यंतहि आला नाहीं ही गोष्ट खरी आहे आणि म्हणून प्रादेशिक विकासांचेच अंग योजनेच्या विचारामध्यें असते असा समज निर्माण झाला त्यामुळें मी असं पहात आहे कीं हल्लीं योजनांचा विचार करणाऱ्या माणसांच्या मनामध्येंहि या विचारालाच जास्त प्राधान्य येऊं लागले आहे.

मुंबई राज्याचा विचार करीत असतांना ॲव्हरेजेसमध्यें मुंबई राज्यामध्यें किती उत्पादन वाढले, किती इंडस्ट्रीज निघाल्या असा एक विचार करून राज्याची प्रगति दाखविण्याचा एक मार्ग आहे. परंतु हा वाढलेला विकास राज्यांतील सर्व प्रदेशांच्या थरापर्यंत किती गेला ह्याहि विचाराला सध्यां प्राधान्य मिळत आहे. एवढेच नव्हे तर प्रदेशांच्यामध्यें तो विकासाचा विचार गेल्यानंतर समाजाच्याहि थरापर्यंत तो कितीपर्यंत जाऊन पोचला, ह्याहि विचार आतां महत्वाचा होऊं लागला आहे आणि म्हणूनच मी कोंकणच्या विकासाचा प्रश्न कांहींसा दुखावलेला प्रश्न आहे असें म्हटलें. त्याच्या पाठीमागें किंचितसे हे कारण आहे. त्याची कांहीं ऐतिहासिक मीमांसा थोडी फार करता येईल, पण मी सांगितले कीं, मी त्या मीमांसेंत जाणार नाहीं. आपणहि गेला नाहींत तरी चालेल असें मला वाटते. पण जावयाचा हक्क मागितला तर तो हक्क कोणाला नाकारता येणार नाहीं. परंतु माझ्या दृष्टीनें शेवटीं विकास ज्या प्रदेशांचा करावयाचा असतो त्या प्रदेशांतल्या इतर कांहीं बाबींचा विचार करणें आवश्यक असते, त्या शिवाय प्रदेशाच्या विकासाचा विचार करतां येणार नाहीं. जेथें निसर्गानें दिलेली जीं साधनसंपत्ती, नुकतीच

माणसांची किंवा नुसतीच साधनांची नव्हे, तर दोन्ही प्रकारची जी साधन-संपत्ति उपलब्ध असेल तिचा प्रामुख्यानें विचार करावा लागेल आणि म्हणून कोंकणच्या विकासाच्या या दृष्टीनें विचार करीत असतांना कोंकण हें एक भाग्यवान असें ठिकाण आहे, असें मी मानतों. कांहीं दृष्टीनें निसर्गानें त्याच्यावर अन्याय केला आहे. पण ज्या बाबतींत अन्याय केला आहे असें आपल्याला वाटते, त्याच बाबी त्याच्या फायद्याची आणि शोभेची ठिकाणें ठरलीं आहेत असा आतांपर्यंतचा अनुभव आहे.

पहिले महत्वाचे कोंकणचे साधन म्हणजे, कोंकणची माणसें असें मी मानतो. आतांच श्री. वर्दे यांनीं सांगितले कीं कोंकणमध्यें कर्तबगार, बुद्धिमान असें मनुष्यबळ आहे, मनुष्य शक्ती आहे, पण तिला आपल्या बुद्धिमत्तेचा आणि कर्तृत्वाचा विकास किंवा पाणी दाखविण्याकरितां कोंकणची सरहद्द ओलांडावी लागते ही गोष्ट कांहींशी खरी आहे. परंतु कुठल्याहि विकासाच्या आजच्या योजनेमध्यें तिथला माणूस जो आहे तो अतिशय महत्वाचा भाग आहे असें मानलें पाहिजे, कारण विकास हा जरी निव्वळ विकासांचीं साधनें निर्माण करण्यामुळें होत असला तरी त्या साधनांचा वापर करणारा त्यांतला जो मनुष्य आहे त्याचा विकास हाच विकास योजनांतील शेवटीं फार महत्वाचा भाग असतो, म्हणून विकास योजनेमध्यें या माणसांचें शिक्षण ही एक मोठी ह्यूमन प्रोसिजर असते—ती फार महत्वाची आहे.

अलिकडेच मी एक छोटीशी हकीगत ऐकली. जेथें ही हकीगत घडली त्या भागाचें नांव मी सांगणार नाहीं. भूदानचे कांहीं कार्यकर्ते एका मागासलेल्या भागामध्यें गेले होते. त्यांनीं मोठ्या खेदानें मला जी गोष्ट सांगितली तिच्यामध्यें शिकण्यासारखे बरेंच आहे असें मला वाटलें म्हणून आपल्यापुढें ही गोष्ट मी सांगतों. भूदानचे कार्यकर्ते शेतीच्या उत्पादनाची माहिती सांगण्याकरितां आणि सहकारी शेतीचीं मूल्यें समजावून देण्याकरितां तेथें गेले होते आणि एक दोन दिवसांच्या श्रमांनीं त्यांनीं एक छोटीशी सभा घेतली. डोंगर पठाराला ही सभा बसली होती आणि त्यांच्यापुढें त्यांनीं

ह्या सहकारी तत्त्वाची आणि शेतीच्या उत्पादनाची वगैरे वगैरे महत्वाचीं मूल्यें आणि त्यांचा विचार सांगावयाला सुरुवात केली. सकाळची वेळ होती, इतक्यामध्यें त्या कोवळ्या उन्हामध्यें, त्या डोंगर पठारावरून दोन चार ससे पळत सुटले आणि ते दोन चार ससे ह्या लोकांनीं पाहिल्याबरोबर हा सहकारी मूल्यांचा आणि शेतीच्या उत्पादनाचा विचार या लोकांनीं सोडून दिला आणि ते सगळे लोक त्या सशांच्या पाठीमागें पळत सुटले, कारण त्यांनीं असा विचार केला कीं हें घेतलेलें सहकारी तत्व आणि यांतून वाढणारें शेतीचें उत्पादन हें पुढच्या वर्षीं किंवा त्याच्या पुढच्या वर्षीं पदरांत पडणार आहे.आज संध्याकाळची मेजवानी ह्या सशांच्या वरतीच होणार आहे. लहानशीच गोष्ट होती. परंतु तींत पुष्कळसे तथ्य आहे. कारण शेवटीं आम्ही ज्यांच्या मार्फत काम करणार आहोत त्यांना त्या कामामध्यें कसा रस निर्माण होईल हा महत्वाचा प्रश्न, योजनेच्या बाबतींमध्यें जो असतो तो फार महत्वाचा असतो, परंतु या प्रश्नाचा विचार कोंकणच्या लोकांच्या दृष्टीपुढें दिसत नाहीं आणि म्हणून मी आपणाला सांगितले कीं, कोंकणचा माणूस जो एक महत्त्वाचा गुण आहे आणि जी तुमची खरी संपत्ती आहे तिकडे आपणांस मी आतांच जी गोष्ट सांगितली तिच्यांतील तत्व लक्षांत घेऊन आपण आपली दृष्टि वळविली पाहिजे.

दुसरी संपत्ती तुमच्या कोंकणच्या कांठीं हेलावणारा महासागर आणि त्याचा किनारा, ही तुमची मोठी संपत्ती आहे. परंतु तुमच्या पूर्वेच्या बाजूला उभा राहिलेला सह्याद्रि ह्या त्याच्या पठारावरच्या लोकांच्या संपत्तीचें साधन कधीं काळीं झाला आहे. परंतु त्यानें आणून दिलेला भरपूर पाऊस हा निदान रत्नागिरीच्या बाबतींत तरी कधीं कधीं कांहीं लोकांना शापासारखा वाटतो असा अनुभव आहे. कारण त्यामुळें जमीन वाहून जाते व पाठीमागे फक्त कातळ शिल्लक राहतात. खडकाळ जमीन शिल्लक राहते. त्यामुळें रत्नागिरीमध्यें शेतीचा व्यवसाय हा फक्त नाममात्रच व्यवसाय राहिलेला आहे.

या सर्व गोष्टींचा विचार करून ही जी साधन संपत्ती आणि या ज्या अडचणी आहेत त्याचा विचार करून कोंकणच्या विकासाचा विचार

आपण केला पाहिजे. आपण ह्या परिषदेनंतर निव्वळ अनेक पानांची एक छोटीशी यादीच तयार केली तर तुम्ही तुमचे काम संपूर्णपणें केलें असे मी म्हणणार नाहीं. अर्थात् योजनेच्या कामामध्यें योजनांची यादी हा एक महत्वाचा भाग आहे. कारण त्या शिवाय माणसाला आपण काय केलें हें समजत नाहीं. परंतु हीं जीं विकासाचीं महत्वाचीं साधनें आहेत, त्यांची वाढ करण्याच्या दृष्टीनें आपण काय केलें पाहिजे हा महत्वाचा विचार योजना करणाऱ्या माणसांच्या पुढें असतो आणि त्या दृष्टीनें आपण आपल्यापुढें कांहीं 'वर्किंग पेपर्स' असा आपण ज्याचा उल्लेख केला असे कांहीं पेपर्स मांडलेले पाहिजे. योजना फार चांगली आहे. जीं साधनें आहेत त्या साधनांपैकीं कोणत्या महत्वाच्या गोष्टी केल्यामुळें आम्ही रत्नागिरीचा विकास करूं, आम्ही आमच्या कोंकणचा विकास करूं या दृष्टीनें आपण विचार केला पाहिजे.

कोंकणामध्येंहि तीन वेगवेगळे भाग आहेत. रत्नागिरी हा एक वेगळा भाग मानला पाहिजे. कुलाबा ठाण्याचा वेगळा भाग मानला पाहिजे. रत्नागिरी-मध्येंहि कांहीं ऐतिहासिक कारणामुळें—निव्वळ राजकीय ऐतिहासिक कार-णामुळें नव्हे—तर सामाजिक परिस्थितीच्या कारणांमुळें-दक्षिण रत्नागिरी आणि उत्तर रत्नागिरी असे भाग पडतात ही गोष्ट कांहीं भाग पाडण्याच्या दृष्टीनें नव्हे तर परिषदेपुढें असणाऱ्या कार्याचा अंदाज घेण्यासाठीं मी आपल्या नजरेसमोर आणूं इच्छितों. या दृष्टीनें कोंकणचे जे प्रश्न आहेत त्यांचा विचार करीत असतांना कोंकणचा समुद्र किनारा, तिथें पडणारा पाऊस, तेथें असणारी मनुष्य-संपत्ती, तेथील जमिनीचा एकंदरींत असणारा कस आणि परिस्थिति यांचा विचार करूनच तेथील विकासाचे कार्यक्रम शेवटीं निश्चित करतां येतील. आम्ही नुसत्या मनामध्यें विकासाच्या योजना आणि मनरंजे मांडल्यामुळें विकासाच्या योजना करतां येणार नाहींत.

तेव्हां माझ्या मतानें कोंकणच्या विकासाच्या दृष्टीनें शेवटीं तीन—चार गोष्टी महत्वाच्या ठरतात. आज आधी मी म्हटलं त्याप्रमाणें मी जेव्हां पुराच्या निमित्तानें कोंकणामध्यें गेलों तेव्हां पुराचा हा प्रश्न माझ्या मनाशीं

अधिक निकडीनें आला, तांतडीचा प्रश्न वाटला, किंवा त्या प्रश्नाची निकड मनावरती जास्त जोरानें भासली. कारण मी कोंकणामध्यें अनेक वेळां गेलो आहे. कारण मी अशा गांवचा आहे कीं, जें गांव कोंकणची पावसाळ्याची उतारपेठ आहे. पावसाळ्यामध्यें, कऱ्हाडहून चिपळूण, खेड-दापोलीकडे जाणाऱ्या माणसांचे तांडेच्या तांडे मी माझ्या लहानपणीं पाहिले आहेत. उन्हाळ्यामध्यें जाऊन तिथला चांगला आंबा खाण्याकरितां आणि दौरे करण्याकरितां मी कोंकणमध्यें पुष्कळच फेऱ्या मारल्या आहेत. परंतु पावसाळ्यांत पुरानें वेढलेलें, पीक वाहून गेलेलें कोंकण मी अगदीं अलिकडे म्हणजे फक्त गेल्या वर्षींच पाहिले आणि त्यावेळीं असें लक्षांत आलें कीं सगळीं कर्तबगार माणसें आणि बिन कर्तबगार माणसें हीं कर्तबगारीसाठीं जिल्हा सोडून बाहेर गेलीं आहेत.त्यामुळें रत्नागिरीच्या आर्थिक जीवनामध्यें एक प्रकारची अगतीकता ज्याला म्हणतात अशा प्रकारची स्थिती निर्माण झाली आहे.

तेव्हां रत्नागिरीचा विकास करावयाचा असेल, त्याचें आर्थिक जीवन संपन्न करावयाचे असेल तर ज्याप्रमाणें कांहीं नवीन जिवंत पाण्याचे झरे असल्याशिवाय नदी वाहूं शकत नाहीं त्याप्रमाणें तेथें जिव्हाळ्याच्या अशा शक्ती ज्या कांहीं असतील, त्या मोकळ्या केल्या पाहिजेत, त्या उघड्या केल्या पाहिजेत. ते करणें हें माझ्या मतें आजच्या कोंकणच्या विकासाचा पाया घालणें आहे. सगळ्या गोष्टींची १०-१५-२० वर्षांत होणाऱ्या कामांची एक यादी पुढें मांडून जर आपण आपलें समाधान करून घेणार असाल, तर आपण तें समाधान घेऊं शकतो. पण कोंकणच्या विकासाचा विचार करणाऱ्या मंडळींनीं माझ्या दृष्टीनें आज ज्या मूलभूत प्रश्नांचा विचार करावयास पाहिजे तो हा आहे कीं साधनसंपत्ती कोंकणामध्यें आहे तिची शक्ति आपणांस कशी मोकळी करतां येईल या दृष्टीनें जे महत्वाचें ३-४ प्रश्न असतील त्यांच्या बाबतीमध्यें आपण काय केले पाहिजे, आणि त्याकरितां आपण काय योजना आंखली पाहिजे याचा विचार केला पाहिजे. आणि मला अशी आशा आहे कीं आपण ह्य दृष्टीनें या मुख्य प्रश्नाचा विचार कराल.

दोन चार महत्वाच्या गोष्टी आहेत, त्यांचा उल्लेख केल्याशिवाय माझें हें उद्घाटनाचें भाषण संपविणें चुकीचे ठरेल. प्रत्येक भागाच्या दृष्टीनें अशा कांहीं योजना असतात कीं त्या योजना शेवटीं त्या भागांतल्या लोकांच्या भावनांच्या प्रतिकात्मक अशा झालेल्या असतात. त्या विकासाच्याहि प्रतिकात्मक अशा झालेल्या असतात. म्हणून सर्वसाधारणपणें विकास योजनांचा उल्लेख करण्याचा माझा विचार नसला तरी २–३ महत्वाच्या गोष्टी संबंधानें मला सांगितलें पाहिजे. त्यांतली पहिली महत्वाची गोष्ट, कोंकणच्या रेल्वे संबंधीची आहे. दुसरी कोंकणांतील जलवाहतुकीची आहे आणि तिसरी कोंकणांतील रस्त्यांच्या वाहतुकीची आहे. कोंकणच्या रेल्वेसंबंधीच्या प्रश्नाचा उल्लेख मी निव्वळ सरकारची बाजू आपल्यापुढें मांडावी अशा दृष्टीनें केलेला नाहीं. परंतु कोंकणच्या विकासाकरितां जर कोणती महत्वाची गोष्ट आज होण्याची आवश्यकता असेल तर ती कोंकणच्या रेल्वेसंबंधीची आहे. रेल्वेची वाहतूक आणि रस्त्यांची वाहतूक या बाबतींमध्यें कोंकणच्या दृष्टीनें जी एक प्रकारची बंदिस्त परिस्थिति निर्माण झाली आहे तिला वाट मोकळी करून मिळाल्यास कोंकणांत जी एक मूळ शक्ती आहे ती मोकळी व्हायला जागा सांपडेल, हा महत्वाचा मूळ विचार मला मान्य झाला आहे. आणि म्हणून कोंकणच्या रेल्वे बाबतीमध्यें जेव्हां जेव्हां संधि आली तेव्हां शासनाच्या मार्फत, आणि व्यक्तिशः माझे सहकारी बांधकाममंत्री श्री. बाळासाहेब देसाई आणि मी योग्य प्रसंगीं जेव्हां हा प्रश्न निघाला तेव्हां याबाबतींत सतत प्रयत्न करीत आलों आहोंत, आणि आजच्या क्षणीं मला असा विश्वास आहे—कारण उद्यांच्या घडणाऱ्या गोष्टी संबंधानें—माणसानें—निदान माझ्या परिस्थितींतल्या माणसानें थोडेसे विचारानें बोलावे म्हणून मी 'आणि', 'पण', परंतु हे शब्द घालतो आहे, पण आजच्या परिस्थितीमध्यें मला असा विश्वास वाटतो कीं, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें कोंकणच्या रेल्वेची मागणी पुरी होईल यासंबंधी मला शंका राहिलेली नाहीं.

कोंकणच्या बंदरांचाहि असाच प्रश्न महत्वाचा आहे. गेल्या खेपेस जेव्हां पुराच्या वेळीं मी कोंकणांत गेलों होतों त्यावेळीं मी असें पाहिलें आहे कीं

खाड्या भरून गेल्या होत्या आणि खाड्या भरल्या याचें कारण बंदरें भरलीं आहेत. आज खाड्या डी–सिल्ट करणें कितपत व्यवहार्य किंवा शक्य आहे, त्याची मला शंका आहे. परंतु बंदरें डी-सिल्ट केलीं पाहिजेत. यासंबंधानें विचार करणाऱ्या कुणाहि माणसाच्या मनाशीं शंका येण्याचें कारण नाहीं.

आपल्याला कल्पना असेल कीं, गेल्या वर्ष–दीड वर्षांमध्यें दी पोर्टस् ॲण्ड मरीन ऑर्गनायझेशन म्हणून मुंबई सरकारनें एक नवीन ऑर्गनायझेशन उभी केलेली आहे आणि तिच्यामार्फत या कोंकणच्या किनाऱ्यावरच्या बंदरांच्या विकासाचें काम आम्ही कांहीं प्रमाणामध्यें तेजीनें हातीं घेतलेलें आहे. आपणाला कल्पना असेल कीं, १९५६-५७ च्या सुमारास आम्ही फक्त २ लाख रुपये या बंदरावर खर्च करीत होतों. १९५७-५८ सालीं हा खर्च ६-७ लाखावर गेला. १९५८-५९ सालीं जवळ जवळ ८-९ लाख रुपये खर्च होईल. मला वाटतं कीं ह्याच प्रमाणावर ही गती जर वाढत गेली तर कोंकणच्या बंदरांचा गाळ निघू शकेल. परंतु निव्वळ पैसे खर्च करून सुटणारे हे प्रश्न नाहींत. आज २-३ ड्रेजर्स खरेदी करावयाचा विचार आम्ही करून राहिलों आहोंत. आज ड्रेजर्सची बाजारपेठ मोठी महागली आहे. महाग किंमत देऊनहि घ्यायची इच्छा असली तरी-आज ती वस्तू दुर्मिळ झालेली आहे. ही अडचण व्यावहारिक असली तरी त्या दृष्टीनें आम्ही प्रयत्न करीत आहोंत. किती पैसे खर्च केले याच्यापेक्षां आम्ही योग्य दृष्टीनें प्रयत्नाला सुरवात केली आहे किंवा नाहीं याचें निदर्शक म्हणून मी या गोष्टींचा उल्लेख केला.

तीच गोष्ट रस्त्या-रस्त्यांची आहे. हाहि एक महत्वाचा विकासाचा रस्ता आहे. दिवा-दासगांवपर्यंत गेल्यानें कांहीं रत्नागिरीचा संपूर्ण प्रश्न सुटला असें मी मानीत नाहीं. शेवटीं हे खरे आहे कीं, छोट्या छोट्या खोऱ्यांमध्यें रत्नागिरी जिल्हा विभागला गेला आहे. हा रत्नागिरी जिल्ह्याचा भूगोल तुम्हांला माझ्यापेक्षां जास्त माहीत आहे. हे एकेक खोरे, त्या त्या खोऱ्यामध्यें असलेल्या प्रत्येक गांवांशीं महत्वाच्या रस्त्यांनीं जोपर्यंत जोडले जात

नाहीं तोपर्यंत खरे रत्नागिरीचे मन मोकळे होऊन समुद्राच्या त्या उघड्या पाण्यावर येऊन पडेल असं मला वाटत नाहीं. आणि म्हणून छोट्या छोट्या रस्त्यांची देणगी, छोट्या छोट्या रस्त्यांची वाढ-ज्याला नेट-वर्क्स ऑफ रोडस् म्हणतात-रत्नागिरीमध्यें कांहीं वर्षांच्या प्रयत्नानें करण्याची आवश्यकता आहे.

आणि समुद्र किनाऱ्यावरच्या मच्छीमारीचा धंदा, विचार करण्यासारखा आहे. छोट्या छोट्या ठिकाणीं उद्योगधंद्याची वाढ करतां येण्याची शक्यता आहे.मोठ्या उद्योगधंद्याची वाढ करतां येण्याची शक्यता आहे. मोठ्याउद्योगधंद्यांचा विचार आतां श्री. वर्देनीं मांडला, पुष्कळ धंद्यांची त्यांनीं नांवें सांगितली, ते त्यांतले तज्ञ आहेत. ते त्याचा विचार करतील. परंतु छोट्या छोट्या शहरांत छोट्या उद्योगधंद्यांना लागणारीं साधनें पुरविण्याची गोष्ट महत्वाची आहे असं मी मानतो.

मी येथें येण्यापूर्वीं पुष्कळसा विचार आणि कांहीं तयारी करून येथें आलो. मी आज येथें उद्योगधंद्याचा विचार आपण करावा असें म्हणताच तेथील लोक उद्या असं विचारतील कीं कोंकणच्या वीज पुरवठ्याची आपण काय व्यवस्था केली आहे. मी आपणाला असें सांगूं इच्छितों कीं ठाणें कुलाब्याचा वीज पुरवठ्याचा प्रश्न सुटलेला आहे. एका प्रमाणामध्यें ही वीज वाढविण्याची शक्यता संपूर्णपणें आतां निर्माण झाली आहे. माझी खरी अडचण आणि खंत थोडीशी रत्नागिरीबद्दलची आहे. कारण कोयनेची वीज ही रत्नागिरीला मिळाली पाहिजे या संबंधानें शंका माझ्या मनाशीं नाहीं. आपल्याहि मनाशीं नाहीं. परंतु एक गोष्ट निश्चित, कीं कोयना ही सेकंड स्टेजला जाईतोंपर्यंत रत्नागिरीला कोयनेची वीज किती मिळेल या संबंधानें मी साशंक आहे. पण तोपर्यंत ५ वर्षांचा जो काळ जाणार आहे त्या काळामध्यें आम्ही स्वस्थ बसणार आहोंत का ? आणि म्हणून मी येथें येण्यापूर्वीं काल जे आमचे इलेक्ट्रिसिटी बोर्ड आहे त्यांतल्या कांहीं मंडळींशीं चर्चा करून आलो आणि त्यांनीं मला असं आश्वासन दिले आहे कीं जर सरकार त्यांना आर्थिक प्रश्नाबाबत मदत करणार असेल—आणि ते

करण्याचा सरकार विचार करीत आहे—तर छोट्या छोट्या उद्योगधंद्यांच्या-साठीं ज्याला डिझेल प्लँट किंवा आणखी दुसऱ्या कांहीं पद्धतीनें वीज निर्माण करण्याचे जे प्रयत्न आहेत ते रत्नागिरी जिल्ह्यांतल्या दोन चार प्रमुख ठिकाणीं करायची त्यांची तयारी आहे. अशा तऱ्हेचें आश्वासन त्यांनीं मला दिलें आहे.

आणि एका दुसऱ्या गोष्टीचा मी येथें उल्लेख करतो; उल्लेख म्हणण्या-पेक्षां आपण त्याला अनाउन्समेंट म्हटलीत तरी माझी त्याला कांहीं हरकत नाहीं. कारण एक गोष्ट रत्नागिरीच्या दौऱ्यानंतर मी जाहीर बोललो होतो कीं, वेळ अशी आली आहे कीं महाराष्ट्रांतील १०–१२ जिल्ह्यांचा आज जो रीज मानला जातो त्यांतल्या देशावरच्या जिल्ह्यांनीं विचार केला पाहिजे आणि म्हटलं पाहिजे कीं आपण आपली कांही काळ प्रगति थांबवितो पण कोंकणचे महत्वाचे प्रश्न सोडविण्याकरितां आम्ही त्यांना कांहीं तरी द्यायला तयार आहोंत, अशी एक माझी भावना होती आणि त्यादृष्टीनें कांहीं प्रयत्न करीत होतों.

मी, या परवां, जाहीर झालेल्या बजेटमध्यें, जर हें जाहीर करूं शकलो असतो तर मला अतिशय आनंद वाटला असता, पण तोपर्यंत या गोष्टीची तयारी होऊ शकली नव्हती. परंतु गेल्या तीन वर्षांत योजनेचा जो विकास चालू आहे, जी गती चालू आहे त्यामध्यें असें दिसून आले कीं कांहीं योजनांवरचे पैसे आम्ही खर्च करूं शकणार नाहीं. आणि आमचे पैसे कांहीं शिल्लक राहतील त्यांतील कांहीं पैसे कोंकणच्या कामाकरितां पाठवून दिले पाहिजेत, री–अलोकेशन ज्याला म्हणतात—अशी त्यांची परत वांटणी, परत विभागणी केली पाहिजे. असा विचार करीत असतांना सरकार या निर्णयाला आले आहे, कीं जे कांहीं पैसे शिल्लक राहतील त्यांतील एक कोटी रुपये, हे रत्नागिरी, ठाणे आणि कुलाब्यांतील रस्त्यांच्यासाठीं, बंदरांच्यासाठीं आणि मच्छीमारीचा जो धंदा त्यांतील कांहीं कामासाठीं योजनेची राहिलेली जी कांहीं दोन वर्षें—तंत्रतः आहेत पण व्यवहार्यतः हा काळ दीड वर्षांचा होण्याचा संभव आहे—ह्या दीड वर्षांमध्यें या तीन मह-

त्याच्या कामासाठीं या एक कोटी रुपयांचा खर्च करावा असा निर्णय मुंबई सरकारनें घेतलेला आहे.

मी फक्त ही कामाची सुरुवात असें मानतो. याच दिशेनें जर आम्ही प्रयत्न करीत गेलो तर मला असें वाटतें कीं तुम्ही जो विधायक प्रयत्न सुरू केलेला आहे, तो विधायक प्रयत्न हा खऱ्या अर्थानें यशस्वी होईल, आणि कोंकण विकास परिषदेनें जें मार्गदर्शन विकासाच्या प्रयत्नांचे घालून दिलेले आहे त्याचाच पाठपुरावा या राज्याचे दुसरेहि विभाग करून असेच विधायक प्रयत्न ते करीत राहतील अशी मी आशा करतो. कारण कोंकणचा विकास जसा व्हावा असें माझ्या मनांत आहे तसाच या राज्यांतील प्रत्येक विभागाचाहि विकास व्हावा अशी आपली अपेक्षा असली पाहिजे आणि प्रादेशिक विकासाच्या पाठीमागचीहि हीच कल्पना आहे, कीं देश मोठा झाला म्हणजे नुसता भूगोलावरचा देश मोठा होऊन भागत नाहीं. वेगळ्या वेगळ्या ठिकाणीं, वेगवेगळ्या घरांत राहणारा तो माणूस विकसित झाला पाहिजे. ही विकासाच्या पाठीमागची आमची भूमिका आहे. आणि यात्र विचाराच्या दृष्टीनें आपण हा प्रयत्न करीत आहांत. मला माझ्या मर्यादेत शक्य होईल त्या प्रमाणामध्यें माझें संपूर्ण सहकार्य राहील असें मी आपणाला आश्वासन देतो आणि आपण हा सुरू केलेला प्रयत्न खऱ्या अर्थानें यशस्वी होवो अशी प्रार्थना करून या परिषदेचें उद्घाटन झाले असें औपचारिक-रीत्या जाहीर करतों.

◆◆◆

# खेड्यांतील सहकार

•••

**लोकशाही म्हणजे दोन पक्ष, दोन पार्ट्या, असा त्याचा अर्थ नाहीं. नवी वृत्ती, नवा विचार व त्यामागें लोकशक्ती उभी करणें हा लोकशाहीचा अर्थ आहे. या वृत्तीचा खेड्यांतील अविष्कार हा परस्परांच्या सहकारामधून दिसून येतो. एका सहकारी कारखान्याने जीवन प्रफुल्ल करणाऱ्या शेतकऱ्याने आपला तो प्रकाश आपल्या इतर बांधवांच्या झोपडीपर्यंत कसा पोचवावा याचे उत्कृष्ट दिग्दर्शन सांगली सहकारी साखर कारखान्याच्या उद्घाटन प्रसंगीं श्री. यशवंतराव यांनी केले.**

***

तासगांव येथें समाजविकास गटाचे वतीनें एक औद्योगिक प्रदर्शन भरले होते; त्याचे ता. १० फेब्रुअरी १९५८ रोजीं उद्घाटन करतांना यशवंतराव म्हणाले कीं नवी वृत्ती, नवा विचार व त्यामागें शक्ति उभारणें हा लोकशाहीचा खरा हेतू आहे' व आर्थिक विकासासाठीं आपलें सामर्थ्य खर्ची करा असें आवाहनही त्यांनीं सर्व जनतेला केलें. उद्घाटन प्रसंगीचे आपल्या भाषणांत ते म्हणाले—

"आपल्या या जिव्हाळ्यानें केलेल्या स्वागताबद्दल मी अंतःकरणपूर्वक आभारी आहे. तुमच्या या जिव्हाळ्यानें मला राज्यकारभार करायला शक्ति मिळणार आहे. तुमचे प्रेम पाहिले म्हणजे माझी शक्ति दुणावते. तासगांवच्या वातावरणांत बदल दिसत आहे हें काम करणारे कार्यकर्ते यांच्या

प्रयत्नाचें फळ. पण कार्यकर्त्यांच्या विचारांत बदल व्हावयास हवेत. पूर्वी पार्ट्या होत्या. आज नगरपालिकेनें एकजुटीनें किती तरी कामें केलीं आहेत. आतां एका नवीन पद्धतीनें काम करावयाचें आहे—लोकशाही पद्धतीनें. लोकशाही म्हणजे दोन पार्ट्या नव्हेत. नवी वृत्ति, नवा विचार व त्यामागें शक्ति उभारणें हा लोकशाहीचा खरा हेतु आहे. देश बदलावयाचा म्हणजे डोंगर, नद्या बदलावयाच्या नाहींत. तर देशांतील माणसें मोठी झाली पाहिजेत. त्यांची मने व विचार मोठे झाले पाहिजेत. देशाची शक्ति मोठी करावयाची आहे. स्वराज्य आलें आहे. त्याचा उपयोग विकासासाठीं झाला पाहिजे. आपली शक्ति विभागली गेली आहे. ती एकीनें लोकांच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठीं वापरली पाहिजे.

"वाद व घोषणा आपण ऐकतो. पण येत्या ५-१० वर्षांत आपण जर कांहीं केलें नाहीं तर एक मोठी संधी दवडूं. इतर देशांत २००-३०० वर्षांपूर्वीं कामाला सुरवात झाली आहे, त्यांच्याबरोबर आपली स्पर्धा आहे. स्वराज्य मिळविलेलें टिकवावयाचें असेल तर आपली शक्ति वाढविली पाहिजे. तिसरी लढाई होऊं नये पण झाली तर त्याच्या आंत आपली शक्ति वाढावयास हवी. दांडगेश्वरपणानें जग जिंकावयाचा प्रयत्न चालू आहे. आपण एकीच्या, शक्तिच्या विचारानें भारले पाहिजे. स्वराज्यानंतरहि नाराज कां ? त्याचे कारण शक्ति, मनें विभागली आहेत. राष्ट्रीयत्व बोलणें सोपे आहे पण आतां वागावयाची वेळ आली आहे. हिंदुस्थान हें एक राष्ट्र आहे. तें राष्ट्र म्हणून जगेल व राष्ट्र म्हणून मरेल असें म्हणत होतों. आतां तसें वागावयाची वेळ आली आहे. जातीच्या, धर्मांच्या व प्रांताच्या विचारांतून पुढें गेलें पाहिजे. नवीन घडविण्यासाठीं तुमची माझी शक्ति वापरावयाची आहे. मूळ जी देशाची शक्ति ती वाढवावयाची आहे. भारताला पहिल्या प्रतीचे राष्ट्र करावयाचें आहे. म्हणून दुसऱ्यावर अवलंबून राहून भागणार नाहीं. आपलीं मनें फुटलेली आहेत; फुटलेलें मन नवीन काम उभारूं शकणार नाहीं. हें एकट्या दुकट्याचे काम नाहीं. विचारांची श्रद्धा ठेवणारी माणसें हवीत. नव्या बुद्धिला, नव्या शक्तिला ताकद देण्याकरितां झटलें पाहिजे. लोकांनीं व सरकारनीं एका ठिकाणीं

शक्ति वापरली पाहिजे. १५-२० वर्षे असें केलें तर जगांतल्या कुठल्याहि राष्ट्राची मान वर करून पाहण्याची छाती होणार नाहीं. गांव, शेती सुधारली पाहिजे. मुंबई राज्यांत काम वाढावे ही इच्छा. नुसत्या पैशावर राज्य चालत नाहीं. तुमचा जिव्हाळा, प्रेम हवें. तुम्हीं ही प्रेमाची शक्ति आमच्या मागें उभी करा. म्हणजे आमची मोठीं कामें होतील.

## जीवनांतील सहकार

सांगली येथील साखर कारखान्याचे उद्घाटन प्रसंगीं यशवंतराव म्हणाले—गेले दोन तीन वर्षांत आमच्या नेहमीच्या कामाच्या धांदलीमध्यें वसंतराव दादा कोठें दिसत नसत. कांहीं लोक विचारीत होते वसंतराव राजकारणास कंटाळले आहेत काय? आम्ही त्यांना सांगत होतो—ते राजकारणाच्या नव्या प्रवाहांत शिरले आहेत. सभा, संमेलने—मोर्चे मिरवणूका हा एक राजकारणाचा अंगभाग होता पण आतां अशा परिस्थितींत राजकारण राहिलें नाहीं--मध्यें नाहीं कां !--मोठ्या कड्यावरून उडी घेतांना—धबधबा असतो, नदी सारखी धबधबा करीत जात नाहीं—सारखी डोंगरात प्रवास करीत नाहीं—ती धबधब्यांतून उडी टाकून जेव्हां—जेव्हां जमिनीवर उतरते तेव्हां जमिनीच्या पातळीवर येते. त्याचे आवती-भोवतीची जमीन काळी करीत पुढें जात असते. राजकारणानी धबधब्यासारख्या उड्या घेतल्या. वसंतरावनीं तुम्हा सगळ्यांस माहीत आहे, तर आतां तीं नदी पातळीला आली आहे. राजकारण देशाचे हीत करण्याच्या मार्गाला लागले आहे. त्यामुळें मोर्चे आणि घोषणा ज्यांना करावयाच्या असतील त्यांना बंदी नाहीं केलेली, त्यांच्या करीतां परवानगी आहे. परंतु आज लोककल्याणाचा मार्ग स्वीकारून पुढें जाण्याचा प्रयत्न करण्याकरितां त्याची जरूरी नाहीं. कोठेंतरी शांतपणानें ठरलेल्या योजनेची अंमलबजावणी मार्ग कसा चोखाळायचा हा शांतपणानें विचार करावयाचा दिवस आहे. आणि गेलीं दोनवर्षे अशा अज्ञानवासांत वसंतराव होते असे माझे मत आहे. या बुधगांवच्या आणि सांगलीच्या माळावरती एक नवीन दुनिया निर्माण करण्याच्या कामांत ते गुंतले होते. आणि या नवीन दुनियेचे कुलूप त्यांचे

संमतीनें किल्ली होऊन मी खोलीत आहे. बरेच दिवस आम्ही या गोष्टींची स्वप्नें पहात होतों कीं शेतकऱ्यांचे एक नवीन आर्थिक जीवन तयार केलें पाहिजे. मोठ्या मोठ्या घोषणा तर आम्हीं करीत होतो. परंतु या घोषणांचे अर्थ आतां हळूहळू आम्हांला समजायला लागले आहेत. शेतकऱ्यांचे राज्य झाले पाहिजे—ऐकलं म्हणजे बरं वाटतं--अंग जरासे शहारून येते. परंतु शेवटी त्यांची जबाबदारी काय ? त्यांची अडचण काय ? त्यांच्यासाठीं काय केले पाहिजे ? हे महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांचे कांहीं विशिष्ठ प्रश्न आहेत. त्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. महाराष्ट्रांतील शेतीच्या प्रश्नांची काय स्थिति आहे. मी या सहकारी कारखान्याच्या दृष्टीनें हे विचार अवश्य बोलून दाखविले पाहिजेत. कारण मी माझ्या मनांतील विचार स्पष्ट करतो-स्वतः माझेसाठीं—जमलं तर दुसऱ्यासाठीं ! महाराष्ट्रांतल्या शेतीचा प्रश्न हा प्रमुखतः जिराईत शेतीचा प्रश्न आहे :असें माझें मत आहे. आपला महाराष्ट्र आपण पाहिला तर तो पश्चिम खोऱ्यांत—पश्चिमबाजूला सह्याद्रीचा एक मोठा पट्टा-एक मोठा भिंतीसारखा मोठा. आपण पाहिले मी एक तासभर आतां प्रवास करून आलों. एक प्रकारचे दृश्य डोळ्या-समोर दिसते. ती भिंत उभी राहिली आहे. आणि पांच दहा मैलावर डाव्या बाजूस त्या बाजूला पाहिले कीं नदी चालली आहे. पूर्वेच्या बाजूला गेली आहे. पण नद्यांचें रूप काय. सगळ्या नद्यांची शेपटं महाराष्ट्राच्या नशीबाला आली आहेत. आणि नद्यांची तोंड पूर्व बाजूला गेली आहेत. पण काय ? यामुळें म्हटलें तर एक प्रकारचा तोटा आहे. परंतु नद्यांची शेपटं देणारा हा सह्याद्री त्यांतून प्रतापगड, रायगड, सिंहगड हा एक अभिमान आमच्या नशिबाला आला आहे. तरी आम्हाला अभिमान वाटतो. पण आर्थिक दृष्टीनें जोखीम निर्माण झाली आहे. थोडें पाणी दुसरीकडे जाते पण ठीक आहे. या पाण्याचा तो उपयोग करून मी परवा हिशेब करून घेतला कीं जास्तीत जास्त पाण्याचा थेंब नि थेंब वापरण्याचा प्रयत्न केला तर महाराष्ट्राचा शेतकरी ३० टक्के बागायत करूं शकतो जास्त नाहीं करूं शकत; म्हणजे राहिलेल्या ७० टक्के शेतीचा निर्वाह जिराइत शेतीवरच आहे मी आपल्याला शेतीच्या पद्ध्यासंबंधाने कल्पना देतो.पण उरलेल्या ३० टक्के त्याचीं तरी परिस्थिती काय ! म्हणजे मग प्रश्न असा निर्माण झाला कीं महाराष्ट्रां-

तल्या शेतीचा प्रश्न जर सोडवावयाचा असेल तर जिराइत शेती कोणत्या पद्धतीनें चांगली करतां येईल याचा विचार केला पाहिजे. त्याचबरोबर जिराइत शेती-वर असणारा जो शेतकरी समाज आहे त्याला शेतीशीं संलग्न असा दुसरा उद्योगधंदा महाराष्ट्रांत सुरू केला पाहिजे त्याच्याशिवाय महाराष्ट्रांतल्या शेतकरी समाजाचे भविष्य आम्ही सुधारू शकणार नाहीं. म्हणून दोन मार्ग शिल्लक उरतात; जी बागायत शेतें आहेत ती चांगली केलीच पाहिजेत, पण त्या बागायत शेतीत माल निर्माण होईल त्या मालाचा उद्योगधंदा महाराष्ट्रांत निर्माण केला पाहिजे आहे ही अतिशय महत्वाची गोष्ट आहे. म्हणून ज्या अनेक योजना महाराष्ट्राच्या उद्धाराच्या दृष्टीनें, शेतकरी समाजाच्या उद्धा-राच्या दृष्टीनें आहेत, त्या पुढें या बागायत शेतीतून निर्माण होणाऱ्या ज्या शेतीच्या वस्तु आहेत, त्यांतून उद्योगधंदे उभे करणें ही एक महत्वाची काम-गिरी आहे असें मी मानतो. त्यांतला महत्वाचा भाग हा साखर कारखान-दारीचा आहे. महाराष्ट्रांतला ऊस अधिक गोड असतो असें सांगतात. आणि ही हिंदुस्थानमध्यें सिद्ध झालेली गोष्ट आहे. गंगेचं पाणी पवित्र आहे. पण गंगेच्या कांठच्या ऊसामध्यें साखर कमी आहे असं शास्त्रज्ञांचं मत आहे. आमच्या महाराष्ट्रांतल्या कोयनेच्या आणि कृष्णेच्या काठीं माणसें जरा तिखट आहेत असा आमचा लौकिक आहे. पण त्या पाण्यामध्यें साखर जास्त आहे असं शास्त्रज्ञांचे मत आहे. आतां ही साखरकारखा-नदारी आम्ही उभी केली—ठीक आहे—आणि ज्यांनी महाराष्ट्रामध्यें साखर कारखानदारी प्रथम सुरू केली त्यांना मी धन्यवाद देणार आहे कोणी खाजगी व्यापार धंदेदारानीं ही गोष्ट केली म्हणून तर ती आम्हांला कळूं शकली—त्यांना तर आपण शाबासकी दिली पाहिजे—परंतु त्यांच्या हाताला हात धरून आतां पुढें व्यक्ति व्यक्तिंची मालकी आणि त्यांची जोखम ही बाकीच्या लोकांनी हाताशी घेतली पाहिजे. दहानी, पांचानी, शंभरानी, हजारानी एकत्र येऊन सगळ्यांच्या मालकीची कारखानदारी म्हणजे काय चीज आहे ते महाराष्ट्रांत उभे करायचे ठरले तर दहा पंधरा कारखाने उभे राहिले आहेत. त्यांतला एक कारखाना सांगलीच्या शिवारामध्यें मला पहावयास सांपडतो. एक अतिशय चांगली महत्वाची गोष्ट घडली आहे. या कारखानदारीच्या निमित्तानें एक महत्वाचा विचार शेवटी ह्या कारखान-

दारींतून आम्हाला करावयाचा आहे. ज्या ज्या भागामध्यें आम्ही ही कारखानदारी सुरू करतो त्या कारखानदारींतून शेतकरी समाजाचा जो प्रश्न आहे तो–हजार–बाराशें–पंधराशें दोन हजार–अडीच हजार, काय असतील ते साधारणतः या कारखान्याचे शेअर्स किंवा भागीदार आहेत. सहकारी कारखानदारी साधारणतः सरासरी हजाराची पडते, इथे दोन हजार ठीक आहे. चांगली गोष्ट आहे. या दोन हजार शेतकऱ्यांच्या ऊंसाचा भाव वाढेल, त्यांची शेती सुधारेल. पांच पंचवीस गांवातला हा दोन हजार शेतकरी सुखी होईल, पण त्याच्यावर ही जिम्मेदारी आहे असे मी सांगतो. ज्या गांवातला हा बागायतदार शेतकरी, भागीदार, कारखान्याचा मालक, शेतकरी सुखी होईल तो ज्या गांवचा असेल त्या गांवातला जिराईत शेतकरीही सुखी झाला पाहिजे. तसा प्रयत्न त्यानीं करण्याची जिम्मेदारी त्याचेवर आहे. कसं करतां येईल सांगतो मी आपल्याला. सहकारी साखर कारखान्याचा भागीदार असणारा शेतकरी आणखी पांच चार वर्षांनीं हजार दोनहजार रुपये मिळवत राहतील. हजार दोनहजार हा बारका हिशेब करतो कारण मला मोठा हिशेब करतां येत नाहीं. दहा पांच हजाराचा तो पांच चार वर्षांत मालक झाला पाहिजे. पण त्याचे ते दहा हजार रुपये किती तरी मार्गांनीं उपयुक्त करता येतील. ते दहा हजार रुपये, त्याच्या गांवच्या सहकारी सोसायटीमध्यें डिपॉझीट म्हणून ठेवले तर कर्जाकरिता, अडीअडचणीकरीतां त्या जिराईत शेतकऱ्याला त्याची मदत होईल. तोच पैसा जर सांगलीच्या बँकेत गेला तर मोठ्या सौद्याच्या व्यापाराला तो पैसा कदाचित उपयोगी पडेल. तो जिराईत शेतकऱ्याचा उपयोगी नाहीं पडणार. म्हणून दोन हजार शेतकऱ्यावर जिम्मेदारी आहे कीं दोन हजार शेतकरी, बागाईत शेतकरी, सुखी व्हावा म्हणून कारखाना उभा केला आहे. त्याने तर सुखी झालेच पाहिजे. पण त्याचे सुख पाझरत पाझरत जिराईत शेतीला पोहचले पाहिजे. तुमच्या शेतीला महाराष्ट्रांतले पाणी मिळाले म्हणून तुमची शेती मोठी होणार आहे. पण ज्या शेतीला पाणी मिळत नाहीं त्यांना तुमचे प्रेम, सहकार्य, तुमची साथ मिळाली पाहिजे. हा सहकारी कारखानदारीचा अर्थ आहे. कारखान्यासाठीं सहकार्य आणि बाकीच्या बाबतींत सहकार्य नाहीं अशी नाहीं वृत्ति होवूं देता कामा. साखर

निर्माण करण्याकरीतां सहकारी तत्व निर्माण केले आहे. याचा अर्थ आमचे सबंध जीवन सुखी करण्याकरितां ती संधी शेतकरी मानतात; हा जो मानव समाज आहे, त्यानें एकमेकाची साथ एकमेकाला दिली पाहिजे. आणि एक प्रकारचे नवजीवन मानले पाहिजे. हे नुसते शब्द नाहीत. आता ती नुसती भावना नाहीं. आतां तो दररोजचा कार्यक्रम झाला पाहिजे. विचार करा कीं मी जे करतो आहे हे माझे करण्यांतला माझा जो कोणी साथी होणारा असेल; कदाचित दुसऱ्या कामासाठीं तो माझ्याशी भांडला असेल; कदाचित त्याच्या डोक्यावर दुसऱ्या रंगाची टोपी असेल; कदाचित तो हातांत दुसरे निशाणही नाचवत असेल. मला नाही त्याची पर्वा, परंतु तो माझे गावांत माझे शेती शेजारी, शेती करणारा माझा भाऊ, माझा चुलता, माझा मित्र, माझा शेजारी ही जी भावना आहे, त्या भावनेंत माझी मदत त्याला मिळते किंवा नाहीं ? त्याचा संसार सुखी करण्याकरितां ही सहकार्याची भावना आपण निर्माण करूं शकलो तरच आपण शेतकरी कारखाना सहकारी काढला याचा अर्थ आपल्याला समजला जाणार आहे; आणि म्हणून ही एकप्रकारची जिम्मेदारी या कारखान्याचे निमित्ताने आपल्यावर आहे, असा त्याचा अर्थ. मला आनंद आहे या गोष्टीचा कीं वसंतरावांनी एक जीं विधायक स्वरूपाची कामगिरीची दृष्टी घेतली, दक्षिण साताऱ्यांत निर्माण केली आहे. त्यांच्याबरोबर त्यांचे साथी, सहकारी मित्र–हे वाढवत राहतील. एक मनुष्य निर्धारानें–निश्चयानें–इतरांचे प्रेम बरोबर घेऊन काय करूं शकतो. कारखानदारीची छोटी गोष्ट आहे. माझी तर अशीच खात्री आहे कीं–सहकार्य जर त्यांच्या मित्रांनी व दक्षिण सातारा जिल्ह्यांतील सर्व मंडळींनीं–सर्व पक्षांतील मंडळीनीं दिले तर दक्षिण आणि उत्तर महाराष्ट्रांतील बाग फुलवायला वसंतरावासारखी कितीतरी माणसें तयार होतील. अशा माणसांची आज महाराष्ट्राला जरूर आहे. नवीन कर्तबगारीनें काम करणाऱ्या माणसांची महाराष्ट्राला जरूरी आहे. माणसांची यादी तयार करावी लागत नाहीं. मिळत जाते ती.–प्रश्न असा कीं ही जोखीम मनावर घेऊन जोखीम पार पाडण्याची जबाबदारी, विश्वास तयार करूनही ती पार पाडणारी माणसें मिळणें अतिशय अवघड आहे. आणि अशा तऱ्हेच्या माणसांची महाराष्ट्राला

जरूर आहे. त्यांतून ही सहकारी खारखानदारी म्हणजे असे मी मानीन कीं माणसे अशा तऱ्हेची निर्माण होण्याची एकप्रकारची शाळा उभी करण्याची जबाबदारी घेतली आहे. आतां पावेतो कारखाना चालविणारांना दोष देणे सोपे होते. आतां कारखाना चालविण्याची जबाबदारी आपण घेतली आहे. कारखानदारी म्हणजे भांडवलशाही नव्हे. आता आपण असे शिकूं लागलो कीं कारखानदारीमध्यें सहकार्य असूं शकते. पण सहकार्य केल्यानें पुरे होत नाहीं–तर ती केलेली सहकारी कारखानदारी चालविण्याची जिम्मेदारी आतां आपणावर आली आहे. इथे पडणारा ऊंस– आणि त्याची साखर–या दोन वेगळ्या वस्तु आहेत–त्या दोन वेगळ्या वस्तूंच्या मागें वेगवेगळे व्यवहार आहेत. एकदा साखर निर्माण झाली कीं नव्या जमान्याच्या बाजार पेठेशीं संबंध निर्माण होतात. पण येथें येणारा ऊंस, येथें येऊन त्याचें साखरेंत रूपांतर होण्यापूर्वी शेतांच्या कामाशीं त्याचा सर्व संबंध असतो. दोन वेगळ्या वस्तु व दोन कार्यपद्धतीशीं संबंध असतो. आणि या दोन बाबीशीं संबंध ठेऊन कार्य करण्याची, शिस्तीनें जबाबदारी घेणें जोखमीचें काम आहे, जबाबदारीचें काम आहे. मला अशी खात्री आहे कीं इथल्या अनुभवानें निर्माण होणारीं माणसें तीं कामे चांगल्या-तऱ्हेनें व यशस्वीरीतीनें पुरी करतील.

◆◆◆◆

---

शिक्षण सहकार, शेती व आरोग्य या खात्यांवरील जबाबदाऱ्या, लोककल्याणकारी राज्यांत वाढल्या आहेत. या खात्यांच्या कामांना जोपर्यंत प्राधान्य मिळत नाहीं तोपर्यंत ते खरें लोककल्याणकारी राज्य झाले असें मानतां येणार नाहीं. या खात्याच्या अधिकाऱ्यांनीं आत्मविश्वासानें वागण्याचा व उपक्रमशीलता दाखविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

क्र. १०८४९

# भूदान

श्री. यशवंतराव चव्हाण यांनीं पू. विनोबांना ५ हजार रुपये संपत्तिदान केले. त्यांचे मित्रानें विचारलें, "विनोबांना परवां आपण पैशाचे रुपाने अल्पस्वल्प हातभार लावला हे ठीक आहे. पण त्यांनी चालविलेल्या कार्यामुळें भारताची उन्नती होईल यावर आपला विश्वास बसतो काय ?"

यावर यशवंतराव म्हणाले "हो! बसतो कीं, प्रथम तुम्ही असा विचार करा कीं त्यांनीं जे कांहीं कार्य चालवलं आहे ते वाईट आहे कां ? त्यांत कुणावर जुलूम होतो कां ? हिंसा कुठं केली जाते कां ? अविचार घडतो कां ? जर यापैकीं कांहींच घडत नसेल तर तें कार्य चांगलं आहे असं लोकांनीं कां मानूं नये ? त्यांचं कार्य दानावर आधारलेलं आहे, आणि दान हे देणाऱ्याच्या मर्जीवर अवलंबून असते. ज्याच्या त्याच्या इच्छेनं घडणारी ही गोष्ट आहे. देशांत प्रचंड गोरगरीब वर्ग आहे. दान देणाऱ्यांच्या संख्येपेक्षां दान घेणारांचीच संख्या अधिक आहे. भारत देश दीन दुबळा आहे. विनोबाजींच्या कार्यानें संपूर्णपणें हा प्रश्न मिटेल असं जरी नसलं तरी पुष्कळ गरीबांना सुख मिळूं शकेल. म्हणून मला हे कार्य आवडतं ! मी तर व्यक्ति या नात्यानं या कार्याशी सहमत आहेच पण माझं

सरकारसुद्धां या कार्याशीं सहमत राहील. एवढेंच नव्हे जेव्हां विनोबाजी महाराष्ट्रांत येणार आहेत त्यावेळीं मी स्वतः त्यांच्या स्वागतासाठीं जाणार आहे. मला त्यांच्याबद्दल आदर वाटतो. " त्या मित्रानें प्रश्न केला, "तुम्ही विनोबाजीना धन दान केल्याचं समजलं पण तुम्ही भूदान केलं नाहीं अजून? कारण विनोबा म्हटलं कीं 'भूदान' हा शब्द शाळेंतील लहान पोरंसुद्धां उच्चारतात. तेव्हां भूदान करण्याला अधिक महत्त्व आहे. म्हणून तुम्ही भूदान केलं असतं तर बरं झालं असतं असं आपलं मला वाटतं!"

यशवंतराव थोडा वेळ स्तब्ध राहिले, गालांतले गालांत हंसले व मान हलवीत म्हणाले, "मला भूदान करतां आले असते तर बरें झाले असते असें तुमच्याप्रमाणें मलाहि वाटतें पऽऽण "

"पण काय?"

"त्याचं असं आहे ज्याचे जवळ 'भू' असेल त्यानंच दान करावयाचं. मी तर भूमीहीन माणूस आहे. एक आणा सुद्धां सरकारी सारा मी भरत नाहीं. मग मी भूदान कसं करणार बरं?"

◆◆◆◆

# हिंदुस्तानला जगण्याचा एकच मार्ग ‘समाजवाद’

“देशांत समाजवाद आला नाहीं तर लोकशाही राहूंच शकणार नाहीं आणि हिंदुस्तान जगूंहि शकत नाहीं. जे समाजवाद नको असे म्हणतात त्यांना स्वतःला तरी बदलावें लागेल किंवा समाज तरी बदलला पाहिजे. निरनिराळ्या राजकीय पक्षांनी ही समाजवादाची दृष्टि ठेवली नाही तर त्यांना बाजूला व्हावे लागेल” असे उद्गार मुंबईचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनीं कोल्हापूर येथें शिवाजी उद्यमनगरांत काढले. कोल्हापूर शहरांतील अल्प बचत पंधरवड्याचे उद्घाटन मुख्य मंत्र्यांच्या हस्ते झाले. या निमित्त शिवाजी उद्यम नगरांतील उद्यम नगर सोसायटीच्या ऑफिससमोर भरलेल्या जाहीर सभेत हे भाषण झाले.

***

मुख्य मंत्री आपल्या भाषणांत म्हणाले, “ तुम्ही आपले बचत लक्ष्य निम्मे आधींच पुरें केले आहे हे ऐकून आनंद झाला. सुरवात चांगली झाली म्हणजे निम्मे काम झाले असे म्हणतात. तुम्ही तर सुरवातच निम्मे काम पुरे करून केलेली आहे. यामुळें तुम्ही तुमच्या कामांत संपूर्णपणें

यशस्वी व्हाल अशी खात्री वाटते. अल्प बचतीला मुंबई राज्यांत विशेष महत्त्व आहे. आपले राज्य नेहमीच प्रगतीच्या आघाडीवर राहिलेले आहे. आणि याही आघाडींत ते पुढें राहील यांत संशय नाहीं. अल्प बचतीचा अक्षरशः रुपये आणे पैत फायदा आहे हे आपण सर्वांना पटवून दिले पाहिजे. आपल्या ज्या निरनिराळ्या योजना आहेत त्या पुऱ्या करण्यासाठीं जीं साधनें लागतात, जी जुळवाजुळव करावी लागते त्यासाठीं गुंतवणुकीची जरूरी आहे. आपल्या देशाची दुसरी पंचवार्षिक योजना साडे चारशे कोटी रुपये खर्चाची आहे. आपण लोकशाही मार्गाने ही योजना पुरी करणार अशी भरारी मारत असतो. पण भरारी मारतांना त्यांना पख हवेत हें विसरून चालणार नाहीं. पंख नसतील तर कार्यभागच आटपेल.

अल्प बचत हे एक महत्वाचे साधन आहे असे सांगून मुख्य मंत्री म्हणाले “ देशाच्या दुसऱ्या योजनेपुढें अनेक संकटे आली. त्यांतील कांहीं अंतर्गत होती तर कांहीं परकी हुंडणावळीच्या कमतरतेमुळें निर्माण झाली. यासाठीं योजनेचा व्याप कमी करा असे कांहीं लोक सांगू लागले. सरकारलाहि अपरिहार्य म्हणून थोडा व्याप कमी करावा लागला. मी माझा दोन वर्षांचा अनुभव म्हणून सांगतो कीं नियोजन मंडळ आम्हाला योजना कमी करा असे सांगे. जेव्हां आम्ही ती कमी करणार नाहीं असे म्हणू, तेव्हां मंडळ म्हणे हरकत नाहीं. मात्र आम्हीं तुमची मदत कमी करूं. मदत कमी झाली तरीहि आहे तीच योजना राहूं द्या असे आम्ही सांगितले. ही हिंमत, ही शक्ति कशाच्या जोरावर अवलंबून आहे ? यासाठीं साधनांची आवश्यकता आम्ही पुरी करूं असे आम्हाला वाटले म्हणूनच ते शक्य झाले. यासाठीं राज्याची प्रकृती आम्हाला पाहावी लागते ही एक गोष्ट आणि दुसरी म्हणजे समाजांत विकासाची शक्ति व यंत्रणा आहे काय ही दुसरी कसोटी. सुदैवानें मुंबई राज्यांत या दोन्हीहि गोष्टी आहेत. कांहीं वेळा हें गृहित धरूनच आम्हाला पुढें जावे लागते. बचत योजनेचे काम त्या दृष्टीने फार महत्वाचें आहे. ”

## पुढे गेलो नाहीं तर सर्वनाश ओढवेल

ते पुढे म्हणाले, सध्या देश एका महत्वाच्या संधिकालांतून जात आहे. पहिली योजना चालू असलेल्या कामांची एक यादी तयार करून थोडी

इकडे तिकडे साफसुफ करून आंखली गेली. त्यांत हेतू-उद्दिष्ट यांना अग्रहक्क लावण्याचा प्रयत्न नव्हता. तिच्या मागे एकाद्या विशिष्ट विचाराची प्रतिक्रिया नव्हती. कामांना एक प्रकारचा वेग मिळावा एवढीच त्यावेळीं इच्छा होती. दुसरी योजना ही खऱ्या अर्थाने लहान मूल चालण्याचा प्रयत्न करते त्या प्रकारची आहे. मात्र तिसऱ्या योजनेच्यावेळीं आपणाला खंबीरपणानें पाऊल टाकावे लागणार आहे. चाचपडून चालणार नाहीं. ज्याप्रमाणें विमानतळावरून विमान सुटतांना त्याला भरपूर वेग दिला जातो आणि मग ते जमीन सोडून वर उडू लागते तशी स्थिती आज आपली आहे. वेग दिलेला आहे आणि आतां उंच उडलेच पाहिजे. वेग देऊन विमान आपल्या जमिनीवरील मार्गाचे टोकाला गेले आणि उडले नाही तर सर्वनाश होईल. वैमानिक व आंतील सर्वच जण ठार हातील. तशीच आज आपली परिस्थिती आहे. आपण पुढें गेलो नाहीं तर त्या विमानाप्रमाणेंच आपलीहि गत होईल. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस आपल्या आर्थिक रचनेची हीच परिस्थिती आहे. कोणत्याहि राजकीय पक्षाचे तुम्ही असा, तुम्हाला या परिस्थितीचा विचार केलाच पाहिजे. गती दिली नाहीं तर लोकशाही टिकणार नाहीं. ह्या पायांतच समाजवादाचे उद्दिष्ट आहे. आज देशांत ही वृत्ती दृष्टीस पडते आहे. स्वराज्य प्राप्तीच्या आधी आपण सर्वजण मतभेद विसरून स्वातंत्र्यासाठीं लढलो. आतांहि समाजवादाच्या प्रस्थापनेसाठीं त्याचा पाया असलेल्या योजना यशस्वी करण्यासाठीं झटले पाहिजे. आज सर्वच पक्ष समाजवाद मान्य करूं लागले आहेत. 'समाजवादी' म्हणवून घेतले नाहीं तर सारी हवाच निघून जाते. अशा प्रकारच्या महत्वाच्या कालखंडातून आपण आज ज़ात आहोत आणि यावेळीं आपणाला दुसरे कांहीं करता आले नाहीं तरी कमीत कमी बचत योजनेला सहाय्य करा. प्रत्येक व्यक्तीला बचत करता येणार नाहीं हे मलाहि मान्य आहे. असा एक वर्ग आहे कीं त्याला कांहीं बचत करता येणेंच शक्य नाहीं. पण ज्यांना शक्य आहे त्यांनीं खुषीने बचत केली पाहिजे. आणि जर तसे होत नसेल तर ती सक्तीनें केली पाहिजे. विकासाची कामे व्हावयाची असतील तर त्याच्या मागें संचयाची शक्ति पाहिजे."

## संचयाची शक्ति

सांचलेलें धन व त्याची शक्ति आपण निर्माण करूं शकलो नाहीं तर विकासच होणार नाहीं. कोणत्याहि प्रकारची समाजरचना असली तरी प्रगतीसाठीं संचयाची शक्ति आवश्यक असते. अमेरिकेसारखी संपूर्ण भांडवलशाही समाजरचना असली तरी तेथें पुढच्या विकासासाठीं संचय करावाच लागतो आणि समाजवादी समाजरचनेलाहि संचयाची शक्ति आवश्यक आहे. भांडवलशाहींत व्यक्तिगत संचय असू शकेल, समाजवादांत तो समाजाच्या मालकीचा समाजाच्या हितासाठीं खर्च होणारा संचय असेल. हाच फरक फक्त राहील. पण संचय करण्याचे मूलभूत तत्व दोन्हीहि ठिकाणीं आहे. हेतूत बदल तेवढा मूलभूत फरक आहे. ही दृष्टी समाजाच्या मनावर बिंबली तर संचय वाढविणें अवघड नाहीं. आपणाला पुढचा काळ कठीण येणार आहे हे निश्चित समजून राहिले पाहिजे. अडचणी या येणारच. पण प्रसूतीच्या वेदना जशा होतातच आणि दुःखांत सुख आपण शोधत असतो. त्याप्रमाणे आपण संकटे येणार म्हणून गांगरून न जातां पुढें गेले पाहिजे.

देशांत नवीन उद्योगधंदे निर्माण करण्याची शक्ति आपण निर्माण करीत आहोत. गेल्या दहा वर्षांत आपले अन्न धान्याचे उत्पादन वाढलेले आहे. पण तरीहि टंचाई भासते आहे. याची दोन कारणें आहेत. एक म्हणजे खाण्याची तोंडे वाढली आहेत. ती कशी बंद करायची ते तुम्ही ठरवा. दुसरी गोष्ट मात्र हेतू पुरस्सर होत आहे. ती म्हणजे लोकांचे जीवनमान वाढलेलें आहे ही गोष्ट चांगली आहे. सरकार जर चुकत असेल तर जरूर दोष द्या. चुकले तर प्रायःश्चित भोगलेच पाहिजे या मताचा मी आहे. सध्याचा कालहि बदललेला आहे. चुका झाल्या तर त्याबद्दल लगेच शासन मिळते हा लोकशाहीचा सिद्धांत आहे. पण लोकांत कर्तव्याची जाणीव करून दिली पाहिजे. लोकांना माहिती देण्याची ज्या दिवशीं जरूरी भासणार नाहीं त्या दिवशीं योजना स्वीकारण्यास देश तयार झाला असे मी म्हणेन.” (१६।२।५९)

# कृष्णा कोयनेच्या स्मरणानें

दुनियेंत मी कोठेंही असलों तरी कृष्णा–कोयनेची व घराची मला आठवण येते. कराडचा भाग्योदय होत आहे. त्या ईश्वरी संकेताला मदत करण्याचे कार्य ती करत आहे. कराडांत पॉलिटेक्नीक संस्था निघत आहे. त्या संबंधीच्या टीकेला मी पूर्वी उत्तर दिलेले आहे. कऱ्हाडलाच सुरू करण्याचा सरकारी निर्णय आधींच घेण्यांत आला होता. कऱ्हाडचे भाग्य होतें. त्याच्या आड मी कसा येणार? ईश्वरी संकेताला मी विरोध कसा करणार? फार तर त्या संकेताला मी हातभार लावला आहे एवढेंच. कांहीं माणसें अशी असतात कीं, चांगली कामें होत नाहींत म्हणून दोष देतात व ती होऊं लागली तरीहि दोष येतोच. दुनियेचे भाग्य असें कीं, वाकड्या विचाराची माणसें फार थोडी असतात. पूजा ही नेहमीं चांगल्या गोष्टीची, सत्याची-न्यायाची होत असते. अन्यायाचा व द्वेषाचा विजय कधींच होत नसतो. ‘ सत्यमेव जयते ’ हें आपल्या राज्याचे ब्रीद आहे. यापूर्वी शाळांच्या उद्‌घाटनांचे समारंभ मी केले आहेत. पण त्या शाळा व ही शाळा यांत फरक आहे. पूर्वीं शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठीं चळवळ झाली. समाज शहाणा व्हावा यासाठींही बरेच प्रयत्न झाले.समाज शहाणा झाल्याविना त्यास राज्यकारभार कसा चालला आहे हें समजणार नाहीं. शाळा मास्तर, तलाठी यांच्या नोकऱ्या मिळण्यासाठीं शिक्षण घेण्याचा हेतू होता; पण

आतां तो विचार बदलला पाहिजे. आपणास जें स्वराज्य मिळालें आहे तें थोड्यांसाठीं नाहीं. समाजाला मोठें होण्यासाठीं तें आहे. कऱ्हाडच्या आंवती भोवती नजर टाकली तर येथें विशेष कांहींतरी होत आहे हें दिसून येईल. कोयनेपासून वीज निर्माण होणार आहे. तिजपासून अनेक कारखाने निघतील; पाण्याचा उपयोग शेतीसाठींहि होईल. नदीचें पाणी नुसते वाहून जाता कामा नये. शाळा काढल्या जात आहेत. मातांची दुःखें कमी होण्यासाठीं प्रसूतिगृहांची योजना होत आहे. बालसंगोपनाच्या संस्थाही निघत आहेत. उद्यमनगरला शास्त्रीय कॉलेज निघणार आहे. तेव्हां उद्यमनगरला विद्यानगरचे स्वरूप प्राप्त होणार आहे. विद्येची उपासना सर्वांनी करावी, विद्येशिवाय सर्व उद्योग आंधळा आहे.''

(कराड पॉलिटेक्निक संस्था उद्‌घाटन)

••••

# दहा वर्षांपूर्वी व आज

***

**" परतंत्र भारत आणि स्वतंत्र भारत यांच्या जीवनाचा दर स्वातंत्र्यदिनाचे प्रसंगाने आपण आढावा घेतो. या छोट्याशा भाषणांत १५ ऑगस्ट १९५७ रोजी श्री. यशवंतराव चव्हाण यांनी घेतलेला आढावा वर्षांनुवर्षें मार्गदर्शक ठरेल असा आहे. "**

***

भारतामध्यें यंदाचें वर्ष हें अनेक कारणास्तव ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचें असें वर्ष आहे. या प्रसंगी केवळ भूतकाळांतील घटनांचें स्मरण होते म्हणूनच नव्हे तर भविष्य कालीन गरजांकडे आपलें लक्ष वेधलें जात असल्यामुळें त्याचे महत्व आहे. आजचा प्रसंग आनंदोत्सव साजरा करण्याचा आहे तसाच तो आपण अंतर्मुख होऊन परिश्रम करण्याचा, अधिक त्याग करण्याचा आणि मानवजाती विषयींचें आपलें कर्तव्य पार पाडण्याचा निश्चय करण्याचाहि प्रसंग आहे.

आपणा सर्वांना माहितच आहे कीं, नेहमीच्या १५ ऑगस्टच्या उत्सवाबरोबरच या वर्षीं आपण पहिल्या स्वातंत्र्य समराचा शताब्दिउत्सव साजरा करीत आहोंत. परकीय गुलामगिरीचें जोखड झुगारून देण्यासाठीं आणि आपल्या–देशाचें स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व प्रस्थापित करण्यासाठीं आपल्या

पूर्वजांनी केलेल्या पहिल्या प्रयत्नांचा विचार आपल्या मनात या प्रसंगी येणे अगदीं स्वाभाविक आहे. त्यावेळच्या परिस्थितीनुसार त्यांनी स्वीकारलेले मार्ग त्यानंतरच्या काळांत आम्ही स्वीकारलेल्या मार्गाहून भिन्न असतील. परंतु त्यांची प्रेरणा एकच होती—ती म्हणजे आपल्या मायभूमीचें स्वातंत्र्य आणि एकात्मता आणि स्वतःच्या मार्गाने तिचा विकास करण्याचा हक्क.

१८१८ सालीं शेवटच्या पेशव्याचा पाडाव झाला आणि त्याचबरोबर लोकांची जवळजवळ अखेरची आशा मावळली. याचा परिणाम असा झाला कीं, लोकांमध्यें परकीय सत्ता उलथून पाडण्याची तीव्र जाणीव निर्माण झाली. याचवेळीं गुलामगिरी झुगारण्यासाठीं करावयाच्या बंडाची ठिणगी पडली. लढ्याचे हे निखारे सतत धगधगत होते. शेवटीं १८५७ मध्यें उत्तरेमध्यें जी ज्वाला पेटली ती नंतर सबंध देशभर पसरली. देशाच्या निरनिराळ्या भागांत, निरनिराळ्या गटाच्या आणि जमातीच्या लोकानी समान ध्येयासाठीं हात मिळवणी केली. ज्या ऐक्याचें आणि सहकार्याचें त्यांनी दर्शन घडविले तें ऐक्य आणि सहकार्य आज आपण अधिक बळकट आणि पूर्ण करीत आहोंत; या लढ्यांत मुंबई राज्यांतील लोकांनीही आपला वाटा उचलला. सातारा, कोल्हापूर, बडोदें, आणि छोटा उदेपूर येथील घटना याची साक्ष आहेत.

त्यावेळच्या राजाजवळ असलेली साधनें वरचढ ठरल्यामुळें कालांतरानें हा उठाव दडपला जाणें अटळ होतें. परंतु एका कविनें म्हटलें आहे कीं, "स्वातंत्र्याची लढाई, मधून मधून थांबल्यासारखी दिसली तरी अखेर जिंकली जातेच" त्याप्रमाणें जसजशीं वर्षे जात होती तसतशी नवनवीन आकार आणि रूप घेऊन स्वातंत्र्याची लढाई चालूच होती. तीन तपांच्या अवधींत कॉंग्रेसचा जन्म झाला आणि स्वातंत्र्यासाठीं लढा देत असतानांच तिनें आपलें धोरण, मार्ग आणि पक्षघटना बदलली. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत भारतीय इतिहासामध्यें अत्यंत आदरणीय आणि लोकप्रिय ठरलेले असे लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी या दोन महान् व

प्रभावी नेत्यांचा उदय झाला. त्यांनीं आपल्या आचारांत आणि विचारांत क्रांति घडवून आणली. त्यांच्या शिकवणीचें स्वरूप केवळ राजकीयच नव्हें तर नैतिक आणि विश्वव्यापी होते आणि त्यांच्या शिकवणीनें आपण अधिक चांगली माणसें बनलो. त्यांच्या आणि त्यांचे मागून आलेले इतर नेते- ज्यामध्यें आपले आजचे पंतप्रधान अग्रभागीं आहेत, यांच्या स्फूर्तिदायक आणि अचूक नेतृत्वाखालीं आपण आपलें ध्येय–शिखर गांठले. जवळ जवळ या सबंध कालावधींत मुंबई हें या चळवळीचें मुख्य केंद्र बनलें होतें.

महान् स्वार्थत्यागाची आवश्यकता असलेला असा हा प्रदीर्घ संग्राम होता. आणि हजारों कर्तृत्वसंपन्न तरुण स्त्री-पुरुषांनी प्राणपणाने त्यामध्यें उडी घेतली. राष्ट्रीय नेत्यांना तुरुंगांत टाकण्यांत आले परंतु तुरुंगांतूनहि त्यांच्यापासून लोकांना स्फूर्ति व मार्गदर्शन मिळत राहिले. आणि जवळजवळ प्रत्येक व्यक्तीनें आपला मुलगा, मुलगी, भाऊबहिण किंवा जवळच्या इतर नातेवाईकांचे बलिदान करून देखील स्वातंत्र्याची पेटलेली ज्योत तेवत ठेवण्याचा प्रयत्न केला. आजच्या मंगल–दिनीं आपण त्या सर्व अमर हुतात्म्यांना वंदन करतो आणि भारताच्या त्या हुतात्म्यांचें त्यांच्या कुटुं- बियांना जें स्मरण होतें त्यांत आपण सर्व सहभागीं होतो.

परंतु हा सर्व स्वार्थत्याग अत्यंत योग्य असाच होता. कारण त्यामुळें स्वातंत्र्य प्राप्तीचें आपलें ध्येय सिद्ध झालें. एवढेंच नव्हे तर त्यामुळें आप- ल्याला कायम स्वरूपाचें असें जे कांहीं धडे मिळालें आहेत त्यांचा भार- ताचें नागरिक आणि विश्वकुटुंबाचे एक सदस्य या नात्यानें आपल्याला विकास साधण्याचें कामीं मदत होईल.

स्वातंत्र्य मिळतांच आपले प्रयत्न संपलेले नाहीत तर उलट एका अर्थानें ते सुरू झाले आहेत. आपल्याला मिळालेल्या राजकीय स्वातंत्र्याचा उपयोग करून आपणाला दारिद्र्य, रोग आणि अज्ञान यापासून मुक्त व्हावयाचे आहे आणि इतर मूलभूत स्वातंत्र्ये प्राप्त करावयाची आहेत. या सर्वांच्या प्राप्तीनंतर आजच्या आपल्या राजकीय स्वातंत्र्याला खराखुरा अर्थ येईल. परंतु हें महान् कार्य कोणाहि एका अद्वितीय व्यक्तींकडून

किंवा एखाद्या कर्तृत्ववान गटाकडून होण्यासारखे नाहीं तर ते संबंध राष्ट्राला प्रत्येक व्यक्तीला मग ती स्त्री-पुरुष किंवा मूल कोणीहि असो, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत, करावयाचे आहे. कारण आपली ही भारतभूमी भविष्य-काळी कशी असावी हे त्या सर्वांच्या कार्यावर व वागणुकीवर विसंबून आहे. भूतकाळांत केलेल्या त्यागाच्या व प्रयत्नांच्या पायावर जर आपण राष्ट्र-मंदिराची उभारणी केली नाहीं तर तो त्याग आणि ते प्रयत्न विफल ठरतील. स्वातंत्र्याचे खरें फळ म्हणजे एखाद्या व्यक्तीचा वा गटाचा अल्प स्वल्प लाभ नव्हे तर संबंध समाजाचे जास्तींत जास्त कल्याण होय. हें यासाठींच समजून घेतलें पाहिजे.

कायद्याचा अंमल देशांत चालावा म्हणून आज आपण प्रयत्न करीत आहोंत. निरनिराळ्या देशांच्या घटनेंतील उत्तमोत्तम गोष्टींचा अंतर्भाव करून आपण आपली घटना तयार केली आहे. प्रश्न आहे तो घटनेवरील उदार व लोकशाही प्रधान तरतुदी आणि लोकांचे प्रयत्न यांचा मेळ घालण्याचा.

वर्षानुवर्षें दुर्लक्षिल्यामुळें आज आपण आर्थिक दुरावस्थेला पोंचलो आहोत. आपली सुधारणा करण्याच्या कुठल्याहि नियोजनाला आपल्या सर्वांच्या आत्यंतिक परिश्रमांची गरज आहे. पण हे परिश्रम अधिकारावर असणाऱ्या व्यक्तींच्या हुकुमाने नव्हे तर स्वयंस्फूर्तिने व स्व-इच्छेने केलेले असावेत. याची कारणे दोन आहेत. एक म्हणजे अशी सक्ती करणें अयोग्य आहे आणि दुसरें म्हणजे आपल्या सरकारच्या लोकशाही प्रधान रचनेने अधिकारपदांवर असणाऱ्या व्यक्तींना सक्ती करण्याचे अधिकार दिलेले नाहीत. पण आमचा आमच्या जनतेवर व लोकशाही संस्थांवर विश्वास आहे. शांती, त्याग आणि सहनशीलतेची आमची गेल्या हजारो वर्षांची परंपरा अशी वाया जाणे शक्य नाहीं. आपल्या घटनेप्रमाणें कर-ण्यांत आलेला कायदा आणि त्याचें कार्य करणारीं कायदे मंडळें या संबं-धीच्या लोकांच्या वर्तनावरून त्यांच्या उच्च बुद्धिमत्तेची कल्पना येऊं शकेल.

लोकशाही तत्वावर आधारलेल्या कायदेमंडळाचें कार्य कसें सुरळीत-पणें पार पडूं शकते याचें ताजे उदाहरण म्हणजे आपल्या मुंबई राज्यांतील

नुकतीच झालेली कायदेमंडळाची बैठक होय. दोन्ही कायदेमंडळांत निवडून आलेल्या सदस्यांतील मतभेद लक्षांत घेतां त्यांच्यांत गुद्दागुद्दी होईल अशी कांहींना भीति. भव्य दिवाणखान्यांत उठलेले आवाज गुद्दा-गुद्दीचे नसून जनतेच्या प्रतिनिधींनीं राज्याच्या कारभारासंबंधी केलेल्या चर्चेचे होते. पुष्कळ बाबीसंबंधी त्यांच्यांत समंजसपणाची, मेळ घालण्याची, तडजोडीची व एखादी गोष्ट समजून घेण्याची वृत्ति दिसून आली. या संबंधी बोलतांना विरुद्ध पक्षाच्या अभिनंदनीय सहकार्याच्या भावनेचा मला उल्लेख करावासा वाटतो. ही खरी लोकशाही प्रवृत्ति होय. या भावनेनें प्रेरित होऊनच समृद्ध भारताच्या उभारणीसाठीं आपण विचार व कार्य करावयास पाहिजे. कायदेमंडळाच्या कामकाजांत लोकांनीं जो उत्साह दाखविला त्यावरून त्यांची कायदेमंडळाचे कार्य व त्यांत करण्यांत येणारे कायदे यासंबंधीची आस्था दिसून येते. हे खरोखरच शुभ चिन्ह असून ही भावना कायम राहून वाढीस लागली तर आपल्या देशांतील लोकशाहीच्या भवितव्याची चिंता करण्याचें कारण उरणार नाहीं.

त्याचबरोबर नवभारताच्या उभारणीकरितां आपण सर्वांनीं सर्वतोपरी झटावयास पाहिजे. हें कार्य सहज साध्य नसून तें झटपटहि करतां येणार नाहीं. या दिशेनें आपल्या होणाऱ्या प्रयत्नांच्या गतीमुळें आमच्या मार्गांत कांहीं अडचणी निर्माण झाल्या याची आपणाला कल्पना आहेच. पण प्रधान मंत्र्यांनीं म्हटल्याप्रमाणें ही घटना आमच्या विकासाचें लक्षण असून आपण ज्या उत्कर्षाप्रत जाऊं इच्छितों, त्याबद्दल द्यावा लागणारा मोबदला असून आपण तो दिलाच पाहिजे. पुष्कळ वेळां एखादा रोगी बरा होण्या-पूर्वीं रोग विकोपाला जाऊन अखेर तो बरा होतो. याला उत्तर एकच आणि तें म्हणजे या तात्पुरत्या अडचणींना खंबीरपणें तोंड देऊन धैर्यानें पुढें पाऊल टाकणें. आणि असें करतांना हें पाऊल आपल्या इच्छित ध्येयाकडेच नेणारे आहे याबद्दल निश्चिति बाळगणें. याप्रमाणें पुढें पाऊल टाकून आणि प्रत्येक गोष्टीला निश्चयानें तोंड देऊन या तात्पुरत्या अडचणीं-तून मार्ग काढतां येईल. याकरितां ईश्वर आम्हाला सामर्थ्य देवो.

◆◆◆◆

# महाराष्ट्रांत अमर राष्ट्रनिष्ठा

"प्रतापगड समारंभाच्या निमित्तानें कॉंग्रेस विजयी झाली कीं संयुक्त महाराष्ट्र समिती विजयी झाली असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत परंतु त्याबाबत मला येवढेंच सांगावयाचें आहे कीं कोण कोठें विजयी झाले हें पहाण्याचें ठिकाण प्रतापगड नसून इतरत्र आहे. ज्या शिवछत्रपतींनीं राष्ट्राला इतिहास आणि संस्कृति दिली त्या शिवछत्रपतींच्या पवित्र पुण्याईलाहि मागें टाकून पुढें जाण्याचा अहंकार समितीनें उराशी बाळगला होता; परंतु प्रतापगडावरील मंगल सोहळ्यानें हेंच सिद्ध झाले कीं शिवछत्रपतींचे नांव अजरामर असून मोठें आहे. इतर कोठल्याहि निष्ठेपेक्षां राष्ट्रनिष्ठाच अधिक तेजस्वी आहे हेंच प्रतापगडावर दिसले. प्रतापगडावर समारंभानें महाराष्ट्राचा आत्मा राष्ट्रनिष्ठेच्या बाहेर गेला नाहीं हेंच दिसून आलें आणि हें चित्र महाराष्ट्रांतील कॉंग्रेस कार्यकर्त्यांना भूषणावह आहे. प्रतापगड समारंभाच्या वेळीं एक राष्ट्रनेता दुसऱ्या एका राष्ट्रनेत्याबद्दल आदर प्रकट करण्यासाठीं येत होता. अशा या मंगल समारंभाला अपशकून करण्याचा घाट समितीनें आंखला होता. परंतु महाराष्ट्रांतील विचारी आणि जागृत जनतेनें विचार करून समारंभ यशस्वी करण्यास सहकार्य दिलें. महाराष्ट्रांतील सर्व कॉंग्रेस कार्यकर्त्यांनीं समारंभ यशस्वी करण्यास तळमळीनें सहकार्य दिले याबद्दल महाराष्ट्रांतील जनतेस आणि कॉंग्रेस कार्यकर्त्यास मी धन्यवाद देतो. समितीनेहि शिस्त आणि संयम राखण्याचे सौजन्य दाखविले याबद्दल समितीच्या मंडळीसही मी धन्यवाद देतो."

( यशवंतराव–प्रतापगड स्मारक समारंभ )

◆◆◆◆

# उच्च शिक्षण आणि जनता

***

**विश्वविद्यालयांतील उच्च शिक्षणामधील आजच्या समस्या कोणत्या, त्यांचे स्वरूप काय आणि त्यावरची उपाययोजना कोणती याचा विचार, अलिगड विद्यापीठाच्या पदवीदान समारंभ प्रसंगी मुख्य पाहुणे म्हणून श्री. यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या भाषणांत केलेला आहे. तो आज भारतातल्या सर्व राज्यांत उच्चशिक्षणाला लागू आहे असें दिसून येईल. त्या भाषणांतील सर्वांना लागू असा भाग पुढें दिला आहे.**

***

विद्यापीठाच्या पदवीदान समारंभासाठीं भाषण करावे हे माझ्या सध्याच्या पेशाला सुसंगत दिसत नाहीं. राज्याचा मंत्री म्हणून मला इतरांच्याकडून सारखा उपदेश ऐकण्याचीच आतां संवय लागली आहे. दुसऱ्यांना उपदेश करण्याची संधीच मिळत नाहीं. त्यांतल्या त्यांत मी राज्याचा मुख्यमंत्री तेव्हां मला दिला जाणारा सल्ला—उपदेश नेहमी अधिक प्रमाणात सांपडतो. तुम्ही सहज कल्पनेनें माझ्या भोंवतालच्या सल्लागारांकडे नजर टाका. अनेक कमिट्या, कौन्सिले आणि व्यक्ति सल्लागार यांच्या वर्तुळांत आम्ही मंत्री उभे असतो. त्याशिवाय वृत्तपत्रें आणि सभा मैदानें यांच्यामार्फत जो उपदेशाचा प्रचंड प्रवाह हररोज आमच्या दिशेनें वहात

येतो तो निराळाच. हा प्रवाह विरोधकांकडून येतो तसा स्वमताभिमान्यांकडूनहि येत असतो. आणि असा सर्व बाजूंनीं सल्ला व उपदेश ऐकून घेणारा मंत्रि तुम्हांला उपदेश करण्यास आपण निवडलात याबद्दल तुम्हीच आश्चर्यचकित व्हाल. शिवाय असा जो कांहीं उपदेश दिला जातो तो नेहमीच मान्य करतां येतो किंवा मान्य करण्यांत हित असते अशीहि शक्यता नसते. म्हणून अशा प्रसंगांना नेहमी ज्या पद्धतीनें उपदेश केला जातो त्या पासून मी थोड्या निराळ्या मार्गावर बोललो तर आपण क्षमा कराल अशी आशा बाळगतो.

नेहमीची रूढ चाकोरी सोडून मी निराळ्या दिशेनें माझें भाषण करावे याला दुसरे एक तसेच महत्वाचे कारण आहे. सध्यां आपल्या देशाच्या जीवनाचा चेहरा मोहरा फार वेगानें बदलत आहे. हा जो बदल घडून येत आहे तो मूलग्राही स्वरूपाचा असून त्याचा परिणाम बऱ्याच काळपर्यंत कायम रहाणार आहे. अशा बदलत्या स्थितींत दहावीस वर्षांनीं काय घडेल याचा अचुक अंदाज बांधून त्यावर कांहीं सैधांतिक बोलणें हें कोणाही माणसाच्या दृष्टीने मोठें धाडसाचे काम ठरणार आहे. कोणीसे असें म्हटलें आहे कीं या आपल्या विसाव्या शतकांत पहिल्या महायुद्ध कालापासून एवढे एक मोठे सामाजिक परिवर्तन घडून येत आहे कीं ज्याचा दाखला मानव जातीच्या इतिहासांत सापडणार नाहीं. आपणही भोवतालच्या परिस्थितीचा हा प्रचंड वेग पाहून या मताशी सहज सहमत होऊ असे मला वाटते. अशा स्थितीत माझ्यासमोर तुम्ही जमलेल्या माझ्या तरुण मित्रांना उद्याला कोणत्या समस्याना सामोरे जावे लागणार आहे याचे चित्र रंगविणे फारसे सोपे काम नाहीं. तुमच्या मार्गांत कोणत्या अडचणी येतील कोणत्या परिस्थितीचे आव्हान तुम्हाला स्वीकारावे लागेल हें सांगणे जरासे अवघडच आहे. त्या परिस्थितीशी झगडतांना तुम्ही जे कांहीं जीवनात उच्च असे मिळविले असेल त्याची शिदोरी तुम्हाला बाळगावी लागेल आणि बरोबर मला असे वाटते कीं भारताच्या नकाशावर तुमच्या या अलिगड विश्वविद्यालयाने जे स्थान मिळविलें आहे त्या मागची शक्ती आणि स्फूर्ती आपल्या जीवनांत आत्मसात केलेली असेल तर तुमच्या पुढच्या प्रवासांतील अडचणींची फारशी चिंता करण्याचे तुम्हाला कारण रहाणार नाहीं.

मी असे म्हणतो या मागे कांहीं विचार आहेत. आपला असा विश्वास आहे कीं शिक्षणाने आणि केवळ शिक्षणानेच सामाजिक व राजकीय अडचणींचा निरास करता येतो. ही शैक्षणिक प्रेरणा येथें आहे असें मला वाटते. म्हणून येथें जुन्या समजुती, अंधासक्ती, धर्मभोळेपणा यांच्याशी शिक्षणाच्या प्रकाशानें एक युद्ध सुरू केले आहे. बुद्धिवाद, समजूत आणि सहिष्णुता या मूल्याची आपल्या जीवनांतल्या लोकशाहीच्या रक्षणासाठीं शिक्षणात जपणूक केली जाते. आपल्या विश्वविद्यालयाचे संस्थापक सर सय्यह अहमदखान यांची ही दृष्टी होती. आपल्या सहधर्मियांकडून त्यांना गैरसमज, राग आणि विरोधाचा प्रहार सहन करावा लागला आहे. त्यांनीं ज्या दृढनिश्चयाने व धैर्याने हा प्रहार सहन करून आपले कार्य पुढें चालविले त्यामागे उच्चतम कशा नैतिक मूल्यांचे अधिष्ठान त्यांना लाभले होते. आता मुस्लीम समाजाच्या मनांत त्यांच्या कार्यासंबंधी आदर उत्पन्न झाला ही एकच साक्ष आहे कीं त्यांचे मार्ग व शिकवण निर्दोष होती. दृढ पायावर उभी होती. आपणही त्या महान् नेत्याची स्मृती विस्मृतीच्या पडद्याआड जाऊं देऊ नये. सर सय्यद अहमदखान इंग्लंडमध्यें असताना तेथील शिक्षणपद्धतीबद्दल बोलतांना एकदा म्हणाले होते कीं येथें दिल्या जाणाऱ्या शिक्षणाप्रमाणें भारतांतील आमजनतेंमध्यें शिक्षणाचा प्रसार केल्याशिवाय भारताला मानाने रहाता येणार नाहीं. सुसंस्कृत बनता येणार नाहीं. आज आपल्या भोवताली नजर टाकाल तर सर सय्यद अहमदखान यांचे ते मत प्रभावीपणाने सर्वत्र मान्य झालेले दिसून येईल. त्यांचे ते स्वप्न आज भारतांत साकार होत आहे.

स्वातंत्र्योत्तर कालांतील भारतीय शिक्षणक्षेत्रांत एक महत्वाची गोष्ट अशी आहे कीं हा प्रसार समाजाच्या सर्व थरात होत आहे. गेल्या दहा-वर्षांतील शिक्षण प्रसाराला असा वेग आला आहे कीं जो पूर्वी कधी दिसला नव्हता. त्याच बरोबर निरनिराळ्या पातळीवरच्या आपल्या शिक्षणाच्यापद्धतींचाही विचार केला जात आहे व त्यांत परिस्थितीस अनुरूप असे बदल करण्याचे प्रयत्न होत आहेत. आपण देशांत सर्वत्र प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करीत आहोंत. त्यांतच मूलोद्योगी शिक्षणपद्धतीचा अंगिकार मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. या मूलोद्योग शिक्षण पद्धतीशीं

आपल्या विश्वविद्यालयाचा एक उपकुलगुरू डॉ. झकिर हुसेन यांचें नांव निगडित आहे. मूलोद्योग शिक्षणपद्धतीचे विशेष सूत्र मला असें दिसते कीं त्या पद्धतीच्या शिक्षणाचे प्रतिबिंब ग्रामीण भागांतील जनतेच्या दैनंदिन जीवनात दिसत असते. प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच दुय्यम शिक्षणाचीही आपण मोठ्या प्रमाणावर वाढ करून राहिलो आहोत. त्यातच विद्यार्थ्यांची परिस्थिति व मगदूर पाहून शिक्षणाचे पृथःकरण केलें जात आहे. त्यांच्या बुद्धीला अनुरूप असे मार्ग शोधले जात आहेत. बहुसंख्य विद्यार्थी विश्वविद्यालयीन शिक्षणापर्यंत जाणे शक्य नाहीं ही गोष्ट लक्षांत घेऊन हे फेरफार केले जातात. त्याचबरोबर आपल्या कॉलेज शिक्षणातही मोठी वाढ झालेली आढळून येते. या शिक्षण प्रसाराची आंकडेवारी मी द्यावी अशी अपेक्षा नाही. आपणा सर्वांचा तो रोजचा अनुभव आहे. त्या पेक्षा या शिक्षण प्रसाराचे जे संभाव्य परिणाम समाजाच्या निरनिराळ्या थरात होणार आहेत त्याची थोडीशी चिकित्सा मी करावी असें मला वाटते.

आपल्या देशाच्या घटनेमध्यें असे नमूद करण्यांत आले आहे कीं प्रत्येक मुलाच्या वयाच्या १४ वर्षांपर्यंत त्याला राज्य सरकारानी सक्तीने व मोफत शिक्षण दिले पाहिजे. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराची ही दिशा बरोबर आहे असा सर्वांचा अभिप्राय आहे. आपण मतदानाचा हक्क सर्व वयात आलेल्या स्त्री पुरुषाना दिलेला आहे तेव्हां त्या मतदाराना शिक्षित करणं याला राजकीय अर्थही आहे. सामाजिक जीवनात लोकशाहीची बीजे खोल रुजावी यासाठीं हे शैक्षणिक धोरण आवश्यकच आहे. त्याचप्रमाणें देशातील विराट लोकशक्तीला आपल्या कामात अधिक तरबेज बनविण्यासाठीं शिक्षण आवश्यकच आहे. सामान्य माणसाच्या जीवनात सांस्कृतिक विकास घडवून आणण्यास शिक्षण उपयुक्त ठरलेले आहे. या शिक्षणातील मूलोद्योग शिक्षण पद्धती संबंधींच्या मतांतील विविधता क्षणभर दूर ठेवली तरी घटनेतील अपेक्षेप्रमाणें सर्वांना प्राथमिक शिक्षण देण्याच्या धोरणाबद्दल कोणाचे दुमत दिसून येत नाहीं. सरकारचा विशेष भर प्राथमिक शिक्षणावर असल्यामुळें इतर उच्च शिक्षणाकडे सरकारचे पुरेसे लक्ष पोचत नाहीं असा एक आक्षेप घेतला जातो हें खरे आहे. पण हा आक्षेप घेणाऱ्या मंडळींनींही प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराविरुद्ध मत व्यक्त केलेले नाहीं.

दुय्यम शिक्षणाच्या प्रसाराबाबदही असेंच सर्वसाधारण एकमत होतेसे दिसते. खरी मतभिन्नता सुरू होते ती विश्वविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षणाच्या पातळीवर होते. गेल्या दहा वर्षांत या उच्च शिक्षणाकडे धाव घेणाऱ्यांची संख्या अतिशय वाढत गेल्यामुळें या शिक्षणाच्या उपयुक्तते-संबंधी शंका निर्माण झाल्या आहेत. या वाढलेल्या संख्येने शिक्षणसंस्थांत गर्दी झाली व त्यातून शिक्षण क्षेत्रात अनेक दोष शिरले असें म्हणणे आहे. जे विद्यार्थी आज या महाविद्यालयातून व विद्यापीठातून गर्दी करून येत आहेत त्यांना या शिक्षणाचा योग्य तो फायदा घेण्याइतकी बऱ्याच जणांची कुवत नसते आणि बऱ्याच वेळीं ही मुले आपले शिक्षणक्रम पूर्ण न करताच निघून जातात. त्याने राष्ट्रीय संपत्तीचा नाश होतो. महाविद्यालयाना इमारती आणि प्रयोग शाला अपुऱ्या पडतात. प्रत्येकाला पुरेशी साधन-सामुग्री देता येत नाहीं. विद्यार्थ्यांमध्यें एक सामुदायिक जीवन निर्माण होणे जरूर असते ते होत नाही तसेच विद्यार्थी व शिक्षक यांचा जो एक संबंध जडावा लागतो त्याला या अमर्याद संख्येमुळें वाव मिळत नाही. या परिस्थितीचा स्वाभाविक परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांचा बौद्धिक व शैक्षणिक दर्जा खालावलेला आहे असे आढळते. कशीतरी पदवी मिळविणे हे त्यांचे ध्येय रहाते आणि त्यांना एकदा पदवीचा शिक्का मिळवून देण्यासाठीं नाना मार्ग सुचविणें एवढेच या शिक्षण संस्थांचे काम राहिले आहे असें दिसून येते. महाविद्यालयात 'पाळी' नं शिक्षण देणें, संध्याकाळची व रात्रीची कालेजें काढणे, बाहेरून परीक्षेची तयारी करून देणाऱ्या संस्था काढणे, पोस्टाने शिक्षण देणे वगैरे सर्व मार्ग विद्यार्थ्यांना केवळ पदवीचा शिक्का मिळवून देण्यासाठीं निघालेले मार्ग आहेत. या परिस्थितीची चिकित्सा करताना कांही जण म्हणतात कीं आपल्या विद्यापीठातून बुद्धिमत्तेची, ज्ञानाची, निवड कसोटी करण्याची शक्ती संपली असून मागणी तसा पदव्यांचा पुरवठा करणारी ती ठिकाणे बनली आहेत. केवळ संख्या आणि विस्तार यांच्यासमोर गुणवत्तेचा बळी दिला जात आहे.

या दोषावर उपाययोजना म्हणून ही उच्च शिक्षणाची प्रवेशद्वारें निर्बं-धित करणें किंवा पदवी परीक्षेच्या मागें धावणारांची प्रवृत्ती दुसऱ्या

दिशेला वळविणें असे उपाय सुचविले जातात. महाविद्यालयांत प्रवेश देतानांच संख्या निर्बंध अधिक निर्बंध हा पहिला मार्ग सुचविला जातो. दुसऱ्या मार्गांत नौकरी व पदवी यांचे नाते तोडण्याचा उपाय येतो. या मार्गांनीं किंवा दुय्यम शिक्षण कालांत शिक्षणाचा ओघ विविध दिशांकडे वळविल्यानें महाविद्यालयाकडे येणारा हा लोंढा कितपत कमी होईल हें सांगता येत नाही. मला तर वाटतें कीं अशा मार्गानें ही संख्या कमी करतां येणार नाहीं. दुय्यम शिक्षणाचा प्रसारही वेगानें होत असल्याकारणानें महाविद्यालयांत येऊ इच्छिणारांची संख्याही सदैव वाढती रहाणार. शिवाय ज्या मुलांना या उच्च शिक्षणाचा खराखुरा फायदा घेण्याइतकी कुवत आहे परंतु गरिबीमुळें त्यांना हा मार्ग चोखाळतां येत नाहीं त्यांची सोय करणें हेही आवश्यक आह. आणि म्हणून विविध प्रकारच्या शिष्यवृत्त्या दिल्या जातात. आपली आजची समस्या म्हणजे महाविद्यालयाकडे येणारी सदैव वाढती विद्यार्थी संख्या ही आहे. अशा भल्या मोठ्या संख्येनें या उच्च शिक्षण क्षेत्रांत प्रवेश करणारामध्यें बरीच मुले त्या कुवतीची व बौद्धिक ताकदीची नसतात हेही खरे आहे.

येथपर्यंत मी महाविद्यालयांत होणाऱ्या गर्दीचा आणि ती गर्दी कमी करावी म्हणून सुचविण्यांत येणाऱ्या प्रयत्नांचा उहापोह केला. आतां या धोरणाबाबतच्या माझ्या मनांतील शंका मी मांडू इच्छितो.

सुरवातीलाच मी हे नमूद करतो कीं जगांतल्या कोठल्याही देशांत विश्वविद्यालयीन शिक्षण हें सर्वांनाच उपलब्ध केले जात नाहीं. जे देश खूप श्रीमान आहेत आणि त्यांना आपल्या तरुण पिढीला हे उच्च शिक्षण देणें आर्थिक दृष्ट्या परवडते अशा देशांतहि विश्वविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्यांची संख्या मर्यादितच असते. म्हणून ज्यांना ज्यांना हें उच्च शिक्षण घेण्याची इच्छा होईल त्या सर्वांना प्रवेश दिला पाहिजे असे सुचविण्याचा उद्देश नाहीं.

आज या विद्यामंदिरांत प्रवेश करणाऱ्या मुलामुलींच्या संख्येचें प्रमाण इतरांच्या तुलनेनें इतके कमी आहे कीं आजच्या आपणाला वाटणाऱ्या

गर्दीला आळा घालण्याचा विचार योग्य ठरणार नाहीं. तुम्ही माझ्या समोर जमलेले तरुण पदवीधर हे तुमच्या वयोमानाच्या लोकसंख्येंत केवळ एक टक्काच भरता हे लक्षांत ठेवले पाहिजे. आपल्या देशांत आर्थिक परिस्थितीमुळें आपल्या शिक्षण संस्थांना एक मर्यादा पडते हे खरे पण तसे असले तरीहि ज्यांना उच्च शिक्षणाची भूक लागली आहे अशा तरुण पिढीच्या शिक्षणासाठीं जादा पैशाची सोय देशानें कसेहि करून केली पाहिजे. आज या शिक्षण संस्थांच्या दारांत धांव घेणारांची संख्या वाढलेली दिसते याला कारण वर्षानुवर्षे ज्या वर्गाला ही दारे बंद होती त्या वर्गातील तरुण पिढी जागृत झाली असून ती आतां जिद्दीनें उच्च शिक्षणाकडे धाव घेत आहे. ज्या मुलामुलींच्या वाडवडिलांना शिक्षणाची संधी मिळाली नव्हती त्यांची मुले जर शिक्षणाच्या मार्गाने आपले जीवन उज्वल करू म्हणतील तर त्यांना अडविता येणार नाहीं. दूरवर नजर ठेवून या प्रश्नाचा विचार केला तर शिक्षणाचा हा प्रसार विद्यार्थ्यांमधील गुणवत्तेचा भाग वाढविणाराही ठरेल. जेवढी जास्त संख्या या विद्यामंदिरांत येईल तेवढी त्यांतून निवड करण्यास सोईचे होईल. क्रमाक्रमाने यांची बौद्धिक पातळी उंचावली जाईल. ज्यांच्या हातीं या शिक्षणाची जबाबदारी आहे त्याचे लक्ष योग्य नडीकडे केंद्रित झालें तर दर्जा वाढेल असे मला वाटते.

उच्च शिक्षणाची भूक ही देशातील आजच्या लोकशाही प्रवृत्तीची भूक आहे असें मला वाटते. अशा या उच्च शिक्षणाची दारे जोपर्यंत थोड्याशाच मर्यादित वर्गाला खुली होती तोपर्यंत समाजाचा उच्च वर्ग हाही मर्यादित रहाणार होता आणि समाजातला हा मूठभर वर्ग जर कांहीं कारणाने घसरू लागला तर समाजालाच धोका निर्माण होणार होता. शिक्षणाने मनाची क्षितिजे वाढतात. ती वाढलेली क्षितिजे आजपर्यंत जे मागासलेले अज्ञानी होते, त्यांना दिसूं लागली आणि त्या बहुसंख्य वर्गाला जर त्या क्षेत्रांत प्रवेश मिळाला तर त्यांना आपल्या शक्तीची जाणीव होईल. समाजाला जरूर असणाऱ्या नेतृत्वाची निवड करण्यास अधिक संख्येने बुद्धिवान उपलब्ध होऊ लागतील. अशा रीतीनें एक प्रक्रिया सुरू झाली म्हणजे सामाजिक दर्जा, जात, कौटुंबिक वारसा वगैरे गोष्टी आपोआप दुय्यम ठरू

लागतील. आपल्या सामाजिक प्रकृतीच्या दृष्टीनें या परिवर्तनाचा फायदाच होईल यात शंका नाहीं.

शिक्षणाच्या दर्जात आलेला कमीपणा कांहीं अंशाने आजच्या संख्या वाढीतून आलेला आहे हे मी नाकबूल करीत नाहीं. परंतु मी वर मांडलेल्या दृष्टीकोनातून त्याचा विचार केला तर ही एक प्रवासातली अवस्था आहे असे दिसून येईल. त्या तात्कालिक अडचणीवर उपाय म्हणून जे निर्बंधयुक्त प्रयोग केले जातील त्याने कितीसा फायदा होईल कोण जाणे? त्याऐवजी आपल्या महाविद्यालयांच्या आणि विद्यापीठांच्या कार्यक्षमतेत वाढ करून आणि अध्यापक वर्गाने आपल्या विद्यार्थ्यांना नव्या विधायक वृत्तीकडे नेण्याचा प्रयत्न केला तर आपल्या पुढच्या समस्या सुटण्यास मदत होईल. सरकारानी या समस्या सोडविण्यासाठीं अधिक साधनसामुग्री उपलब्ध करून द्यावी लागेल हेही मी जाणतो. परंतु मला त्या अडचणी फारशा गंभीर वाटत नाहींत एवढे मात्र खरे. देशाचा आर्थिक विकास ज्या वेगाने होत आहे तो पहाताना कांहीं कालातच आपण अधिक सोई साधने देऊं शकूं असे मला वाटते. म्हणून आजच्या संख्या गर्दीची टीका या क्षेत्रांतील वरच्या पातळीवरच्या संयोजकानी साहित्याची सुलभता व जरूरी यांचा तोल न सांभाळण्यावर केली जाणारी टीका आहे असे दिसून येईल. म्हणून कांहीं थोडाकाळ अशी गडबड गैरसोय झाली असे मानले तरी या शिक्षणाची कवाडे संख्यानिर्बंधाने बंद करावीत अशा धोरणाला ती कारणें पुरेशी ठरणार नाहींत.

उच्च शिक्षणाकडे वळलेल्या या विद्यार्थी संख्येचे पृथःकरण केले तर तेही उद्बोधक ठरेल. वैद्यकीय किंवा इंजिनियरिंग शिक्षण संस्थांत अशी गर्दी दिसणार नाहीं. तेथील अभ्यासक्रमांत किमान यंत्रसामुग्री व इतर साहित्य आवश्यकच असते. त्या शिक्षणक्रमाचे विशिष्ट स्वरूप लक्षांत घेतले तर असे दिसते कीं त्या विद्यार्थ्यांना वसतिगृहाची पुरेशी सोय करावी लागते. विद्यार्थी व प्राध्यापक याचा अधिक संबंध असण्याची जरूरी आढळते. जेव्हां आपण आर्ट्स् कॉलेजाकडे वळतो तेव्हां हे चित्र बदलते.

या महाविद्यालयांत आपणाला संख्या गर्दी दिसून येते. शास्त्र व कायदा विद्यालयांतही ही गर्दी दिसून येते. विद्यार्थी संख्येंतील वाढीमुळें ज्या समस्या निर्माण झाल्याचे आपण ऐकतो त्या समस्या या ठिकाणीं आढळतात. या क्षेत्रांत विद्यार्थ्यांचा वर्ग हा एखादा सामुदायिक वर्ग झालेला दिसतो. ज्यांना या समूहाचा विविध प्रकारे वापर करावासा वाटतो त्यांना तो करणें येथें सोपे जाते. या गर्दींत बऱ्याच वेळां शिस्तीचा अभाव आणि उच्छृंखल वृत्तींचे प्रदर्शन झालेले दिसते. या ठिकाणीं मला विद्यार्थ्यांमधली शिस्त या विषयावर लंबेचवडे भाषण करण्याचा माझा इरादा नाहीं. विद्यापीठानीच ती समस्या सोडविण्याचा यत्न करावयाचा आहे. मी एवढेंच म्हणतो कीं आपल्या तरुण पिढीच्या उच्च शिक्षणाकडे जे आस्थेने पहातात त्यांना विद्यार्थी वर्गांतील वाढत्या उच्छृंखलपणाची काळजी वाटते एवढे मात्र खरे.

(अलिगड विद्यापीठानें श्री. यशवंतराव चव्हाण यांना या प्रसंगीं डॉक्टर ऑफ लॉज ही सन्माननीय पदवी देऊन त्यांचा सन्मान करण्याची संधी घेतली. हे भाषण २३ डिसेंबर १९५९ रोजीं झाले.)

◆◆◆

वा. क्र. 70840

# शहरांत सहकारी कार्य

"सहकार आणि ग्रामपंचायतीचा विकास व्हायचा असेल तर अन्नधान्याचें उत्पादन वाढणें जरूरीचें आहे. आज सरकार ग्रामपंचायतीवर महसूल उत्पन्नाच्या २० टक्के खर्च करीत आहे. खेडेगांवांत सहकारी संस्था स्थापन व्हाव्यात यावर सरकारचा भर आहे आणि लवकरच त्या संस्था खेड्यांतहि काम करूं लागतील. यासाठीं केवळ निवडून आलेल्या प्रतिनिधींनींच नव्हे तर तेथील सरकारी अधिकाऱ्यांनींहि या चळवळीकडे लक्ष दिल्यास नेतृत्वाचा प्रश्न सुटेल."

"धान्याचे भाव वाढत असल्याचें सरकारच्या निदर्शनास आलें तर सहकारी ग्राहक संस्थामार्फत धान्यवाटपाची व्यवस्था करण्यास मुंबई सरकार मागेंपुढें पहाणार नाहीं. सहकारी चळवळीची आवश्यकता प्रतिपादून चव्हाण म्हणाले "तिच्या पदरांत जर चुका असतील तर त्या दुरुस्त करण्याचा प्रयत्न करावयास हवा. मुंबई शहरांत सहकारी चळवळीचे मुख्यतः (१) सहकारी घरबांधणी (२) सहकारी ग्राहक शाखा (३) सहकारी बँका (४) सहकारी उद्योग असे चार प्रकार आहेत. सहकारी तत्वावर घरबांधणीचें जें कांहीं कार्य चालू आहे तर समाधानकारक आहे. मात्र मुंबईतील ग्राहक सहकारी संस्थाचें कार्य असमाधानकारक आहे. ही चळवळ मुंबईसारख्या शहरांत यशस्वी झाली नाहीं तर नंतर तिचें काय होईल याचा विचार करण्यांत यावा. धान्य नियंत्रण काळांत सहकारी ग्राहक संस्थांचा जोर असल्याचें दिसतें. पण नियंत्रणें उठल्यावर या संस्थांची स्थिति अत्यंत चिंताजनक झाली. सध्या भाव चढत असल्याच्या तक्रारी ऐकूं येतात. स्वस्त धान्य देण्याचा सरकार प्रयत्न करीत आहे. पण वेळ पडल्यास अशा ग्राहक संस्थामार्फत धान्यवाटपाची व्यवस्था करण्यासाठीं सरकार मागे पुढें पहाणार नाहीं. देशांत सुबत्ता असतांना ही चळवळ झाली पाहिजे. अर्बन को-ऑ. बँका चांगलें कार्य करीत आहेत तरी त्यांत अधिक सुधारणा झाली पाहिजे. मुंबईत अशा ज्या सहकारी बँका दिसतात त्या मुख्यतः मध्यमवर्गीय वस्तींत दिसतात. मुंबईत फक्त मध्यमवर्गीय लोक रहात नसून कामगारही आहेत. कामगार विभागांतही अशा बँका स्थापन होणें अगत्याचे आहे."

◆◆◆◆

REFBK-0010847